# संपादकीय

वाचनाचं महत्त्व नव्यानं विशद करून सांगायची गरज नाही. वाचनाप्रमाणेच पुस्तकांचं जीवनातलं स्थान अनन्यसाधारण आहे. राम गणेश गडकरी यांनी असं म्हटलं आहे की, श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांची पुस्तकं माझ्या आयुष्यात आली नसती तर मी वेडा झालो असतो. 'Books that change the world' नावाची रीडर डायजेस्टची सिरिज प्रसिद्धच आहे. 'Un to this last' या रस्किन यांच्या पुस्तकाच्या वाचनाने महात्मा गांधींचे आयुष्य बदलून गेले. अनेक लेखक-विचारवंतांनी पुस्तकांचं हे महत्त्व मांडलं तर आहेच, पण ऋणही व्यक्त केलं आहे. जयवंत दळवी यांनी 'पु. ल. एक साठवण' नावाचं पुस्तक संपादित केलं आहे. त्यामध्ये त्यांनी काही पत्रेही समाविष्ट केली आहेत. त्या पत्रात एक पत्र पु. लं.च्या आईचं आहे. त्या पत्रात त्यांनी असे लिहिलंय की, मन सैरभैर झालं की मी भाईची पुस्तकं काढून वाचते.

राम गणेश गडकरी आणि पु. लं.च्या मातोश्री यांचे उद्‌गार मनाच्या एका विशिष्ट अवस्थेला पुस्तकांचे पर्याय सुचवतात. हे पर्याय ही दोघं (आणि इतरही) सुचवतात याचा अर्थ पुस्तकात तशी ताकद असली पाहिजे. तशी ती आहेच. मानसशास्त्र या विभागात पाश्चिमात्य देशांत Bibliotherapy ग्रंथोपचारपद्धती नावाची एक उपचारपद्धतीच विकसित करण्यात आली आहे. (या विषयावर एक लेख याच अंकात प्रसिद्धही करण्यात आला आहे) ही उपचारपद्धती भारतात तरी अजून वापरली जात नसली, भारतीय मानसोपचार तज्ज्ञ जरी या पद्धतीचा उपयोग करून घेत नसले, तरी उत्तम व्यासंगी ग्रंथपाल, उत्तम वाचक, जाणीवपूर्वक जोपासना करणारे पालक अजाणतेपणाने का होईना या पद्धतीचाच वापर करत आले आहेत असे म्हणता येऊ शकते.

मानसशास्त्रातली ही उपचारपद्धती असली तरी तिचा वापर फक्त मनोविकार जडलेल्यांनाच होतो वा करावा लागतो असे नाही. 'मन सैरभैर' का होते ? ते कारण-अकारणानेही होते. बालकवींनी त्याचे अचूक वर्णन केले आहे. 'कुठून येते कशी कळेना उदासीनता या हृदयाला, काय बोचते कसे कळेना हृदयाच्या अंतर्हृदयाला'. मन अकारण निराश होतं, उगाचच खंतावतं, नको असता त्रासतं, रुसतं, वैतागतं, कातावतं, घाबरतं, भयग्रस्तही होतं, काळजीत पडतं, धास्तावतं, आक्रसतं, मुकं आणि कधीमधी स्वत:लाच बोचकारतंही. याची कारणं कधी सापडतात, तर अनेकदा सापडतही नाहीत. अशा वेळी मित्र-सखा-सोबतीही नको असतो. समजूत घालणारेही कोणी नको असतं. याच स्थितीत पुस्तकं मात्र संवाद साधतात, फुंकर घालतात, समजावतात, मन वळवतात, दिलासा देतात.

मन आनंदी असतं, प्रसन्न, स्वच्छ असतं, सुखावह अनुभव घेत असतं तेव्हाही पुस्तकं आधार देतात. पुस्तकं दिशा दाखवतात, आणखी आनंदाच्या वाटा समोर खुल्या करतात.

अनेकदा तर चांगलं पुस्तक चांगल्या लेखनाला जन्म देतं. पुस्तकं विचार देतात, विचार करायला शिकवतात. चांगलं वाचल्यावर कुठली तरी दिव्य अनुभूती प्राप्त झाल्यासारखं वाटत



राहतं. मन ताजं टवटवीत होतं, खुलतं, मोकळं होतं. मनावरचा ताण हलका होतो. सैल आणि खुलं वाटत राहतं. पुस्तकं प्रेरणा देतात, उभारी देतात आणि जगण्याचं बळही देतात. जगावं कसं, वागावं कसं, बोलावं कसं, कृती कशी करावी, का करावी, कोणी करावी, ती कृती मीच का करावी, मी केली तर काय होईल, न केली तर काय नुकसान होईल याचा विचार मनात उतरत जातो, तो वाचनातील ओळींमधून, शब्दांमधून. मग 'शब्दावाचूनि कळले सारे शब्दांच्या पलीकडले' असा अनुभव जीवनात ठायी ठायी येतो, मग तेच मन पुन्हा पुन्हा वळतं ते पुस्तकांच्याच दिशेला. प्रत्येक वेळी दु:ख, कष्ट, समस्या, प्रश्न, चिंता, घोर, आपत्ती, संकटच समोर ठाकायला लागतात असेही नाही.

मनाच्या विविध अवस्थांमध्ये पुस्तके सोबती असतात, पण कोणती पुस्तके ? कोणत्या पुस्तकांनी हा अनुभव येतो ? ते लेखक कोण ? अशी ताकदीची व ताकद असणारी पुस्तके कोणती ? ही वाट कोण दाखवणार ? कोण गुरू होणार ? ग्रंथोपचारपद्धतीत अशा पुस्तकांची यादी तयार असते. जशी डोकेदुखीवर ॲनॅसीन, दातदुखीवर बुफेन; पण दात काढायचा असेल तर ? तर मात्र गुंगीचे इंजेक्शनच हवे. एका ठरावीक मर्यादेपर्यंत घरच्या घरी उपाय रास्त ठरतो. घरचा वैद्य, तुमचे तुम्ही डॉक्टर, डॉक्टर नसेल तेव्हा, आजीबाईचा बटवा उपयोगी ठरतो. त्याच्यापुढे ? त्याच्यापुढे मात्र तज्ज्ञाचीच गरज लागते. डॉक्टरच बोलवावा लागतो.

वाचकांनी आपली आपण पुस्तकं निवडावीत याला एक मूलभूत अशी मर्यादा आहे. त्यांना मार्गदर्शनाची गरज असते. हे मार्गदर्शन दोन पातळींवर केलं जातं. एक असते वाचन शिफारस यादी. या यादीच्या साहाय्याने वाचक पुस्तके निवडू शकतात (या विषयावरही एक लेख याच अंकात प्रसिद्ध केला आहे). दुसरी असते व्यक्तिगत मार्गदर्शनाची. ग्रंथपाल, शिक्षक, पालक आपल्या वाचनानुभवाच्या जोरावर पुस्तकांची शिफारस करतात. पुस्तके काढून ती वाचायला देतात.

परंतु जेव्हा समस्यांवर उपाय म्हणून, एक औषध म्हणून जर पुस्तक सुचवायचे असेल तर मात्र सुचवणारा तज्ज्ञच असावा लागतो. तो मनाचा जाणकार असावा लागतो; तसाच तो पुस्तकांचाही जाणकार असावा लागतो. अनेकदा तर शारीरिक आजारांचा तज्ज्ञही लागतो. नाहीतर रोगापेक्षा उपचार भयंकर अशी अवस्था व्हायची. पाश्चात्त्य देशांत जिथे ही ग्रंथोपचारपद्धती वापरली जाते तिथे असे विविध विषयांतले जाणकार एकत्र येतात आणि एकमेकांची सल्लामसलत होऊनच मग ती ती पुस्तके सुचवली जातात.

आपल्याकडे अशा पद्धतीची उपचारपद्धती वापरली जात नाही हे तर खरेच आहे; पण तज्ज्ञ डॉक्टरांच्या मदतीला जाऊ शकतील असे ग्रंथपाल तरी कुठे आहेत ? समस्याबरहुकूम पुस्तकं सुचवण्यासाठी प्रथम ग्रंथपाल स्वत: चांगला वाचक असायला हवा. त्याने विविध प्रकारची साधने आपल्यापाशी तयार करायला हवीत. वाचनयोग्य पुस्तके कोणती ? त्यांचे विषय, त्यांतील आशयामुळे साधू शकेल असा अपेक्षित परिणाम, पुस्तकांचे विषय, त्यांची शैली, भाषा, मांडणी, लेखकाची विषयाबाबतची समज सारेच लक्षात घ्यावे लागेल. तरच अशी मदत करता येईल.

आज वाचनाच्या नावाने अनेक अर्थाने बट्ट्याबोळ आहे. शिक्षक वाचत नाहीत, ग्रंथपाल

वाचत नाहीत आणि पालकही वाचत नाहीत आणि तरीही प्रत्येकाला मुलांनी, विद्यार्थ्यांनी वाचावे असे वाटते. एखाद्या विषयावर नवीनजुनी पाच-दहा पुस्तकांची नावे चटकन सांगता न येणारे शिक्षक-पालक-ग्रंथपाल प्रचंड प्रमाणात आहेत. अशा वातावरणात काय करावे ?

शालेय शिक्षणापासून विद्यापीठीय शिक्षणापर्यंत प्रत्येक अभ्यासक्रमामध्ये 'ग्रंथालय वा वाचन' असा विषय अनिवार्यच असायला हवा. वाचावे कसे आणि काय वाचावे हे शिकवावेच लागते. पाश्चिमात्य देशांत ग्रंथालयाचा विषय अभ्यासक्रमात सामावूनच घेतलेला असतो. तसा भाग आपल्याकडे केव्हा येईल कोण जाणे !

किमानपक्षी 'संगीत विद्यालय', 'क्रिकेट कोचिंग' प्रमाणे एक तरी 'वाचन विद्यालय' निर्माण व्हायला हवे. असे विद्यालय मुलांना वाचन कसे करावे, का करावे ते तरी शिकवील. आमच्या ग्रंथपालांनी असा प्रयोग करायला काय हरकत आहे ?

**– संपादक**

❑❑❑

### ग्रंथवाचनाचे व्यसन – १

शाळेत शाकुंतल नाटक जवळ जवळ पाठ झाल्यामुळे वाङ्मयाची गोडी लागली होती. प्रीव्हियस परीक्षेसाठी रघूचे पहिले पाच सर्ग नेमले होते, पण मी संपूर्ण रघुवंश घरी वाचून टाकला. पहिल्या आठ सर्गांतले निम्मे श्लोक पाठच होऊन गेले. सुभाषित रत्नभांडागाराचे काही श्लोक मॅट्रिक होण्यापूर्वीच लिहून घेतले होते. या वर्षी त्यांतील आणखी काही श्लोक पाहिले. मार्गदर्शक कोणी नसल्यामुळे मनाला येतील ती व सहज हाती पडतील ती पुस्तके आणून वाचून व वाचलेल्या भागापैकी चांगल्या गोष्टींची, वाक्यांची, विचारांची टाचणे करून ती ज्यांची त्यांस द्यावीत किंवा वाचालयातून आणून ती वेळच्यावेळी परत करावीत असा माझा सपाटा सुरू झाला. संस्कृतची गोडी लागल्यामुळे कालिदास, भवभूति, भर्तृहरी, बाण, दंडी, भारवि व जगन्नाथ पंडित यांचे काव्यग्रंथ एक वर्ष वाचले व पुढे दीड वर्ष मराठ्यांच्या इतिहासावरील सर्व छापील बखरी, ग्रँड डफचा मराठ्यांचा इतिहास, टॉडचा राजस्थान, फेरेस्टाचा इतिहास, प्लीट व भांडारकर यांचे दखखनचे इतिहास, इलियटचा हिंदुस्थानावरील भाग (मला वाटते हे भाग सात असावेत), ग्रीस व रोमचे इतिहास, गॉसे याच्या इंग्लंडच्या इतिहासाचे दोन भाग, काही रेनॉल्डच्या कादंबऱ्या वगैरे अनेक ग्रंथ वाचण्यात आले ! सपाटून वाचून होत असल्यामुळे माझ्या टिप्पण वह्या तयार होत असत व मी त्या रिकामपणाच्या वेळी चाळीत बसत असे. त्यामुळे वाचलेल्या चांगल्या गोष्टी माझ्या स्मरणपथातून प्रायः जात नसत ! ॲडिसन व जॉन्सनचे निबंध मी वाचले. बॉसवेलने लिहिलेले जॉन्सनचे चरित्र समग्र वाचले. **मला माझ्या आपत्तीत धीर द्यायला व विद्याव्यासंग कायम ठेवायला थोडी फार स्फूर्ती ह्या पुस्तकाने मिळाली.** महाभारताचे सभापर्व समग्र वाचले.

**– चरित्रचंद्र, पृ. ५०, ५१**
**– ल. रा. पांगारकर**



# वाचन शिफारस यादी

प्रदीप कर्णिक

वाचकांना नेहमी वाचनीय साहित्याची यादी अथवा काही पुस्तकांची शीर्षके जाणकार, तज्ज्ञ, अभ्यासू, व्यासंगी व्यक्तींनी सुचवावीत असे नेहमी वाटते. वाचक अनेकदा ग्रंथपालांकडे 'वाचनीय साहित्य सुचवावे' अशी मागणी करीत असतात. आपल्या व्यासंगानुरूप आणि वाचकाचा आवाका लक्षात घेऊन अशी पुस्तके जाणकार, ग्रंथपाल सुचवीतही असतात; परंतु हे काम करताना त्या त्या ग्रंथपालांच्या स्मरणातून किंवा अनुभवातून अशी पुस्तके वाचकांना देण्याचे कार्य होत असते; त्यासाठी तयार मार्गदर्शक याद्या मराठीत तरी अभावानेच उपलब्ध आहेत. विशेषत: पालकांना नेहमीच अशा समस्यांना तोंड द्यावे लागते. आपल्या पाल्याने वाचावे असे त्यांना वाटत असते; पण त्यांच्या वयानुरूप कोणते साहित्य द्यावे, वाचनाची सुरुवात कुठून करावी, सुचवलेले ग्रंथ कुठे उपलब्ध आहेत, याची समाधानकारक उत्तरे मिळतातच असे नाही.

ही समस्या विचारात घेऊन 'लोकसत्ता' दैनिकाने अलीकडेच 'मित्र मराठी शाळांचे' (निवडक पुस्तकांची यादी) या नावाने एक यादी प्रकाशित केली आहे. १६ पानी या पुस्तिकेत पहिली, दुसरी, तिसरी व चौथी, पाचवी ते सहावी, आठवी ते दहावी अशा पाच भागांत विभागणी करून त्या त्या वयोगटाच्या मुलांसाठी वाचनीय मराठी व काही इंग्रजी पुस्तकांची यादी प्रकाशित केली आहे. याव्यतिरिक्त पालकांनी अवश्य वाचावी अशी 'पालकत्व'विषयक ३७ पुस्तकांची यादीही जोडली आहे. त्याशिवाय 'शाळांना वाचनालय कसे सुरू करता येईल याविषयी एक योजना डॉ. ऊर्मिला पिटकर यांनी सादर केली आहे; तर बालसाहित्याचे लेखक व प्रयोगशील कार्यकर्ते श्री. राजीव तांबे यांचा 'अलिबाबाचा खजिना' हा मुलांना प्रेरणादायी ठरेल असा एक छोटेखानी लेखही आहे. पाच चौकटींत मराठी माध्यमाविषयीच्या जाणकार (प्रा. राम जोशी, वासुदेव बळवंत पटवर्धन, चंद्रकांत बांदिवडेकर) व्यक्तींचे विचार दिले आहेत. या पुस्तिकेची भूमिका 'काय वाचावे ? ठोस उत्तर' या नावाने लोकसत्ताच्या लेखिका आणि उपसंचालिका शुभदा चौकर यांनी मांडली आहे.

२८ फेब्रुवारी २००४ च्या लोकसत्ताच्या 'चतुरंग' पुरवणीत शुभदा चौकर यांनी मराठी शाळांकडे पालकांनी जी पाठ फिरवली आहे त्याचा शोध घेणारा एक विस्तृत लेख लिहिला होता. त्यावर खूप प्रतिसाद त्यांना मिळाला. काही शाळांनी त्यावर चर्चा ठेवली, परिसंवादही आयोजित केले. खुद्द लोकसत्ता दैनिकाने इंडियन एज्युकेशन सोसायटी (दादर) यांच्या सहकार्याने एक चर्चात्मक कार्यक्रम ठेवला. या परिसंवादामुळे समविचारी व्यक्ती एकत्र आल्या आणि त्यांनी काही कृती कार्यक्रमांची आखणी केली. त्यातूनच १ मे २००४ रोजी 'मित्र मराठी शाळांचे' हा मंच मुंबईच्या रूपारेल महाविद्यालयात सुरू झाला. त्यातून झालेल्या बैठकांमधून 'निवडक पुस्तकांच्या

यादी' ची आखणी झाली. राजीव तांबे, अंजली कीर्तने, शकुंतला मुळे यांच्यासह अनेक वाचनप्रेमींनी ही यादी तयार करण्यास साहाय्य केले आणि लोकसत्तेने ही यादी आता सादर केली आहे.

या निमित्ताने 'वाचन शिफारस यादी' बद्दलचा विचार केल्यास तो उद्‌बोधक ठरेल. इंग्रजीमध्ये अशा वाचनसाहित्याच्या याद्या किती जाणीवपूर्वक केल्यात ते पाहून थक्क व्हायला होते. मराठीत अपवादात्मक का होईना पण असे प्रयोग झाले आहेत. त्यांचा इतिहास अजून तरी एकत्रित केला गेलेला नाही.

## शिफारस यादीचा प्रारंभ

अर्थातच अशा शिफारस यादींची सुरुवात इंग्रजीतच झालेली दिसते.[१] ग्रंथांचे माणसाच्या आयुष्यातील महत्त्व अनेकांनी विशद केले आहे. त्यात त्याची सुरुवात झालेली दिसून येते. रस्किन याने आपल्या एका व्याख्यानात (सीसम अँड लिलीज) 'महान ग्रंथ म्हणजे मानसिक शक्तीचे खाद्य' असे वर्णन केले; तर मिल्टनने मोठ्या ग्रंथांचे ''The Precious life blood of an author prolonged and kept on purpose for a life beyond life'' असे वर्णन केले होते. अशा वचनांचा खोलवर विचार केला तो सर जॉन ल्यबाक यांनी. त्यांनी आपल्या 'प्लेझर्स ऑफ लाईफ' या ग्रंथात 'थ्री हंड्रेड बुक्स' म्हणून एक यादी प्रकाशित केली. हे ग्रंथ प्रत्येक कुटुंबाने आपल्या संग्रही ठेवावेत अशी शिफारसही केली.

या यादीचा आणि ल्यबाक यांच्या शिफारसींचा योग्य तो परिणाम इंग्रजी ग्रंथव्यवहारात उमटला. 'रटलंज अँड को' या कंपनीने ल्यबाकच्या सल्ल्याप्रमाणे शंभर पुस्तके प्रकाशित केली. पुढे मग अनेकच प्रकाशन संस्थांनी आपापल्या मालिका प्रकाशित करण्यास सुरुवात केली. जॉर्ज बेल अँड कंपनी, कॅसल आणि कंपनीने आपल्या मालिका बाजारात आणल्या. मॅकमिलनची एलिमेंटरी क्लासिक्स, ऑक्सफर्ड प्रेसची वर्ल्ड क्लासिक्स सिरीज अशा मालिकाही आल्या. Penguin, Pelican सीरिजच्या माध्यमातूनही उत्तमोत्तम पुस्तके प्रकाशित झाली आहेत. अर्थात या मालिकांचा हेतू कौटुंबिक ग्रंथालये समृद्ध व्हावीत हा होता व तो इंग्रजी भाषेत यशस्वीही झालेला आहे.

## मराठी भाषेतील पहिला प्रयत्न आणि परंपरा

जॉन ल्यबाक यांच्या The Pleasures of Life च्या आधाराने कृष्णाजी परशुराम गाडगीळ यांनी १८९३ साली 'संसारसुख'[२] नावाचे पुस्तक प्रकाशित केले. या पुस्तकाच्या शेवटी गाडगीळ यांनी एक शिफारस यादी प्रकाशित केली होती. मराठी भाषेतील 'शिफारस यादी' म्हणून याच यादीचा पहिला दाखला सापडतो. गाडगीळ यांच्या यादीचा वापर उत्तम प्रकारे आणि कल्पकतेने जर कोणी केला असेल तर तो म्हणजे न्या. महादेव गोविंद रानडे यांनी.

न्या. महादेव गोविंद रानडे यांनी सर अलेक्झांडर ग्रँट यांच्या सूचनेवरून १८६४ अखेरपर्यंत प्रकाशित झालेल्या मराठी पुस्तकांची यादी तयार करून सरकारला सादर केली होती. त्यानंतर मात्र न्या. रानडे यांनी एक अफलातून कल्पना राबवली. त्यांनीही मराठीतील उत्तम ग्रंथांची एक



यादी तयार करण्याचे ठरवले आणि मराठीतील काही पदवीधर व बिनपदवीधर अशा प्रसिद्ध मराठी लेखकांकडून व समीक्षकांकडून शंभर निवडक पुस्तकांची यादी मागवली. अर्थातच त्यांना केवळ नऊच याद्या प्राप्त झाल्या. या नऊ याद्या आणि त्यात दहावी यादी न्या. रानडे यांनी कृष्णाजी गाडगीळ यांच्या 'संसारसुख' मधून घेतली आणि एकूण ६० मराठी पुस्तकांची शिफारस केली. A note on the Growth of Marathi' या त्यांच्या निबंधाच्या[३] सोबत जोडली. या यादीचा आपल्या मराठी वाचकांनी किती व कसा उपयोग केला हे कळावयास मार्ग नाही.

यानंतरचे दोन प्रयत्न झालेले दिसून येतात. त्यांपैकी एक आहे तो सरकारी माध्यमामार्फत झालेला आणि दुसरा आहे तो एका पुस्तक विक्रेत्याचा. अर्थात या दोन्ही प्रयत्नांमधील वाचक-वर्ग मात्र सर्वसामान्य वाचक नाहीत, तर संस्था आहेत.

१९३१ साली बॉम्बे बुक डेपोसाठी नारायण गंगाधर लिमये[४] यांनी 'प्राथमिक शाळांकरिता वाचनीय पुस्तकांची यादी' तयार केली. म्युनिसिपल स्कूल कमिटीने या यादीचा उपयोग करावा असा त्याचा हेतू होता असे दिसते. कसेही असले तरी त्यात 'शिफारस' हा महत्त्वाचा हेतू होता हे नाकारून चालणार नाही.

१९३६ साली मुंबई सरकारने 'खेडेगावातील लहान ग्रंथालयांसाठी योग्य अशा पुस्तकांची यादी'[५] प्रकाशित केली. या दोन्ही याद्यांचा उपयोग पुस्तक खरेदीसाठी व्हावा असे त्यांच्या निर्मात्यांना वाटत होते, हे उघड असले तरी वाचकांना त्याचा निश्चित उपयोग करून घेता येणे शक्य होते. तो कितपत झाला वा केला गेला हे कळावयास मार्ग नाही.

यानंतरचा प्रयत्न व तोही जाणीवपूर्वक जर कोणी केला असेल तर तो म्हणजे ग्रंथप्रसाराला वाहिलेल्या 'ललित' या मासिकाने. ललित या नियतकालिकाने दरवर्षी चोखंदळ वाचकांना आवडलेल्या पुस्तकांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. दरवर्षी मराठीत ह्या लेखक, समीक्षक, वाचकांना पत्रे पाठवून त्यांना आवडणाऱ्या तीन पुस्तकांची (त्या त्या वर्षातील) नावे संपादक मागवून घेतात आणि सर्वांत जास्त पसंतीनुसार क्रमवारी लावून त्या वर्षातील पुस्तकांची शिफारस 'ललित'मध्ये गेली अनेक वर्षे प्रकाशित होत आली आहे. वाचकांना ती यादी उपयुक्त ठरत आहे.

१९८६ साली 'महाराष्ट्र टाइम्स' या दैनिकाने २९ जून रोजीच्या अंकात 'मराठीतील साहित्यलेणी' या नावाखाली मराठीतील निवडक १०० पुस्तकांची यादी प्रसिद्ध केली. ही निवड महाराष्ट्र टाइम्सच्या संपादकीय विभागाने केली होती. पुढे ही यादी 'ग्रंथाली' तर्फे दीपक घारे यांच्या संपादकत्वाखाली पुस्तिकेच्या रूपाने प्रकाशितही करण्यात आली. त्यात श्री. घारे यांनी त्या पुस्तकांचा थोडक्यात सारांशही दिला आहे; परंतु जेव्हा ही यादी मटामध्ये प्रकाशित झाली होती तेव्हा त्यावर बराच मोठा पत्रव्यवहार झालेला आहे. तो पत्रव्यवहार पाहिला तर असे दिसते की निवडीबाबत मराठी वाचक बराच जागरूक आहे.

१० ऑगस्ट १९८६ रोजीच्या 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये वाचकांनी 'साहित्यलेणी'च्या संदर्भात पाठवलेल्या पत्रांचा गोषवारा दिला आहे. त्यात काही पत्रेही छापली आहेत, तर काही लेखवजा टिपणेही देण्यात आली आहेत. ग. प्र. प्रधान, राम शेवाळकर, रा. भि. जोशी यांची जशी त्यात पत्रे आहेत तशीच काही प्रतिक्रियाही बोलक्या आहेत. डॉ. भीमराव कुलकर्णी यांनी नव्या

यादीची गरज मांडली आहे; तर डॉ. भालचंद्र नेमाडे यांना ती यादी पुरेशी समावेशक वाटली होती. शांता शेळके यांनी 'अशी निवड अंतिम स्वरूपाची कठीण'च असते असे नमूद केले होते.

१७ ऑगस्ट १९८६ रोजी 'महाराष्ट्र टाइम्स' ने आणखी काही प्रतिक्रिया त्याच विषयावर छापल्या. प्रा. म. द. हातकणंगेलकरांनी त्यात ७५ ग्रंथांत मतभेदाला अधिक वाव आहे असे नमूद केले होते. म. श्री. दीक्षित यांनी आणखी काही महत्त्वपूर्ण ग्रंथ सादर केले होते. तर बा. वा. दातार यांनी आणखी ५१ ग्रंथांची भर सुचवलेली होती. डॉ. वि.भि. कोलते यांनी असे मत मांडले होते, की ही सर्वसामान्य वाचकांच्या पसंतीची पुस्तके आहेत. इतरही काही प्रतिक्रिया त्यात आहेत. वाचकांचा प्रतिसाद लाभलेली ही मराठीतील तरी पहिली यादी म्हणावी लागेल. रानडे किंवा कृष्णाजी गाडगीळ यांच्यापासून विचार केला तर जवळजवळ ९० वर्षांनंतर मराठी वाचक इतका जाणीवपूर्वक लक्ष देऊन पाहू शकतो ही सुखद बाब म्हणून नोंदवायला हवी.

३ एप्रिल १९८८ च्या 'महाराष्ट्र टाइम्स' मध्ये शंकर सारडा यांनी एक लेख लिहिला आणि पुन्हा मराठी वाचकांचे एका शिफारस यादीकडे लक्ष वेधले. १९७७ साली डॉ. ॲडलर यांनी विसाव्या शतकातील महान पुस्तके कोणती याची एक यादी तयार केली होती. शंकर सारडा यांना ती तेव्हाही (म्हणजे दहा वर्षांनंतरही) ताजी वाटली होती. त्यामुळे त्यांनी त्यावर लेख लिहिला होता, परंतु त्यास फारसा प्रतिसाद लाभला नाही. इंग्रजी पुस्तके असल्यामुळे हे घडले असावे काय ? तोच प्रकार मानवेंद्रनाथ रॉय यांनी तयार केलेल्या यादीबाबतही झाल्याचे जाणवते.

यादीच्या व्यतिरिक्त 'मला आवडलेले पुस्तक / पुस्तके', 'गेल्या वर्षी वाचलेली पुस्तके', 'काय वाचल', 'माझे वाचन', 'ग्रंथ गौरव', 'ग्रंथ शिफारस', 'लक्षवेधी पुस्तके' अशा वेगवेगळ्या मटा, लोकसत्ता, ललित यांमध्ये प्रकाशित झालेल्या लेखांमधून, आढाव्यांमधून वा सदरांमधून लेखकांनी वाचकांना वाचनाबाबत मार्गदर्शन केलेले आहे. वाचकांना यातूनही शिफारसी प्राप्त झालेल्या आहेत. मात्र या सर्वांचा अभ्यास करून नामवंतांचे विचार विचारात घेऊन, वाचकांच्या गरजा लक्षात घेऊन एक उत्तम 'शिफारस यादी' मराठीत तयार व्हायला हवी. वाचकाचे वय, वाचन विकासाची दिशा, वाचनाचे अभिरुचिसंपन्नतेत व्हावे असे स्थित्यंतर लक्षात घेऊन त्या यादीची रचना करायला हवी आहे. तज्ज्ञ व्यक्ती, वाचक, लेखक व ग्रंथपाल यांनी एकत्र येऊन हे कार्य करायला हवे.

## इंग्रजीतील प्रयोग

इंग्रजीत कसे प्रयोग होतात याची दोन उदाहरणे देतो. त्यावरून आपण अजून किती मागे आहोत याचा अंदाज येईल. यांपैकी पहिले पुस्तक आहे 'Reader's Guide to Women's Studies.'[६] हे पुस्तक Eleanor B. Amico यांनी संपादित केले आहे; तर 'Reader's Guide to Literature in English' [७] हे पुस्तक Mark Hawkins-Dady यांनी संपादित केले आहे.

ही दोन्ही पुस्तके म्हणजे वाचकांना वाचनात मार्गदर्शन करणाऱ्या सूची आहेत. याची रचना वर्णानुक्रमे आकारविल्हे आहे. त्या विषयातले विषय, संज्ञा, लेखक यांच्याविषयीचे वाचन करायचे झाले तर कोणती पुस्तके वाचायला हवीत याची माहिती त्या त्या नोंदीत दिली आहे.



नोंदीची सुरुवात त्या विषयातली पुस्तकांची यादी देऊनच होते. ही यादी देऊन झाली की त्यानंतर त्या त्या पुस्तकाचे महत्त्व संपादकांनी थोडक्यात विशद करून सांगितले आहे. पुस्तकाचे वर्णन वाचून वाचक त्या पुस्तकाकडे वळू शकतो.

या सूचीचा हेतू सांगताना संपादकीयात असे नमूद केले आहे की, "The purpose of the Reader's Gudie to Women's Studies is to provide the reader with brief discussions of some of the best books on over 500 topics and individuals in women's studies."[८]

यावरून हे लक्षात येते, की वाचकांना मार्गदर्शन करताना संपादकांनी किती मेहनत घेतली आहे. एखाद्या विषयावर उत्तम पुस्तके निवडणे ही सोपी गोष्ट नक्कीच नाही, पण ते 'The Best Books' सुचवत आहेत याचाच अर्थ त्यांचे कार्य किचकट झाले असणार. संपादकांनी ते पार पाडले आहे हे कोणतीही नोंद वाचून काढली की लक्षात येते.

मराठीत 'वाचन करा' असे सांगताना अशी साधने आहेत का ? याचा विचार केला जात नाही. खांडेकर, अत्रे, फडके, माडखोलकर वाचा, दळवी, तेंडुलकर वाचा हे सांगणे फसवे आहे. अत्र्यांचे नेमके काय वाचायचे ? दळवी-तेंडुलकरांची कोणती पुस्तके वाचायची ते सांगयला नको का ? हे जसे लेखकांच्या बाबतीत आहे तसेच ते विषयांच्या बाबतीतही आहे. उदाहरणार्थ, 'पौराणिक नाटके' या विषयावर वाचन करायचे झाले तर वाचकाने मराठीतील कोणती पुस्तके वाचायलाच हवीत ते सांगायला हवे. असे झाले तर ती 'वाचक शिफारस यादी' होईल.

## अधिक वाचन यादी आणि शिफारस यादी

अनेकदा विश्वकोश, चरित्रकोश वगैरे साधनांमध्ये नोंदीच्या तळाशी त्या त्या विषयावरील पुस्तकांची यादी देण्यात आलेली असते (उदाहरणार्थ, अनंत जोशी यांनी तयार केलेले चरित्रकोश किंवा गं. दे. खानोलकर यांचे 'वाङ्मय सेवक'चे खंड पहावेत.) कोशांमधील सूची आणि शिफारस सूची यांत सूक्ष्म भेद आहे. तो भेद असा, की कोशांमधील नोंद वाचल्यावर त्या विषयावर अधिक वाचन जर वाचकाने करायचे ठरवले तर त्यास दिशा मिळावी म्हणून ती यादी देण्यात येते. त्यास further reading असे म्हटले जाते तर Reader's guide मधील यादी शिफारस करणारी असते. मराठीत अशी वाचन शिफारस यादी तयार करायची झाली तर त्यासाठी अनेक जाणकारांची मदत घ्यावी लागेल. अशी मदत घेऊन २०० वर्षांच्या मुद्रण काळातील पुस्तकांची शिफारस सूची करणे अत्यावश्यक झाले आहे.

## *संदर्भ*

(१) ताकारवाव, नी. स. प्राचीन पुस्तकालये व अर्वाचीन वाचनालये. 'पंचामृत' मध्ये समाविष्ट. अलिबाग : नव कोंकण प्रकाशन, १९५१, पृ. ९.

(२) गाडगीळ, कृष्णाजी परशुराम. संसारसुख. पुणे : बळवंत गणेश दाभोळकर, १८९३. ३०+३८३+२ पृ.

(३) रानडे, महादेव गोविंद. A note on the Growth of Marathi Literature, 1898. (In The Miscellaneous writings of the Late Hon'ble Mr. Justice M. G. Ranade) भाषांतर, स. गं. मालशे. मुंबई : मराठी संशोधन मंडळ, १९८२. २८-३० पृ.

(४) लिमये, नारायण गंगाधर. प्राथमिक शाळांकरिता वाचनीय पुस्तकांची यादी. मुंबई : बॉम्बे बुक डेपो, १९३१. ४+५५ पृ.

(५) मुंबई सरकार. खेडेगावांतील लहान ग्रंथालयांसाठी योग्य अशा पुस्तकांची यादी. मुंबई : मुंबई सरकार, १९३६. ३६ पृ.

(६) Amico, Eleanor B. (ed.) Reader's Guide to Women's Studies. Chicago & London : Fitzroy Dearbom Pub.; 1998. xxx +732 pp.

(७) Hawkins-Dady, Mark. Reader's Guide to Literature in English. London & Chicago : FD, 1996. xxxix + 970 pp.

(८) तत्रैव (Amico, Eleanor) vii p

❑❑❑

### ग्रंथवाचनाचे व्यसन – २

संस्कृत व इतिहास — हे माझ्या आवडीचे विषय विषय झाले. थोर पुरुषांची चरित्रे मला विशेष आवडत. कॉलेजच्या अभ्यासाकडे पूर्ण दुर्लक्ष झाले. अवांतर ग्रंथ वाचण्यात दिवसचे दिवस जाऊ लागले. गीतेतील निवडक ५० श्लोक एका फलकावर सुवाच्य अक्षरांनी लिहून तो फलक माझ्या खोलीत मी टांगता ठेवला.

१८९४ साली संस्कृत ग्रंथ व इतिहास-ग्रंथ यांच्याबरोबर प्राचीन मराठी ग्रंथ माझ्या वाचण्यात आले. ज्ञानेश्वरी, दासबोध व मुक्तेश्वरी भारत हे प्रथम माझ्या हाती पडले व पैशाच्या अडचणीत असूनही मी हे विकत घेतले. त्यांच्या उत्कृष्ट वेच्यांचेही फलक तयार केले. छांदिष्टपणाच तो ! बाजारातून फलक आणावे, तांबड्या शाईने रेघा माराव्या, कागद चौफेर नटवावा व मध्येच कॉलम (भिंती) पाडून सुवाच्य अक्षरांनी आवडलेले अगर समजलेले श्लोक लिहावे ! रिकामपणी फलक वाचीत असावे. लिहिलेले वाचावे, त्याचे मनन करावे, मननाने अर्थ खुलत जातो, अर्थ खुलत चालला की चित्त अर्थारूढ होऊन आनंद होतो, तेच ते गुणगुणावेसे वाटते, गुणगुणता गुणगुणता पुष्कळसे पाठ होऊन जाते. या अभ्यासक्रमाने – घोकंपट्टी शिवाय – पाठ पाठांतर पुष्कळ झाले. मराठी भाषा ही माझी आई, गीर्वाणवाणी ही माझी आजी व इंग्रजी ही माझी मावशी असे मी म्हणत असतो. इंग्रजी वाङ्मयातूनसुद्धा मला पुष्कळ शिकायला सापडले.

**– चरित्रचंद्र, पृ. ५१, ५२**
**– ल. रा. पांगारकर**



# संकलक (ॲग्रीगेटर) : ई-मासिकांचा मौल्यवान आणि आर्थिक लाभदायी स्रोत

विजय देवधर

*विसाव्या शतकाच्या अखेरीस एका नव्या तंत्रज्ञानाने मानवी जीवनात प्रवेश केला आहे. हे तंत्रज्ञान आता आपणास चांगलेच परिचित झाले आहे ते माहिती-तंत्रज्ञान या नावाने. या माहिती-तंत्रज्ञानाचा झपाट्याने झालेला विकास सर्वच क्षेत्रांत लक्षणीय सुधारणा करणारा ठरला आहे. प्रकाशन व्यवसायाने माहिती-तंत्रज्ञानाचा स्वीकार केल्यामुळे प्रकाशित साहित्यात प्रचंड प्रमाणात वाढ झाली असून त्यात पारंपरिक छापील साहित्यबरोबरच अंकीय स्वरूपातील माहितीचे प्रचंड साठे निर्माण झाले असून त्यांनी एका नव्या व्यवसायास सुरुवात करून दिली आहे. एकविसाव्या शतकात माहिती-तंत्रज्ञानाने प्रभावित आणि ज्ञानाशी निगडित अर्थशास्त्रीय चौकटीत ई-नियतकालिके ही एक अपरिहार्यता ठरली आहे. डी. बटलर यांच्या भाकिताप्रमाणे संगणकीय जाळ्यात उपलब्ध नसणारे नियतकालिक ही कल्पना दुर्मीळ ठरणार आहे. जाळ्यात नसणारे नियतकालिक हे नामशेष होण्याच्या मार्गावर असेल. १९८०च्या सुमारास ई-नियतकालिके ही मे. डायलॉग यांच्यासारख्या माहिती विक्रेत्यांमार्फत जाळ्यात आणली गेली ती पूर्ण रूपात आणि सुरचित अशा स्वरूपात. १९९०च्या मध्यास इंटरनेट ही जागतिक स्तरावरची माहितीची श्रृंखला अस्तित्वात आल्यानंतर या पूर्ण मजकुरांच्या माहिती संचयिकेत चित्रे, नकाशे, रेखाटन, आवाज यांचा समावेश करण्यास सुरुवात झाली. आता सर्वत्र ई-नियतकालिक ही लेखक, शीर्षक, विषय, भाषा यावर शोध घेऊन नेमके लेख हुडकण्याच्या सुविधेबरोबरच पूर्ण लेख आपल्या संगणकावर जसाच्या तसा उतरवून*

*घेण्याची सोय वाचकांना उपलब्ध झाली आहे. या सेवेमुळे आता एक नवी संकल्पना विकसित झाली आहे ती म्हणजे संकलक (ॲग्रीगेटर). या लेखात या संकल्पनेचा परिचय करून देण्यात आला आहे.*

## ई–नियतकालिके

ई–नियतकालिक म्हणजे इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे प्रकाशित आणि वितरित केले जाणारे, अंकीय स्वरूपात साठवलेले नियतकालिक. ज्यातील लेख हे कोठूनही संगणकाच्या साहाय्याने पाहता, वाचता वा उतरवून घेता येतात. हे नियतकालिक कागदाविना आणि भासमान असे म्हटले जाते. छापील स्वरूपातील नियतकालिकाबद्दल असणारे भावनिक नाते बाजूस ठेवून विचार केला तर ई–नियतकालिकांचे अनेक फायदे आहेत. ई–नियतकालिकांच्या प्रकाशनाची सुरुवात अमेरिकन केमिकल सोसायटीने आपली नियतकालिके अंकीय स्वरूपात प्रकाशित करून १९८३ साली केली; तर 'हॉरवर्ड बिझिनेस रिव्ह्यूतील' पूर्ण लेख बिब्लिओग्राफिक रिट्रायव्हल सर्व्हिसेसने (बीआरएस) १९८२ मध्ये अंकीय स्वरूपात उपलब्ध करून दिले. याच्या उपयुक्ततेमुळे यात झपाट्याने वाढ होत गेली आहे. आज जवळजवळ सर्वच आघाडीच्या नियतकालिकांच्या ई–आवृत्त्या उपलब्ध आहेत. कदाचित भविष्यकाळात केवळ ई–आवृत्त्याच प्रसारात राहतील.

## ई–नियतकालिकांचे स्रोत

ई–नियतकालिकांच्या स्रोतांचे चार प्रकारांत वर्गीकरण करता येईल.

(१) मोठे प्रकाशक (२०० हून जास्त नियतकालिके प्रकाशित करणारे),

(२) लहान आणि मध्यम प्रकाशक,

(३) संकलक (ॲग्रीगेटर),

(४) विशेष संकलक (स्पेशल ॲग्रीगेटर).

या चार प्रकारांशिवाय अनेक विद्यापीठे, व्यावसायिक संघटना, निरनिराळे प्रकल्प हे ई–नियतकालिकांचे उत्तम स्रोत आहेत. विषयाधिष्ठित संकेतस्थळे आणि समाईक आवडीची जाळी हीसुद्धा ई–नियतकालिकांचा चांगला स्रोत आहेत.

## संकलक (ॲग्रीगेटर)

शोध घेता येणे शक्य असणारा अंकीय स्वरूपातील आणि मागील अंकांची पण त्याच ठिकाणी उपलब्ध असणारी संचायिका म्हणजे ॲग्रीगेटर किंवा संकलक म्हणता येईल. हा संकलक



निरनिराळ्या प्रकाशकांची ई–नियतकालिके एकाच ठिकाणाहून वाचकांना उपलब्ध करून देतो. संकलक ही कुणी व्यक्ती नसून ती एक व्यापारी संस्था असून पूर्ण लेखांची संचयिका. एका विशिष्ट विषयास वाहिलेली परंतु एक पूर्ण उत्पादन म्हणून वैयक्तिक वर्गणीऐवजी एकत्र वर्गणीत उपलब्ध करून दिली जातात. या वर्गणीत लेखांचा शोध घेणे, लेख पाहणे, लेख आपल्या संगणकावर उतरवून घेणे, स्थानिक जाळ्यांतून ही सुविधा एकापेक्षा जास्त जणांना, निरनिराळ्या ठिकाणांहून पाहण्याची अधिकृत परवानगी संकलकाकडून दिली जाते.

## संकलकाचे फायदे

ई–नियतकालिके संकलकाच्या मार्फत घेण्यात अनेक फायदे आहेत. त्याचा विचार संकलकाची निवड करण्यापूर्वी करणे आवश्यक आहे. ग्रंथपाल, वाचक आणि प्रकाशक या तिघांनाही ते कसे फायदेशीर होते जाणून घेऊ या.

## ग्रंथपाल

संकलक अनेक प्रकाशकांनी प्रसिद्ध केलेली ई–नियतकालिके एकसंध वातावरणात देत असल्याने ग्रंथपालाचा नियतकालिकांच्या प्राप्तीसाठी खर्ची पडणारा वेळ वाचेल. त्या वेळेचा उपयोग इतर महत्त्वाच्या कामांसाठी करता येईल. अतिशय सहजपणे आणि सोप्या पद्धतीने ई–नियतकालिकांतून लेखांचा शोध घेण्याची आणि संदर्भासाठी लागणाऱ्या लेखांच्या प्रतिप्राप्तीची सोय संकलक देत असल्याने आणि वाचक स्वत:च शोध घेऊ शकत असल्याने ग्रंथपालावरचा ताण कमी होण्यास मदत होईल. आपल्या वाचकांच्या माहितीच्या गरजा भागवण्यासाठी मोठ्या प्रमाणात ई–नियतकालिकांची खरेदी करता येईल आणि या संकलनास सुगम प्रवेशाची सुविधा देऊन वाचकांना मदत करता येईल.

## वाचक

वाचकांना आपल्या कामाच्या जागीच एकाच स्रोतातून माहितीचा शोध आणि पुनर्प्राप्तीची सुविधा मिळाल्याने वाचकांचा वेळ वाचेल.

## प्रकाशक

लहान प्रकाशकांना संकलकाशी आपल्याला फायदेशीर ठरणारा करार करून आपल्या सर्व ई–नियतकालिकांना त्याचा वाचकवर्ग मिळविता येईल. वैयक्तिक वर्गणीदारातून फक्त निवडकच ई–नियतकालिकांनाच बाजारपेठ मिळते. खास करून योग्य तो माहितीसाठा स्वीकारणाऱ्या यजमानाची निवड केल्यास ह्या लहान प्रकाशकांना मोठ्या, आघाडीच्या प्रकाशकांना मिळणाऱ्या सवलतीही मिळवता येतील. याउलट मोठ्या प्रकाशकांना त्यांची कमी वापरली जाणारी प्रकाशने वाचकांपर्यंत पोहोचवून त्यांच्यावर होणारा खर्च काही प्रमाणात वसूल करता येईल. आताच्या या

बदललेल्या परिस्थितीत छपाई, जुळणी, वितरण या बाबी ई-नियतकालिक जाळ्यात ठेवणे हे प्रकाशकांचे एक काम आहे.

संकलकाने जास्तीत जास्त ई-नियतकालिके जाळ्यात देण्यास सुरुवात केल्यास ग्रंथालये छापील आवृत्तीची वर्गणी बंद करतील आणि त्यामुळे प्रकाशकांचे आर्थिक नुकसान होणार आहे. यासाठी संकलकाबरोबर ई-नियतकालिकांच्या वर्गणीबाबत योग्य असा करार करावा लागेल. संकलक नियतकालिकांतील सर्वच लेख आपल्या पूर्व लेखसूचीसाठी निवडतील असे नाही, तर केव्हा केव्हा प्रकाशकांनी केलेल्या कराराप्रमाणे संकलकांना पूर्व लेखांच्या निवडीस मर्यादा घातल्या जातात. संकलक प्रकाशकांशी करार करून त्यांची ई-नियतकालिके आपल्या संगणक स्थानावर ठेवतात. तर काही बाबतींत (उदाहरणार्थ, ओविड, ओसीएलसी) एका समाईक माध्यमाद्वारे ई-नियतकालिके ही एकाच सेवाकेंद्रात ठेवून वाचकांना उपलब्ध केली जातात. काही संकलक नियतकालिकांतील लेखांची शीर्षके आणि त्यांचे सारांश यांना मध्यवर्ती केंद्रातून वाचकांना प्रवेश देतात. पूर्ण लेखांची उपलब्धी मात्र प्रकाशकांच्या स्थानावरूनच होते. यातील किमतीचा भाग म्हणजे वर्गणी, छापील व इलेक्ट्रॉनिक प्रकारासाठी जवळपास सारखीच असते. तर दोन्ही प्रकार स्वीकारल्यास वर्गणीत जवळपास सवलत देतात. आता प्रकाशकांकडून ग्रंथालयांसाठी एक नवा पर्याय पुढे आला आहे. यात अनेक ग्रंथालये एकत्र येऊन एकत्र वर्गणी भरणे. नेहमीपेक्षा थोडी जास्त वर्गणी भरून प्रकाशकाच्या सर्वच नियतकालिकांची उपलब्धी. हा प्रकार कन्सॉरशिया म्हणून प्रसिद्ध आहे. आपल्याकडे शास्त्रीय आणि औद्योगिक संशोधन संघटनेच्या निरनिराळ्या प्रयोगशाळांची ग्रंथालये तसेच भारतीय तंत्रज्ञान संस्थांची ग्रंथालये यांनी अशा तऱ्हेची व्यवस्था स्वीकारली आहे. भविष्यकाळात यात किती वाढ होईल ते यांच्या अनुभवावर अवलंबून आहे.

## संकलकांचे प्रकार

संकलकांचे अनेक प्रकार सध्या ज्ञात आहेत. यातील महत्त्वाचा प्रकार म्हणजे प्रकाशकांवर केंद्रीभूत असलेला (उदाहरणार्थ, सायन्स डायरेक्ट), तर काही विषयांवर केंद्रीभूत (उदाहरणार्थ, ओविड, ॲडोनिस) आहेत. काही संकलक पूर्ण लेख व सारांश असे एकत्र माहिती देतात. लेख कोणत्या मासिकातून घेतला आहे ही माहिती संकलक दडवून ठेवतात. मात्र ते कोणती नियतकालिके देऊ शकतात त्याची यादी देतात. ही यादी काहींच्या बाबतीत कायम असते तर काही यात सतत बदल करीत असतात.

## संकलकाची निवड

संकलकाची निवड करताना त्याची खासियत किंवा वैशिष्ट्ये काय आहेत याची माहिती करून घेणे आवश्यक आहे. त्यासाठी कोणती वैशिष्ट्ये विचारात घेतली पाहिजेत की ज्यामुळे योग्य निवडीस मदत होईल ते पाहणे आवश्यक आहे. ती वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे –



### (१) सोयीचा संकलक

प्रत्येक प्रकाशकाशी वेगवेगळा करार करण्यापेक्षा संकलकाशी एकच करार करून ग्रंथालयांना ई-नियतकालिके घेता येतात. यात श्रम आणि वेळ वाचतो. एकाच ठिकाणी ही ई-नियतकालिके असल्याने ती चाळताना अडचण येत नाही. संकलकास प्रकाशकांकडून त्या नियतकालिकातील लेखांचे लेखाधिकार हस्तांतरित झाले आहेत की नाहीत याची खात्री करून घेतली पाहिजे. कदाचित याची किंमत आणि समाविष्टतेची व्याप्ती यामुळे ही वाचकांच्या पसंतीस न उतरण्याची कारणे होऊ शकतात.

### (२) सहज उपलब्धता

संकलक हे काही प्रकाशकांचीच नियतकालिके आपल्या स्थानावर ठेवतात. त्यात बऱ्याचदा विनाशुल्क नियतकालिकांचा समावेश असतो. त्यामुळे वाचकांना हवी असणारी सशुल्क नियतकालिके संदर्भासाठी मिळत नाहीत. त्यामुळे संकलकाची निवड करताना तो कोणकोणत्या प्रकाशकांचे प्रतिनिधित्व करतो हे पाहणे आवश्यक आहे.

### (३) विश्वासार्हता

ई-नियतकालिके वगळणे आणि नवीन नियतकालिके समाविष्ट करणे या प्रक्रिया अनेक संकलक आपल्या वाचकांना पूर्ण सूचना न देता करीत असतात. त्यामुळे त्या वाचकांना या गोष्टी अडचणीच्या ठरतात. नियतकालिकांच्या पुरवठ्यात सातत्य राहत नाही. काही संकलक अशा बदलाची माहिती आपल्या वाचकांना पत्राद्वारे वा ई-मेलने कळवीत असतात. सर्व बदलांची वेळोवेळी माहिती आणि पूर्वसूचना दिल्याने वाचकांना त्याप्रमाणे आपले धोरण ठरविता येते. या गोष्टींबरोबरच आदर्श संकलक कसा ठरवावा याची मार्गदर्शक तत्त्वे विचारात घ्यावी लागतात. ती मार्गदर्शक तत्त्वे अशी :

(१) **आवाका (कंटेन्ट) :** संचयिकेत समाविष्ट नियतकालिकांतील पूर्ण लेख, सारांश आणि शीर्षक यांची सुनियोजित रचना असणे, नियतकालिकांचे प्रस्थापित प्रकाशक, प्रस्थापित नियतकालिके आणि नियतकालिकांच्या मागील खंडांची उपलब्धी या महत्त्वाच्या गोष्टी विचारात घ्यायला हव्यात.

(२) **गुणवत्ता :** संचयिकेत कायम गुणवत्ता राखली जाते का नाही ?

(३) **समर्पकता :** वाचकांच्या गरजेशी सुसंगत असणारी नियतकालिके संचयिकेत आहेत का?

(४) **सादरीकरण :** सहज समजेल, शोधता येईल असा प्रमाणित आराखडा असावा.

(५) **कालानुरूपता :** व्यावहारिकता, नावीन्य, कायम नवीन नियतकालिकांची उपलब्धी असणारी.

(६) **सुलभ शोधप्रक्रिया :** शोधप्रक्रिया ही वापरणाऱ्याला सुलभ, सहज सोपी त्याचप्रमाणे प्रगत वा नमुन्यादाखल अशी असणारी, मदतीची उपलब्धी आहे का ?

(७) **वाचनीयता :** मूळ लेख वाचण्यासाठी त्याचा आकार, रंग, आराखडा हा छापील स्वरूपासारखा असावा.

(८) **स्थिरता / स्थैर्य :** शोधप्रक्रिया, तंत्रज्ञान आणि इतर सेवा यांत सतत बदल नसावा.

(९) **सुलभ छपाई :** पूर्ण लेख छापून घेण्याची सोय असावी.

(१०) **सहज सुलभ चाळण्याची उपलब्धी :** सहजपणे नियतकालिकांतील लेख चाळता आले पाहिजेत.

(११) **किंमत :** ही वाचकांना परवडणारी असावी.

(१२) **मागील खंडांची साठवण आणि उपलब्धी :** जेव्हा गरज भासेल तेव्हा मागील अंकातील लेखांची उपलब्धी सहज व्हावी, तसेच नियतकालिक बंद केले तरी पूर्वीचे खंड उपलब्ध व्हावेत.

(१३) **उपभोक्त्यांची आकडेवारी :** पूर्ण लेख उतरवून घेणे आणि अनुक्रमणिकेचा वापर, सारांश याची आकडेवारी ठेवली जावी.

(१४) **तात्पुरता वापर :** कायमचे सदस्यत्व स्वीकारण्यापूर्वी काही काळ संचयिकेचा तात्पुरता वापर करण्याची सोय असावी.

## निष्कर्ष

संकलकांशी करार करून ग्रंथालयांना आर्थिक लाभ होणार आहे. या करारामुळे वर्गणी भरलेल्या नियतकालिकांपेक्षा वेगवेगळ्या प्रकाशकांची प्रत्यक्ष त्यांच्याशी करार न करता, किती तरी जास्त नियतकालिके त्यांना वापरता येणार आहेत. कमी श्रमांत आणि अपुरे मनुष्यबळ असूनसुद्धा ग्रंथालय आपल्या वाचकांना प्रगत अशा संदर्भसेवा देऊ शकेल.

## *संदर्भ*

(१) हौता (एस.आर.) आणि गीता – ॲग्रीगेटर : ए रिच अँड इकॉनोमिक सोर्स ऑफ ई-जर्नल्स, आयस्लिक बुलेटीन ४९(२), २००४. १११-२१८.

(२) बटलर (डी) – द रायटिंग इज ऑन द वेब फॉर सायस जर्नल्स इन प्रिन्ट, नेचर नंबर ३९७, १९९९. १९५-२००

(३) ओसीएलसी – फर्स्ट सर्च इलेक्ट्रॉनिक कलेक्शन ऑनलाईन एचटीटीपी://डब्ल्यूडब्ल्यूडब्ल्यू, ओसीएलसी. ओआरजी/ओसीएलसी/मेनू/ इको.एचटीएम

❑❑❑



# महाराष्ट्र विधानमंडळ ग्रंथालय : इतिहास, स्वरूप व ग्रंथालय सेवा

दि. श्री. चव्हाण

*गेल्या अंकांमध्ये भारताच्या लोकसभेच्या ग्रंथालयाची विस्तृत ओळख करून देण्यात आली होती. या अंकात महाराष्ट्र विधानमंडळाच्या ग्रंथालयाची ओळख करून दिली आहे ती तेथील ग्रंथपाल दि. श्री. चव्हाण यांनी. या ग्रंथालयातील साहित्याचा वापर करून अनेक अभ्यासकांनी आपले ग्रंथ सिद्ध केले आहेत, तसेच सभागृहातील अभ्यासपूर्ण चर्चेत या ग्रंथालयाचे योगदान फार मोठे आहे. अनंत थोरात, रा. के. लेले अशा विख्यात ग्रंथपालांनी हे ग्रंथालय नावारूपाला आणले आहे. श्री. चव्हाण तोच वारसा पुढे चालवत आहेत.*

## उद्देश

विधानमंडळ ग्रंथालय हे केवळ विधानमंडळाच्या सदस्यांसाठी आहे आणि या दृष्टीने सदस्यांच्या अनेकविध गरजा भागविणे हा या ग्रंथालयाच्या स्थापनेमागील प्रमुख उद्देश आहे.

आपण स्वीकारलेल्या संसदीय शासनप्रणालीचे कार्यकारी मंडळ, विधानमंडळ व न्यायपालिका असे तीन भाग आहेत. कार्यकारी मंडळ पर्यायाने मंत्रिमंडळ हे विधानमंडळाला जबाबदार असते व ते संयुक्त जबाबदारीच्या तत्त्वावर कार्य करते. विधानमंडळाला कार्यकारी शाखेवर सतत नियंत्रण ठेवावे लागते. त्यासाठी विधानमंडळाच्या सदस्यांना तीन प्रकारची कामे करावी लागतात. त्यामध्ये वैधानिक, टीकात्मक आणि आर्थिक म्हणजे शासनयंत्रणेला आवश्यक असणाऱ्या खर्चासाठी आर्थिक तरतुदींना मंजुरी देण्याचे आर्थिक स्वरूपाचे काम करावे लागते असे सामान्यत: मानले जाते. ह्या तिन्ही स्वरूपाची कामे विधिमंडळाला सभागृहाच्या माध्यमातून वा सभागृहाच्या समितींच्या माध्यमांतून करताना विविध प्रकारची माहिती सभागृहामध्ये चर्चेसाठी वा विविध समित्यांच्या बैठकांमध्ये चर्चा विषयात सहभागी होण्यासाठी व त्यातून जनहिताचे

निर्णय, धोरणे वा कार्यक्रम आखण्यासाठी व त्याची योग्य अंमलबजावणी वा कार्यवाही करण्यासाठी विविध प्रकारची अद्ययावत, संक्षिप्त परंतु परिपूर्ण व विश्वासार्ह माहिती सन्माननीय सदस्यांना लागत असते. ती माहिती पुरविण्याचे काम विधिमंडळ ग्रंथालय करीत असते. विधिमंडळाच्या ग्रंथालयाच्या स्थापनेमागील मुख्य उद्देश हाच आहे. त्यासाठी नवनवीन प्रकाशित होणारी उपयुक्त पुस्तके आणि इतर वाचनीय साहित्य इत्यादी प्राप्त करणे, त्यावर तांत्रिक सोपस्कर करणे, त्यांची देवघेव करणे आणि त्यांचे जतन करणे व त्या साहित्याच्या आधारे दोन्ही सभागृहांचे मा. पीठासीन अधिकारी, सदस्य व विधानमंडळाचे अधिकारी आणि कर्मचारी यांना लागणारी पुस्तके, सभागृहाच्या मागील कामकाजाची कार्यवाही वृत्ते (Debates), अहवाल, वृत्तपत्रांमधील कात्रणे व नियतकालिकांमधील लेख, इत्यादी माहिती पुरवून त्यांची संसदीय व मतदारांप्रती असणारी कर्तव्ये व जबाबादाऱ्या परिणामकारकरित्या व समाधानकारकपणे पार पाडण्यासाठी आणि चांगल्या संसदीय प्रथा व परंपरा निर्माण करण्यासाठी व ह्या सर्वांद्वारे संसदीय लोकशाही अधिक समृद्ध करण्यासाठी मा. पीठासीन अधिकारी, सन्माननीय सदस्य, विधिमंडळाचे अधिकारी व कर्मचारी यांना लागणारी सर्व माहिती अपेक्षित वेळेत पुरविणे हा या ग्रंथालय सेवेच्या व्यवस्थेमागील व्यापक हेतू आहे.

## ऐतिहासिक पार्श्वभूमी

महाराष्ट्र विधानमंडळाच्या ग्रंथालयाचा इतिहास पाहता स्वातंत्र्यपूर्व काळात १९२२पर्यंत आपल्याला मागे जावे लागेल. ब्रिटिश कालखंडामध्ये १९१९च्या कायद्याप्रमाणे १९२१ साली त्या वेळेच्या मुंबई प्रांताचे पहिले लोकानियुक्त कायदेमंडळ अस्तित्वात आले. या कायदेमंडळाच्या सदस्यांना वेगवेगळे कायदे करताना त्यावरील चर्चेसाठी सभागृहामध्ये लागणारी आवश्यक ती पुस्तके, अहवाल व अन्य संदर्भसाहित्य उपलब्ध करून देण्यासाठी ग्रंथालयाची आवश्यकता विचारात घेऊन कायदेमंडळाच्या सुव्यवस्थित अशा ग्रंथालयाची स्थापना करण्यासाठी १८ मार्च १९२२ रोजी त्या वेळच्या बॉम्बे लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे प्रेसिडेन्ट सर नारायण गणेश चंदावरकर यांनी पहिली ग्रंथालय समिती स्थापन केली. या समितीच्या शिफारशीनुसार सप्टेंबर १९२२ मध्ये ग्रंथालयासंबंधी एक सुपरवायझरी कमिटी नेमण्यात आली. या ग्रंथालय समितीने ग्रंथालयासाठी लागणाऱ्या आवश्यक पुस्तकांची मा. सभापती व मा. अध्यक्ष यांच्याकडे शिफारस करावयाची इतकेच काम होते. सदर कमिटी पुढे १९२४, १९२७ आणि १९३१ मध्ये पुनर्गठित करण्यात आली. पुढे १९३७ मध्ये बॉम्बे लेजिस्लेटिव्ह कौन्सिलची १९ जुलै १९३७ व २० जुलै १९३७ रोजी अनुक्रमे विधानसभा व विधानपरिषद अशी दोन सभागृहे अस्तित्वात आली. ग्रंथालय मात्र दोन्ही सभागृहांसाठी एकत्रच ठेवण्यात आले. एप्रिल १९४८ मध्ये दोन्ही सभागृहांची एक संयुक्त समिती ग्रंथालयाच्या कारभारावर देखरेख ठेवण्यासाठी नेमण्यात आली.

त्या वेळी मुंबई व पुणे येथे विधिमंडळाची अधिवेशने भरत असत. त्यामुळे १९५५ पर्यंत विधिमंडळाचे ग्रंथालय मुंबई व पुणे येथे कार्यरत होते. मुंबई येथे आताच्या जुन्या संबोधल्या जाणाऱ्या कौन्सिल हॉलमध्ये दुसऱ्या मजल्यावर व पुणे कौन्सिल हॉलमध्ये, आताच्या कमिशनर



ऑफिसमध्ये पहिल्या मजल्यावर ग्रंथालय कार्यरत होते. मुंबई कौन्सिल हॉलमध्ये दुसऱ्या मजल्यावर सदस्यांना ग्रंथालयामध्ये येण्यासाठी लिफ्टची व्यवस्था होती.

१९५६ मध्ये राज्य पुनर्रचना झाली व द्विभाषिक मुंबई राज्य अस्तित्वात आले. १९६० मध्ये द्विभाषिक मुंबई राज्याचा काही भाग गुजरात राज्यात गेला व मराठी भाषकांचे संयुक्त महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. त्या वेळी गुजरात राज्य विधानसभेला या ग्रंथालयातील काही ग्रंथ, अहवाल, इत्यादी हस्तांतरित करण्यात आले. १ मे १९६०पासून हे ग्रंथालय 'महाराष्ट्र विधानमंडळ ग्रंथालय' म्हणून संबोधण्यात येऊ लागले आहे. १९६०पासून नागपूर करारानुसार महाराष्ट्र विधिमंडळाचे एक अधिवेशन नागपूर येथे घेण्यात येते. त्यासाठी नागपूर विधानभवनामध्येही ग्रंथालय काही प्रमाणात प्रस्थापित करण्यात आले आहे. त्यामध्ये विशेषत: आपल्या राज्याच्या दोन्ही सभागृहांची डिबेटस्, लोकसभेची व राज्यसभेची डिबेटस्, आपली बजेट प्रकाशने, गॅझेटस्, रिपोर्टस्, महामंडळांचे व आपल्या विधिमंडळांच्या समित्यांचे रिपोर्टस् या महत्त्वाच्या साहित्याची प्रत्येकी एक प्रत तेथे कायम स्वरूपी व्यवस्थापित करण्यात आलेली आहे. ग्रंथालयासाठी तेथे साधारणत: लागून असलेले दोन हॉल, सुमारे २००० स्क्वेअर फूट इतकी जागा उपलब्ध आहे. सदस्यांसाठी तेथे रीडिंग रूमचीही व्यवस्था आहे. दरवर्षी लागणारे, वर्षभरामध्ये नव्याने आलेले अन्य साहित्य तेथे ट्रंक्समधून नेण्यात येते. त्या वर्षभरातील नवीन साहित्यापैकी आवश्यक ते तेथे ठेवण्यात येऊन अन्य परत मुंबईस आणले जाते, असे सातत्याने सुरू आहे.

मुंबई येथे जुन्या विधानभवनामध्ये १९८०पर्यंत ग्रंथालय व विधिमंडळ कार्यरत होते. १९८१मध्ये विधानमंडळाची विद्यमान नवीन व भव्य वास्तू तयार झाली व १९८१ मध्ये विधानमंडळाच्या २० मजली भव्य प्रशासकीय टॉवरमध्ये ग्रंथालय ५ व्या व ६ व्या मजल्यावर एकूण सुमारे ६००० स्क्वेअर फूट जागेमध्ये प्रस्थापित करण्यात आले आहे.

## स्वरूप

स्वातंत्र्यपूर्व काळात विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या सदस्यांना कायदे करण्यासाठी, सभागृहासमोरील नवीन चर्चेस असणाऱ्या विधेयकांसंबंधी वा सुधारणांसाठी लागणारे अद्ययावत कायदे, हाऊस ऑफ कॉमन्स, हाऊस ऑफ लॉर्डस तसेच, अन्य राज्यांची डिबेटस् याशिवाय सदस्यांना शासनाच्या अन्य खात्यांसंबंधीची, सभागृहासमोरील कामकाजाच्या संदर्भाने चर्चेसाठी लागणारी आवश्यक ती माहिती, सदस्यांच्या लेखी मागणीनुसार संबंधित खात्याच्या सचिवांकडून मागवून उपलब्ध करून देण्यात येत असे. तसेच डिक्शनरीज, एन्सायक्लोपीडियाज, इअर-बुक्स, डिरेक्टरीज, कायदे, नियम, गॅझेटस्, नकाशे आणि अन्य महत्त्वाची प्रासंगिक प्रकाशने व संसदीय घटना-घडामोडी या विषयांना वाहिलेली - (१) पार्लमेंटरी अफेअर्स, (२) जर्नल ऑफ द क्लार्क-ॲट-द-टेबल इन एम्पायर पार्लमेंटस्, (३) इंटरनॅशनल ॲण्ड कंपॅरेटिव्ह लॉ, (४) राऊंड टेबल ही नियतकालिके घेण्यात येत होती.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतामध्ये विनियोजनाचे युग सुरू आहे. त्यामुळे सर्वसाधारण नागरिकांच्या दैनंदिन जीवनामध्ये शासनाशी संबंध येण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच चालले

आहे. साधी विहीर खोदण्यापासून ते मोठे पाटबंधारे प्रकल्प उभारण्यापर्यंत आणि लहान लहान उद्योगांपासून आवाढव्य कारखान्यांची उभारणी करण्यापर्यंत, पिण्याचे पाणी, रस्ते, वीज, जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा, शिक्षण, प्रदूषण नियंत्रण, प्राथमिक आरोग्य सुविधा, महागाईवर नियंत्रण, इत्यादी प्रत्येक ठिकाणी शासनाचा संबंध दिवसेंदिवस अधिक अटळ होऊन बसला आहे. त्याचबरोबर समाजवादी समाजरचनेचे उद्दिष्ट आपण स्वीकारले असल्यामुळे जनतेच्या सामाजिक जीवनातील अनेकविध गोष्टींशी शासनाचा प्रत्यक्ष संबंध येतो. त्यामुळे पूर्वीपेक्षा शासनाच्या कार्यक्षेत्राची व्याप्ती आता फारच विस्तृत प्रमाणावर वाढलेली आहे आणि त्या अनुषंगाने विधानमंडळ सदस्यांच्या जबाबदाऱ्यादेखील तेवढ्याच प्रमाणात वाढल्या आहेत. पर्यायाने विधानमंडळ ग्रंथालयावर सदस्यांना माहिती पुरविण्याची जी जबाबदारी आहे तीत-देखील तुलनात्मकदृष्ट्या वाढ होणे अपरिहार्य आहे. या दृष्टीने आणखी एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे व ती म्हणजे इंग्लंडमध्ये जरी कल्याणकारी राज्याच्या तत्त्वाचा अंगीकार केलेला असला (संदर्भ - ब्रिटन १९७१ पृ. १२२) तरी तेथे भारताप्रमाणे नियोजन नाही ही गोष्ट लक्षात घेता, भारतीय विधानमंडळ ग्रंथालयाची कार्यव्याप्ती, हाऊस ऑफ कॉमन्सच्या ग्रंथालयाच्या कार्यव्याप्तीपेक्षा अधिक व्यापक आहे, असे विधान केल्यास त्यात अतिशयोक्ती होणार नाही.

भारतात चालू असलेले नियोजन गुण आणि तदनुषंगाने अस्तित्वात आलेली विकसनशील व मिश्र अर्थव्यवस्था व या दशकामध्ये आपल्या देशाने नव्याने स्वीकारलेली मुक्त अर्थव्यवस्था, खाजगीकरण तसेच माहितीचा स्फोट आणि माहिती व तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि कल्याणकारी राज्याच्या तत्त्वानुसार चालू असलेले प्रशासन, इत्यादींमुळे शासनाचा व्यवहार विविधांगी (Complex) व तसाच कालव्यय (Time-Consuming) करणारा झालेला आहे. यामुळे निरनिराळ्या उपाययोजना आणि कार्यक्रम यांची आखणी करण्यासाठी व त्यांची अमंलबजावणी करण्याकरिता मंत्र्यांना त्यांच्या खात्यातील तज्ज्ञांच्या व्यावसायिक सल्ल्यावर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहता येते. या उलट मंत्रिगणाखेरीज विधिमंडळातील सत्तारूढ पक्षाचे इतर सदस्य आणि विरोधी पक्षाचे सदस्य यांना असे कोणतेही साहाय्य उपलब्ध नसते. त्यांना जर शासन व्यवहारावर योग्य प्रकारे देखरेख ठेवून, त्यावर अंकुश ठेवण्याचे (Watch-dog Function) आपले कर्तव्य परिणामकारकपणे पार पाडावयाचे असेल तर मंत्र्यांना त्यांच्या खात्यांतील तज्ज्ञांमार्फत जे साहाय्य उपलब्ध होते त्याच स्वरूपाचे साहाय्य काही प्रमाणात तरी विधानमंडळाच्या सदस्यांना उपलब्ध होणे आवश्यक आहे. कोणत्याही सदस्याला ज्या कोणत्या विषयावर आपले लक्ष केंद्रित करावयाचे असते, त्या सर्वच विषयांचा तो तज्ज्ञ होऊ शकत नाही हे खरे असले तरी त्याला ज्या प्रश्नांचे संतुलित (Balanced) आकलन करावयाचे असते किंवा ज्या प्रश्नासंबंधी आधारभूत निर्णय घ्यावयाचा असेल त्या प्रश्नाबाबत संशोधन करण्याची पात्रता अंगी असतानादेखील अनेकदा, केवळ वेळेच्या अभावी त्याला त्यापासून परावृत्त व्हावे लागते ही गोष्ट नजरेआड करून चालणार नाही. सदस्याला सभागृहाच्या कामकाजात भाग घेण्याच्या कामाव्यतिरिक्त त्यांच्या स्वत:च्या मतदारसंघाबाबत, त्यांच्या पक्षाबाबत आणि तो ज्या कोणत्या संसदीय अथवा संसदेतर समित्यांचा सभासद असेल त्या समित्यांबाबत काही बांधील कर्तव्ये असतात ही गोष्ट अनेकदा विसरण्यात



येते. म्हणूनच, संसद वा विधिमंडळ सदस्यांना संशोधनविषयक सेवा उपलब्ध करून देणे म्हणजे त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या अनेकविध जबाबदाऱ्यांपैकी एका महत्त्वाच्या जबाबदारीसंबंधी त्यांच्यावर असलेले ओझे हलके करण्याचाच एक प्रकारे प्रयत्न होय व ही जबाबादारी आजच्या विधिमंडळ ग्रंथालय व माहिती सेवा विभागाची आहे असे म्हटल्यास ते वावगे होणार नाही. इतके या सेवांचे व्यापक व महत्त्वपूर्ण स्वरूप आहे. या बाबीचा आधुनिक दृष्टिकोनातून विचार करताना खालील उतारा विचारात घेणे उपयुक्त ठरेल.

The facilities available to the Opposition and Backbench Members in general should be greatly increased, particularly the expansion of the Library into a Parliamentary work-shop of research and investigation employing many trained research workers who could serve committees. There should thus be the deliberate creation of a 'counter-bureacracy' to whitehall, part complementary and part to break new ground, to obtain information for Parliament.

(Crick, Bernard, Reform of Parliament, Weidenfild and Nicoloson, London, 1964 : Page 194.)

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र विधानमंडळ ग्रंथालयाची सर्वसाधारण माहिती, तेथे दिल्या जाणाऱ्या सेवा व त्यांचा वापर, इत्यादी बाबी पुढीलप्रमाणे आहेत.

## कामाच्या वेळा

नि:सत्र कालावधीत सकाळी १०.४५ ते सायंकाळी ५.३० या कार्यालयीन वेळेत व सत्रकाळात ९.४५ किंवा सभागृहाचे कामकाज सुरू होण्यापूर्वी एक तास ते सायंकाळी सभागृहाचे कामकाज आटोपेपर्यंत किंवा सायंकाळी ६.३० पर्यंत या दोन्हींपैकी जी वेळ नंतरची असेल त्या वेळेपर्यंत ग्रंथालय सेवा उपलब्ध असते. प्रथमपासून ग्रंथालयाच्या कामाच्या वेळा वरीलप्रमाणेच ठरलेल्या आहेत.

## अंदाजपत्रकीय वार्षिक तरतूद

ग्रंथालयासाठी दरवर्षी ग्रंथ, वृत्तपत्रे, नियतकालिके, इत्यादींच्या खरेदीसाठी व ग्रंथ, अहवाल व नियतकालिके, इत्यादींच्या बांधणीसाठी सध्या रु. १० लाख इतकी अंदाजपत्रकीय तरतूद उपलब्ध आहे. उपलब्ध झालेल्या माहितीनुसार १९६६ पासून रु. २०,०००/-; १९७५ पासून रु. ५०,०००/-, १९९० पासून रु. ५ लाख व १९९६ पासून रुपये १० लाख अशी या अर्थसंकल्पीय वार्षिक तरतुदीमध्ये वाढ होत गेली आहे. वृत्तपत्रे, नियतकालिके, अहवाल व पुस्तके यांच्या दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या किमती विचारात घेऊन व प्रकाशित होणारे विविध विषयांवरील उपयुक्त विपुल साहित्य विचारात घेऊन सदर मर्यादा वाढविण्यात आलेली आहे.

या ग्रंथालयाच्या वार्षिक तरतुदीमधूनच दोन्ही सभागृहांचे मा. पीठासीन अधिकारी, विरोधी पक्ष नेते व अधिकारी यांच्या निवासस्थानी व कार्यालयामध्ये देण्यात येणारी वृत्तपत्रे व नियतकालिके यांच्यावर होणारा खर्च भागविण्यात येतो. हा खर्च दरवर्षी सुमारे दोन लाखांपर्यंत

होतो आहे. ग्रंथालयासाठी लागणारी स्टेशनरी मात्र सचिवालयाच्या एकत्रित तरतुदीमधून घेण्यात येते.

## ग्रंथालयाचे प्रशासन व कर्मचारी वर्ग

विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांसाठी ग्रंथालय एकच आहे. या विभागाच्या दैनंदिन कामाची सर्व व्यवस्थापकीय जबाबदारी ग्रंथपाल, माहिती व संशोधन अधिकारी यांच्यावर असून संपूर्ण प्रशासकीय नियंत्रण विधानमंडळाचे प्रधान सचिव (१) यांचे आहे. एकूण प्रशासकीय व व्यवस्थापकीय रचना पुढीलप्रमाणे आहे.

**ऑर्गनायझेशनल चार्ट**

**प्रधान सचिव** (१)

**ग्रंथपाल, माहिती व संशोधन अधिकारी** (संख्या १)

**उपग्रंथपाल तथा संशोधन सहायक** (१) **पद्धती विश्लेषक** (१)

**सहायक** (सामान्य अप्रशिक्षित -५) **तांत्रिक सहायक** (प्रशिक्षित-४) **कार्यक्रम आयोजक** (१)

**लिपीक**

(सामान्य अप्रशिक्षित -६)

**टंकलेखक** (१)

**दप्तरी** (अप्रशिक्षित-२)

**शिपाई** (१)

**हमाल** (३)

याप्रमाणे सध्या २६ कर्मचारी कार्यरत आहेत. ग्रंथालयाच्या कामाचा व्याप कालौघात सर्व दृष्ट्या वाढत गेला त्या प्रमाणात ग्रंथालयाचे मनुष्यबळ मात्र अधिक वाढलेले दिसत नाही.



१९६६ मध्ये एकूण ९ कर्मचारी कार्यरत होते, तर १९७५ मध्ये १८, १९९० मध्ये २० कर्मचारी आणि१९९७ पासून एकूण २६ कर्मचारी ग्रंथालय विभागामध्ये सेवा देण्याचे काम करीत आहेत. मात्र यामधील ग्रंथपाल, उपग्रंथपाल व ४ तांत्रिक सहायक व संगणक कक्षातील विश्लेषक व प्रोग्रॅमर वगळता अन्य सर्व कर्मचारी हे अप्रशिक्षित आहेत हे आवर्जून लक्षात घेण्यासारखे आहे. चार तांत्रिक सहायक व विश्लेषक आणि कार्यक्रम आयोजक ही १९९७ पासून नवीनच पदे निर्माण करण्यात येऊन त्या त्या क्षेत्रातील प्रशिक्षित कर्मचारी त्या पदांवर नेमण्यात आले आहेत. मात्र अन्य सर्व कर्मचारी हे अप्रशिक्षित तर आहेतच; परंतु त्यांची ग्रंथालयामधून विधानमंडळ सचिवालयाच्या अन्य कामकाजांच्या विभागांमध्ये, कक्षांमध्ये वारंवार बदली होत असते. त्याचे दुष्परिणाम ग्रंथालय सेवेवर होतात हेही विदारक सत्य आहे.

## ग्रंथ व इतर वाचनसाहित्य संग्रह

महाराष्ट्र विधानमंडळ ग्रंथालयाच्या संग्रहामध्ये ग्रंथ व ग्रंथेतर वाचनसाहित्य त्यामध्ये आपल्या विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांची, संसदेच्या दोन्ही सभागृहांची, अन्य काही राज्यांच्या विधानसभा/ परिषद यांची, तसेच अन्य काही देशांच्या संसदाच्या सभागृहांच्या कामकाजाची कार्यवाही वृत्ते (Proceedings), राज्य व केंद्र शासनाचे, विशेष चौकशी समित्यांचे, विधिमंडळे व संसदेच्या समित्यांचे, आयोगांचे अहवाल, राज्य व केंद्र शासनाची राजपत्रे, नियतकालिकांचे बांधीव खंड, इत्यादी साहित्य संग्रही आहे.

## ग्रंथ

विधानमंडळाच्या ग्रंथालयामध्ये नैसर्गिक विज्ञाने व सर्वसाधारण असणारे ललित वाङ्मय वगळता कायदेविषयक राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कृषी तसेच घटना व संसदीय विषयांवरील पुस्तके, वार्षिके, ज्ञानकोश, शब्दकोश आदी सर्व ज्ञानशाखांना व्यापणारी उपयुक्त पुस्तके महाराष्ट्र विधानमंडळाच्या संग्रही आहेत. त्यामध्ये ग्रंथालयाच्या वार्षिक तरतुदीमधून खरेदी केलेले व अधिपरीक्षक पुस्तके व प्रकाशने तसेच संसद वा अन्य राज्य विधिमंडळे यांच्याकडून मोफत प्राप्त झालेल्या ग्रंथांचा समावेश आहे. ग्रंथालयामध्ये अशा खरेदी ग्रंथांची संख्या ४७,००० आहे.

राज्यशासनाच्या अधिपरीक्षक पुस्तके व प्रकाशने या विभागाकडे परीक्षणासाठी आलेली पुस्तके त्यांचे काम झाल्यानंतर दर तीन महिन्यांची त्यांच्याकडील पुस्तकांची यादी विधानमंडळ ग्रंथालयाकडे पसंतीसाठी पाठवितात. पुरेशा जागेअभावी त्यामधील उपयुक्त पुस्तकेच त्यांच्याकडून विधानमंडळ ग्रंथालयासाठी मागवून घेण्यात येतात, अशी प्रथा सुरू आहे. अशा भेटीदाखल आलेल्या पुस्तकांची संख्या सुमारे २०,००० आहे.

## कार्यवाही वृत्ते (प्रोसिडिंग्ज), अहवाल (रिपोर्टस्), राजपत्रे (गॅझेटस्) इत्यादी

विधानमंडळाच्या ग्रंथालयामध्ये महाराष्ट्र राज्य विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या कामकाजाची १८६२ पासूनची कार्यवाही वृत्ते, भारताच्या संसदेची १८५४ पासूनची व अन्य काही राज्यांच्या व अन्य देशांच्या संसदांच्या सभागृहातील कामकाजांची कार्यवाही वृत्ते संग्रही आहेत.

त्यामध्ये ब्रिटिश संसदीय इतिहासासंबंधीचे १०६६ ते १८०६ पर्यंतचे कोबेटस् पार्लमेंटरी हिस्ट्रीचे सर्व खंड, त्याचप्रमाणे कोबेट व हॅनसार्ड यांनी संपादित केलेले १८०३ ते १९०० पर्यंतचे आणि त्यानंतरचे, १९०१ ते १९१० पर्यंतचे हाऊस ऑफ कॉमन व हाऊस ऑफ लॉर्डस या दोन्ही सभागृहांचे ब्रिटिश शासनाकडून प्रसिद्ध केलेले सर्व डिबेटस् साधारणत: १९८२ पर्यंतचे उपलब्ध आहेत. भारतातील संसदेचे ग्रंथालय सोडले तर अन्यत्र हा संग्रह क्वचितच आढळेल. याशिवाय ब्रह्मदेश, सिंध प्रांत, न्यूझिलंड, नेदरलँड, ऑस्ट्रेलिया अशा काही देशांचीही डिबेटस् उपलब्ध आहेत.

महाराष्ट्र विधानमंडळाची कार्यवाही वृत्ते संपादित करण्याचे काम हे विधिमंडळाच्या कार्यवाही संपादकांच्या कार्यकक्षेमध्ये येते. त्यांच्या विभागाकडूनच या कार्यवाही वृत्तांसाठी शेवटी विषयनामाच्या अद्याक्षरानुक्रमे व सदस्यांच्या आडनावानुक्रमे अनुक्रमणिका तयार करून देण्यात येते. अनुक्रमणिकांचे खंड मूळ कार्यवाही वृत्त प्रकाशित झाल्यानंतर स्वतंत्ररित्या, अधिवेशनानुक्रमे प्रकाशित केले जातात.

याशिवाय ग्रंथालयामध्ये शासनाच्या विविध खात्यांचे , विधिमंडळ व संसदीय समित्यांचे, संयुक्त चिकित्सा समित्यांचे अहवाल, चौकशी समित्यांचे, आयोगांचे अहवाल, अर्थसंकल्पीय सर्व प्रकाशने, सुमारे १९२७ पासूनची भारत सरकारची व महाराष्ट्र शासनाची राजपत्रे सर्व भाग उपलब्ध आहेत. तसेच संसदीय विषयांना वाहिलेल्या काही नियतकालिकांचे अंक कायमस्वरूपी उपलब्ध व्हावेत म्हणून बांधणी करून घेतलेले आहेत.

वरील सर्व ग्रंथ व अन्य वाचन साहित्यापैकी फक्त खरेदी केलेले ग्रंथ रितसर नोंदणी केलेले व वर्गीकरण (ड्युई डेसिमल क्लासि. आ. २० वी), तालिकीकरण (ॲंग्लो अमेरिकन कॅटलॉगिंग कोडप्रमाणे) वा अन्य तांत्रिक सोपस्कार करून व्यवस्था लावण्यात आलेली आहे. मात्र, अधिपरीक्षक पुस्तके व प्रकाशने यांच्याकडून मोफत प्राप्त झालेल्या ग्रंथांवरील तांत्रिक सोपस्कार पूर्ण नसून मनुष्यबळाअभावी ते काम अपूर्ण आहे. ही सर्व पुस्तके ढोबळ मानाने विषयानुसार वेगळी करून रॅकवर ठेवण्यात आलेली आहेत.

तसेच सर्व कार्यवाही वृत्ते त्या त्या सभागृहाची, कालानुक्रमे लावण्यात आलेली आहेत. सर्व अहवाल विषयवार रॅकवर ठेवण्यात आलेले आहेत. राजपत्रे भागवार व कालानुक्रमे रॅकवर लावण्यात आलेली आहेत. विधिमंडळ व संसदेच्या सर्व समित्यांचे अहवाल त्या त्या समित्यांनुसार, महामंडळांचे अहवाल महामंडळानुसार कालानुक्रमे लावण्यात आलेले आहेत.



एकूण ही व्यवस्था कामकाजाच्या सोईनुसार ढोबळ मानाने लावण्यात आलेली आहे. ह्या सर्व साहित्यावरील तांत्रिक सोपस्कार मनुष्यबळाअभावी करण्याचे काम अपूर्ण आहे. एकूण संग्रह पुढीलप्रमाणे आहे.

### ग्रंथालय संग्रह

ग्रंथालयामध्ये जानेवारी २००० अखेर.

(१) **पुस्तके** (खरेदी ४७,००० + विनामूल्य भेट = २०,०००) ६७,०००

(२) **ग्रंथेतर साहित्य :** (१ लाखाच्या वर)

**(१) कार्यवाही वृत्ते**

महाराष्ट्र विधानसभा, (१८६२ पासूनची)
महाराष्ट्र विधानपरिषद,

लोकसभा,
राज्यसभा, (१८५४ पासूनची)

**(२) हॅनसार्ड डिबेटस्**

(हाऊस ऑफ कॉमन्स व लॉर्डसच्या १०६६ पासूनचा इतिहास व १८०३ पासून १९८२ पर्यंतची व अन्य काही देशांची आणि अन्य काही राज्य विधिमंडळांची १९८२ पर्यंतची डिबेटस् उपलब्ध आहेत.

**(३) राजपत्रे**

| | |
|---|---|
| महाराष्ट्र शासन | १९२३ पासून |
| भारत सरकार | १९२७ पासून |

**(४) समित्यांचे, आयोगांचे अहवाल**

राज्य विधानमंडळ, संसद विशेष समित्या व आयोग

**(५) निवडक नियतकालिकांचे बांधीव खंड –**

(संसदीय विषयांवरील नियतकालिके, लोकराज्य, इत्यादी)

एकूण संग्रह – १,६७,०००/–

म्हणजे एकूण १,६७,००० इतके ग्रंथ व ग्रंथेतर संदर्भसाहित्य ग्रंथालयाच्या संग्रही आहे. हे सर्व साहित्य विधानभवनाच्या ५ व्या व ६ व्या मजल्यावर उपलब्ध आहे. ग्रंथालयाचे हे दोन्हीही मजले वातानुकूलित आहेत.

## वृत्तपत्रे व नियतकालिके

ग्रंथालयामध्ये सध्या राष्ट्रीय, राज्य व जिल्हा पातळीवरील सुमारे ८० च्या वर वृत्तपत्रे व १५० च्या वर नियतकालिके घेण्यात येतात. त्यांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| *तपशील* | *वर्गणीद्वारे* | *भेटीदाखल* | *एकूण* |
|---|---|---|---|
| *वृत्तपत्रे* | *३६* | *५०* | *८६* |
| **नियतकालिके** | | | |
| साप्ताहिके | ३२ | ३ | ३५ |
| पाक्षिके | ८ | ५ | १३ |
| मासिके | ४५ | ५ | ५० |
| द्वैमासिके | ५ | ... | ५ |
| त्रैमासिके | २६ | ... | २६ |
| संकीर्ण | ... | २१ | २१ |
| **एकूण नियतकालिके** | **११६** | **३४** | **१५०** |

ही ८० वृत्तपत्रे व १५० नियतकालिके विधानभवनाच्या ६ व्या मजल्यावरील खोली क्रमांक ६०२ मध्ये सदस्यांच्या उपयोगासाठी उपलब्ध आहेत. मुंबईमधून प्रसिद्ध होणाऱ्या प्रमुख १५ वृत्तपत्रांच्या व राष्ट्रीय स्तरावरील ५ वृत्तपत्रांच्या फाईल्स ५ वर्षेपर्यंत ठेवण्यात येतात. संसदीय विषयाला वाहिलेली सुमारे १० नियतकालिके कायमस्वरूपी ठेवण्यात येतात. अन्य नियतकालिकांमधील व वृत्तपत्रांमधील महत्त्वाचे लेखच तेवढे काढून कायम संदर्भासाठी ठेवण्यात येतात.

## ग्रंथ देवघेव

ग्रंथालयामध्ये घेण्यात येणारे ग्रंथ व इतर वाचनीय साहित्य हे साधारणत: कायदा, विधिविधान, राज्यशास्त्र व लोकप्रशासन, संसदीय प्रथा व पद्धती, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, धर्म, कृषी, चरित्र, आत्मचरित्र, इत्यादी तसेच वार्षिके, ज्ञानकोश, इत्यादी सर्व ज्ञानशाखांना व्यापणारे आहे.

सदर ग्रंथ ग्रंथालयाच्या नियमांनुसार सदस्यांना देण्यात येतात. साधारणत: सदस्यांना एका वेळेस दोन पुस्तके घेता येतात. घेतलेली पुस्तके परत करण्याच्या बाबतीत अधिवेशनाच्या काळात सात दिवसांत तर अधिवेशन नसेल त्या काळात १५ दिवसांत परत करावीत असे



अपेक्षित आहे. अत्यंत किमती व दुर्मीळ पुस्तके वेळीच परत न केल्यास व स्मरणपत्र पाठविल्यानंतरही जर सदस्यांनी पुस्तके परत केली नाहीत तर त्या पुस्तकाच्या किमतीएवढी रक्कम वारंवार कळवूनही न भरल्यास अंतिमत: किंवा अशी रक्कम जमा झाल्याशिवाय त्यांना ना हरकत प्रमाणपत्र दिले जात नाही व त्याशिवाय त्यांना पेन्शन मिळत नाही. प्रसंगी सदस्यांच्या पुढील महिन्याच्या पगारातूनही ती वसूल केली जाते. मात्र संदर्भ ग्रंथ ग्रंथालयाबाहेर नेता येत नाहीत तर असे दुर्मीळ व मौलिक संदर्भ ग्रंथ सदस्यांनी ग्रंथालयांमध्ये पाहावेत अशी अपेक्षा आहे.

## वाचन कक्ष

सदस्यांना त्यांच्या सभागृहातील भाषणांच्या तयारीकरिता ग्रंथालयामध्ये बसून काही टिपणे काढता यावीत, अभ्यास करता यावा, संदर्भ पाहता यावेत जेणेकरून, त्यांची सभागृहातील कामगिरी अभ्यासपूर्ण व उपयुक्त व्हावी या दृष्टीने सुसज्ज, प्रशस्त व वातानुकूलित वाचन कक्ष ग्रंथालयाच्या ६ व्या मजल्यावर कक्ष क्र. ६०३ मध्ये उपलब्ध आहे. सदस्यांनी त्याचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा हा यामागे हेतू आहे व त्याचा सदस्य लाभ घेतात. मा. शरद पवार, मा. शिवाजीराव पाटील–निलंगेकर, मा. मनोहर जोशी, मा. रामराव आदिक यांच्यासारखे वरिष्ठ नेतेही गरजेनुसार तास–दोन तास सलग या वाचनकक्षामध्ये बसून संदर्भ पाहून लाभ घेताना वारंवार अनुभवास येते.

## ग्रंथालयामधून देण्यात येणाऱ्या विविध संदर्भसेवा

सदस्यांना सभागृहातील त्यांचे अंगीकृत कर्तव्य पार पाडण्यासाठी ज्या विषयांचा अभ्यास किंवा चर्चेसाठी पूर्वतयारी करावयाची असेल त्यासाठी ग्रंथालयाकडून त्यांना पुस्तके, वृत्तपत्रकात्रणे, नियतकालिकांतील लेख, विविध प्रकाशनांतील सांख्यिकीय माहिती, कार्यवाही वृत्ते, आदी उपलब्ध करून देण्यात येतात. अशा सेवांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

## वृत्तपत्र–कात्रणे सेवा विभाग

सदस्यांना सभागृहात सुविहितपणे व प्रभावीपणे काम करता यावे या दृष्टीने उपयुक्त असे संदर्भ मिळण्यासाठी वृत्तपत्र कात्रणांचा स्वतंत्र विभाग आहे. विधिमंडळाच्या ग्रंथालयामध्ये महाराष्ट्रातील बहुतेक सर्व प्रमुख वृत्तपत्रे, जिल्हा वृत्तपत्रे व नियतकालिके येतात. प्रत्येक जिल्ह्यातील किमान एक तरी वृत्तपत्र मोफत येत असते. सुमारे ८० वृत्तपत्रे व १५० नियतकालिकांमधील विशेष लेख, संपादकीय व महत्त्वाच्या बातम्यांची पाहणी करत असताना भविष्यात सभागृहात उपस्थित होऊ शकेल अशा अंदाजाने प्रचलित विषयांवरील उपयुक्त बातम्या, लेख कापून घेऊन खास हेतूने तयार केलेल्या फोल्डर्समध्ये कालानुक्रमे एकत्रित ठेवण्यात येतात. प्रत्येक कात्रणावर वृत्तपत्राचे नाव, दिनांक व विषय क्रमांक लिहिण्यात येतो. सदस्यांच्या मागणीनुसार संबंधित विषयावरील माहिती त्वरित देण्यात येते.

ह्या सेवेमुळे एखाद्या महत्त्वाच्या प्रश्नासंबंधीची उदाहरणे मुंबईतील ४० लाख झोपडपट्टी-वासीयांच्या निवासाची समस्या किंवा मुंबईतील जुन्या, पडक्या इमारतींची समस्या, मुंबईतील वाहतुकीच्या कोंडीचा, वाढत्या प्रदूषणाचा प्रश्न असेल, तसेच महिलांवरील अत्याचार, राज्यातील बालमजुरांचा प्रश्न किंवा राज्यातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न, वीज दरवाढीची किंवा खंडित वीजपुरवठ्याची समस्या, अवर्षण, अतिवृष्टी, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, त्यांच्या कर्जाचे प्रश्न, महागाई वा पिण्याच्या पाण्याची व स्वस्त धान्य वितरणाची समस्या, रॉकेल टंचाई किंवा रॉकेलचा काळाबाजार, विभागीय विकासाचे प्रश्न, शाळा-महाविद्यालयाचे प्रवेशाचे प्रश्न, इत्यादी अनेकविध प्रचलित सार्वजनिक महत्त्वाच्या विषयांवरील, समस्यांवरील अद्ययावत माहिती सदस्यांना अविलंब उपलब्ध होते व त्याआधारे त्यांना आपला विषय सभागृहामध्ये अधिक प्रभावीपणे मांडण्यास व त्या समस्येला न्याय देण्यास निश्चित मदत होते.

## सांख्यिकीय माहिती

अनेकदा सदस्यांना बोलण्यासाठी सांख्यिकीय माहितीचीही आवश्यकता असते. अशी सांख्यिकीय माहिती ग्रंथालयातर्फे संकलित करून सदस्यांना वेळेत पुरविण्यात येते. उदाहरणार्थ, राज्यातील घरगुती वापराच्या वाढत्या वीजदराबाबतची चर्चा सभागृहात असेल तेव्हा इतर राज्यांमध्ये असणाऱ्या वीजदरांची माहिती किंवा राज्यातील वृक्षतोड व जंगलसंपत्तीचा ऱ्हास व त्यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडून त्याचा पर्जन्यवृष्टीवर होणारा परिणाम हा विषय चर्चेस असेल तर एकूण वनक्षेत्र, गेल्या काही वर्षांतील पर्जन्यवृष्टीचे प्रमाण, भूगर्भातील खालावत गेलेली पाण्याची पातळी, इत्यादी सांख्यिकीय माहिती, तसेच राज्याची औद्योगिकीकरणातील पिछेहाट किंवा बिघडलेली आर्थिक स्थिती याविषयी सभागृहामध्ये आलेल्या ठरावावरील चर्चेसाठी अन्य राज्यांच्या औद्योगिकीकरणासंबंधीची वा आर्थिक स्थितीविषयी, त्यांची कर्जे, तुटीचे अर्थसंकल्प, इत्यादींविषयी माहिती अधिकृत साधनांतून संक्षिप्त स्वरूपामध्ये सदस्यांना देण्यात येते. उसाच्या व कापसाच्या दराबाबत चर्चा होणार असल्यास राज्यातील एकूण क्षेत्रापैकी ऊसक्षेत्र किती, उसाचे वार्षिक उत्पादन किती टन, गतवर्षी किती साखर तयार झाली होती, एकरी उत्पादनासाठी किती खर्च येतो. शेतकऱ्यास मागील साली देण्यात आलेले दर व सध्याचे दर यांतील तफावत व त्याबाबत शासनने द्यावयाची मदत, इत्यादींबाबतची माहिती सदस्यांना अधिकृत साधनांतून संक्षिप्त स्वरूपात विनाविलंब पुरविण्यात येते. विशेष म्हणजे सदस्य प्रश्न विचारण्यासाठी, किंबहुना मुख्यमंत्रीसुद्धा उत्तरे देण्यासाठी, बऱ्याच वेळा सभागृहातून चिठ्ठी पाठवून अशी माहिती मागवितात व ती त्यांना देण्यात येते. अशा स्वरूपाची, विशिष्ट वेळेच्या बंधनामध्ये वारंवार पुरवावी लागणारी अद्ययावत माहिती सेवा राज्यातील अन्य कोणत्याही ग्रंथालयाकडून अपेक्षिली जात नाही. विधिमंडळ ग्रंथालयाच्या या विभागाकडून तशी सेवा सदस्यांना पुरविण्यात येते.

सामान्यत: इतर शैक्षणिक, सार्वजनिक व अन्य संस्थांच्या ग्रंथालयाकडे येणारे त्यांचे वाचक व विधानमंडळ ग्रंथालयाचे वाचक म्हणजे सन्माननीय सदस्य यांमध्ये प्रामुख्याने तफावत आहे. ह्या ग्रंथालयाचे वाचक विशेष सामाजिक दर्जा असणारे लोकप्रतिनिधी असतात. त्यांना



सभागृहातील कामाकरिता पुस्तकांची वा इतर साहित्याची जी गरज भासते ती अगदी त्वरित भागवावी लागते. सदस्यांना स्वत:ला कॅटलॉग, सूच्या, याद्या वगैरे पाहण्यास सहसा वेळ नसतो. त्यामुळे संबंधित विषयावरील आवश्यक ती पुस्तके, कात्रणे वा सांख्यिकीय माहिती काढून द्या अशीच सदस्यांची मागणी असते. अन्य ग्रंथालयांना द्याव्या लागणाऱ्या सेवा व विधिमंडळ ग्रंथालयास द्याव्या लागणाऱ्या सेवा यांमध्ये प्रामुख्याने हा फरक आहे. त्यामुळे सातत्याने आणि अत्यंत जागरूक राहून सदस्यांना लागणारी माहिती या ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांना संग्रही तयार ठेवावी लागते व ती तशी ठेवली जाते.

## सभागृहातील कामकाजाविषयक संदर्भ

सदस्यांना अनेकदा पूर्वी सभागृहात निरनिराळ्या महत्त्वाच्या झालेल्या चर्चा, अशासकीय ठराव, प्रस्ताव, लक्षवेधी सूचना, अल्पकालीन चर्चा, विधेयकांवरील चर्चा, मंत्र्यांनी केलेली निवेदने, शासनाच्या एखाद्या नवीन धोरणाबाबतची चर्चा, इत्यादींबाबत माहिती हवी असते. अशी माहिती सदस्यांना त्वरित देण्यासाठी ग्रंथालयामध्ये त्या त्या विषयांच्या नोंदी दर्शविणाऱ्या अद्ययावत फाईल्स तयार करण्यात आल्या आहेत. त्याप्रमाणे सदस्यांना लागणारी माहिती त्वरित उपलब्ध करून देण्यात येते. उदाहरणार्थ, मार्च-एप्रिल १९९७ च्या अधिवेशनामध्ये विद्यमान शासनाच्या खाजगीकरणाद्वारे काम करण्याच्या कार्यपद्धतीवर विरोधी सदस्यांचा टीकेचा सूर होता, त्या संदर्भात मा. मुख्यमंत्र्यांनी पूर्वीच्या सरकारने खाजगीकरणाच्या धोरणाच्या सभागृहात केलेल्या समर्थनाविषयीची माहिती मा. मुख्यमंत्र्यांनी ग्रंथपालांकडे सभागृहातून चिठ्ठी पाठवून मागितली असता ती त्वरित देण्यात आली. त्यामुळे त्या आधारे खाजगीकरणाच्या धोरणाबाबत आताच्या विरोधी सदस्यांनी तेव्हा सत्ताधारी असताना समर्थनार्थ केलेल्या चर्चेचे संदर्भच मा. मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहात भाषणामधून कौशल्याने वापरले. त्यामुळे विरोधकांना नमते घ्यावे लागले. त्यानंतर त्या संदर्भातील चर्चेमध्ये विरोधासाठी विरोध हा चर्चेचा रोख न राहता त्याला विधायक स्वरूप प्राप्त झाले आणि चर्चा अर्थपूर्ण व लाभदायी झाली. कार्यवाही वृत्तातील अशा स्वरूपाच्या वेळीच दिलेल्या नेमक्या संदर्भाचा एखाद्या विषयाला योग्य न्याय देण्यासाठी उपयोग होतो हे दिसून येते. अशा प्रकारचे मागील कार्यवाही वृत्तातील संदर्भ हे सभागृहात अधिक प्रमाणात मानले जातात व त्यामुळे एका अर्थाने कामकाज सुरळीत होण्यासही मदत होते.

## अद्ययावत महाराष्ट्र अधिनियम

विधानमंडळात हे कायदे संमत करणारे सभागृह आहे. सदस्यांना संदर्भासाठी लागणारे सर्व महत्त्वाचे अधिनियम अद्ययावत ठेवणे हे एक महत्त्वाचे तसेच एका दृष्टीने अतिशय तांत्रिक स्वरूपाचे असे काम आहे. मूळ अधिनियमात वेळोवेळी बदल किंवा सुधारणा करण्यात येतात आणि हे सर्व बदल किंवा सुधारणा मूळ अधिनियमात योग्य त्या ठिकाणी समाविष्ट करून तो अधिनियम अद्ययावत ठेवणे अत्यंत आवश्यक असते. हे काम काटेकोरपणे व जागरूकतेने करावे लागते.

ग्रंथालयामध्ये **महाराष्ट्र अधिनियम** या कायद्याच्या संहितेच्या १ ते ९ खंडांच्या प्रत्येकी १० प्रती ज्या त्या वेळी म्हणजे एखादा नवीन कायदा वा कायद्याला सुधारणा दोन्ही सभागृहांमध्ये बिलाच्या माध्यमातून चर्चेद्वारे मंजूर झाल्यानंतर ते मा. राज्यपालांकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आल्यानंतर राज्यपालांनी त्यास मान्यता दिल्यानंतरच त्याची गॅझेटमध्ये प्रसिद्धी होते व त्याचे कायद्यात रूपांतर होते. त्याच दिवशी सदर सुधारणा किंवा नवीन कायदा महाराष्ट्र कोडमध्ये समाविष्ट करून कोडच्या सर्व प्रती अद्ययावत करण्यात येऊन संदर्भासाठी ठेवण्यात येतात. केंद्रीय अधिनियमांसाठी ए. आय.आर. (All India Reporter) हे ३५ व्हॉल्यूम्सचे प्रकाशन ग्रंथालयामध्ये उपलब्ध आहे. सदर संहिता सदस्यांना ग्रंथालयात बसून पाहण्यासाठी उपलब्ध करून दिल्या जातात. सध्या याची ५वी आवृत्ती प्रकाशित होत आहे.

## संशोधकांना संदर्भसाहाय्य

एखाद्या विशिष्ट विषयाचा विशेष अभ्यास करणारे संशोधक किंवा पीएच.डी. चा अभ्यास करणारे संशोधक यांना त्यांच्या विषयांच्या अभ्यासासाठी लागणारे उपलब्ध संदर्भ रीतसर पूर्वमान्यता घेऊन या ग्रंथालयातून दिले जातात. अनेक संशोधकांनी या ग्रंथालयातील दुर्मीळ संदर्भसाहित्याचा लाभ घेतला असून डॉक्टरेटस् मिळविल्या आहेत. विविध लेखकांनी, अभ्यासकांनी विविध पुस्तके लिहिली आहेत. उदाहरणार्थ, महाराष्ट्र राज्याचे निवृत्त मुख्य सचिव एन रघुनाथन यांचे 'द मेन मॅटर्स ॲण्ड मेमरीज' खासदार रा. सु. गवई यांचे 'विधिमंडळातील भाषणे' विधान परिषदेचे माजी सभापती जयंतराव टिळक यांचे 'विधिमंडळातील व संसदीय विषयांवरील भाषणे' तसेच माजी उपमुख्यमंत्री नासिकराव तिरपुडे यांचे 'विधिमंडळातील भाषणे' विद्यमान केंद्रीय मंत्री व माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांचे 'महाराष्ट्र माझा' ही पुस्तके या सेवांच्या साहाय्याने पूर्ण करण्यात आली आहेत व तसा उल्लेख या पुस्तकांमध्ये त्यांनी आवर्जून केलेला आहे.

## सदस्यांचा संक्षिप्त परिचय प्रकाशन

प्रत्येक विधानसभेच्या कालावधीकरिता सभागृहाच्या सदस्यांचा संक्षिप्त परिचय हे प्रकाशन ग्रंथालयामार्फत काढण्यात येते. या प्रकाशनासाठी सदस्यांची परिचयविषयक माहिती विहित प्रकारच्या फॉर्ममधून मागविण्यात येऊन ती संक्षिप्त स्वरूपात संपादित केली जाते. त्या प्रकाशनाच्या प्रती सदस्यांना वितरित करण्यात येतात. विधानपरिषदेच्या सदस्यांच्या बाबतीतही नियत कालावधीनंतर अशाच प्रकारची परिचय पुस्तिका प्रकाशित करण्यात येते.

या पुस्तिकेमध्ये सदस्यांचा जन्मदिवस, शिक्षण, व्यवसाय, पक्ष, विविध क्षेत्रांतील कार्य, छंद, पत्ते, दूरध्वनी अशी माहिती त्यांच्या रंगीत छायाचित्रांसह समाविष्ट असते. या सर्व माहितीचे विश्लेषण करून जिल्हावार, विभाग व राज्यातील पक्षस्थिती, शैक्षणिक पात्रतेनुसार संख्या, वय, व्यवसाय, इत्यादींची सांख्यिकीय माहितीही या प्रकाशनामध्ये समाविष्ट असते. प्रत्येक मतदार-संघाचा निवडणूक निकालही या माहितीमध्ये समविष्ट असतो. विधिमंडळ सदस्यांसंबंधीच्या अधिकृत माहितीचा एक दस्तऐवज म्हणून हे प्रकाशन अत्यंत उपयुक्त आहे. १९३२पासूनची



अशी प्रकाशने ग्रंथालयामध्ये उपलब्ध आहेत. संसद सदस्यांचीही १९५२पासूनची तसेच अन्य काही राज्यांच्या विधानमंडळ सदस्यांच्या अशा माहितीची प्रकाशने या ग्रंथालयामध्ये उपलब्ध आहेत. विविध वृत्तपत्रांचे संपादक, वार्ताहर, शासनाचे अधिकारी, विविध संस्था व विशेष अभ्यासक यांना या प्रकाशनांचा नेहमी उपयोग होतो.

## लॅमिनेटिंग व बाइंडिंग मशीन

ग्रंथालयामध्ये १८६२पासूनची राज्य विधिमंडळ व संसदेच्या दोन्ही सभागृहांची कार्यवाही वृत्ते तसेच अन्य काही दुर्मीळ कागदपत्रे आहेत. त्यांचे योग्य जतन करता यावे यासाठी ग्रंथालयामध्ये लॅमिनेटिंग मशीन, स्वयंचलित स्पायरल बांधणी व कटिंग मशीन व्यवस्थापित करण्यात आले आहे. सध्या १९२०पर्यंतची राज्य विधिमंडळाची सर्व कार्यवाही वृत्ते लॅमिनेट करून स्पायरल बांधणी करून घेण्यात आलेली आहेत.

## झेरॉक्स सेवा

सभागृहाचे कामकाज सुरू असताना सदस्यांना कामकाजासंदर्भात माहितीच्या प्रती विनाविलंब उपलब्ध करून देता याव्यात, तसेच ग्रंथालयातून बाहेर देणे शक्य नसणाऱ्या ग्रंथांतील वा अन्य साहित्यातील हवी असणारी माहिती सदस्यांना त्वरित झेरॉक्स करून घेता यावी म्हणून ५० पैसे प्रति प्रत याप्रमाणे ही सेवा देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. सदस्यांना विशेषत: सत्र सुरू असताना या सेवेचा अत्यंत लाभ होतो. बाहेरील विशेष अभ्यासक व संशोधकांनाही या सेवेचा चांगला लाभ होतो. कार्यालयीन अन्य शाखांनाही झेरॉक्स सेवा ग्रंथालयामधून दिली जाते.

## संगणकीकरण

एकीकडे सन्माननीय सदस्यांना गुणात्मक दृष्ट्या, दर्जेदार व शीघ्र गतीने सेवा देता यावी व दुसरीकडे ग्रंथालयाच्या विद्यमान उपलब्ध जागेचा जास्तीत जास्त उपयोग करता यावा हा दृष्टिकोन समोर ठेवून विधानमंडळ ग्रंथालय सेवेचे संगणकीकरण करण्याचा निर्णय संसदेने सूचित केल्याप्रमाणे १९९६मध्येच घेण्यात आला आहे. सुरुवातीस चार संगणक बसविण्यात आले असून राष्ट्रीय सूचना व विज्ञान विभाग (एन.आय.सी.) मुंबई या संस्थेच्या तांत्रिक सहकार्याने थोड्याच अवधीत हा उपक्रम गतीने कार्यान्वित होईल या दृष्टीने प्रयत्न सुरू होते. परंतु त्यामध्ये तितकेसे तांत्रिक सहकार्य एन.आय.सी. कडून मिळेल की नाही याबाबत साशंकता वाटत असतानाचा २४ डिसेंबर १९९८ रोजी नागपूर अधिवेशनामध्ये सभागृहाने संगणकीकरणाच्या एकूण कामकाजाचा निर्णय घेऊन सदर काम C-DAC पुणे यांना देण्याचे निश्चित केले. त्याप्रमाणे C-DAC ने त्यांच्या तज्ज्ञ इंजिनीअर्सची तुकडी या प्रकल्पावर नेमून ग्रंथालयाचे इन्फॉर्मेशन स्ट्रॅटेजी प्लॅन ISP करून त्यानुसार काही सॉफ्टवेअर्स विकसित केली आहेत. आत न्यूजपेपर्स क्लिपिंग्ज, सदस्य परिचय, १९३७ पासूनच्या सदस्यांची यादी व मंत्रिमंडळाची यादी या कामांचा संगणकामध्ये डेटाबेस तयार करण्यात आला आहे. ग्रंथालयीन सामान्य कामांसाठी LIBSYS हे सॉफ्टवेअर प्राप्त करण्यात आले असून पुस्तकांचा डेटाबेस तयार करणे सुरू आहे. नजीकच्या काळात ई-मेल, नेटवर्क सेवा सुरू ठेवण्यात येणार आहेत.

## ग्रंथालय समिति

ग्रंथालय समिती ही तदर्थ (ॲडहॉक) समिती असून ही समिती विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या सदस्यांची मिळून असते. समितीची मुदत निवडीनंतर दोन वर्षांसाठी असते. नवीन समिति गठित होईपर्यंत आधीची समिती कार्यरत राहते. समितीमध्ये सध्या २० सदस्यांचा समावेश आहे. यामध्ये दोन्ही सभागृहांचे माननीय पीठासीन अधिकारी हे पदसिद्ध सदस्य असून विधान परिषदेचे मा. सभापती हे पदसिद्ध समितीप्रमुख असतात. उर्वरित १८ सदस्यांमध्ये विधानसभेचे १३ व विधान परिषदेचे ५ सदस्य, दोन्ही सभागृहांच्या पीठासीन अधिकाऱ्यांनी नामनिर्देशित केलेले असतात. विधानमंडळाच्या ग्रंथालयाच्या सर्वांगीण विकासासंबंधी मार्गदर्शन करणे, सल्ला देणे हे या समितीचे प्रमुख कार्य आहे. त्यामध्ये प्रामुख्याने ग्रंथ व इतर वाचन साहित्याची निवड, त्यांचे जतन व उपयुक्तता वाढविण्यासाठी मार्गदर्शन व उपाययोजना सुचविणे, विद्यमान ग्रंथालय सेवा विस्तृत करणे वा अन्य नवीन सेवा प्रस्थापित करणे या कामांचा प्रामुख्याने समावेश आहे. वितरकांकडून आलेल्या नवीन ग्रंथांपैकी उपयुक्त ग्रंथ प्रथम ग्रंथपाल निवडतात व अंतिम मान्यतेसाठी ग्रंथालय समितीची बैठक बोलावून ते सर्व ग्रंथ मान्यतेसाठी, आधी विषयवार यादी समिती सदस्यांकडे पाठवून बैठकीमध्ये त्याबाबत निर्णय घेतला जातो. जी पुस्तके समितीने मान्य केली ती घेतली जातात व अन्य परत केली जातात. मान्य पुस्तकांवर रीतसर पुढील सोपस्कार केले जातात. समितीच्या बैठका साधारणत: सत्र कालामध्ये होतात. नि:सत्रकालामध्येही गरजेनुसार समितीची बैठक बोलविण्यात येते.

❑❑❑

खरोखर तल्लीन होऊन आपण एखादे पुस्तक वाचतो तेव्हा आपल्या मनावर त्याचा केवढा परिणाम झालेला असतो, याचे एक मजेदार उदाहरण मला आठवते. हार्डीची 'टेस्' ही कादंबरी वाचताना मी अगदी स्वत:ला विसरून गेलो होतो. काही दिवसांनी मी रस्त्यावरून जात असता एक सुंदर कॅलेंडर एका दुकानात माझ्या दृष्टीला पडले. संध्याकाळचा सोनेरी सूर्यप्रकाश पडला आहे, आणि एका गवताच्या गंजीला टेकून एक इंग्लिश खेडवळ मुलगी उभी आहे, असे त चित्र होते. हार्डीची 'टेस्' अशीच दिसत असली पाहिजे, असे मला वाटले आणि मी ते कॅलेंडर विकत घेऊन माझ्या खोलीत आणून लावले. नंतर एकदा लायब्ररीत 'ग्रॅफिक्' किंवा 'स्फीयर' किंवा असलेच कुठले तरी सुंदर आर्ट पेपरवर छापलेले एक इंग्लिश नियतकालिक चाळीत असता, हार्डीच्या 'टेस्' चे नाटक करून 'हार्डी प्लेअर्स' नावाच्या हार्डीच्या चहात्या काही हौशी नटनटींनी ते कुठल्यातरी थिएटरात दाखविल्याची माहिती माझ्या दृष्टीला पडली. त्यात काही चित्रेही दिली होती. 'टेस्चे काम करायला हीच मुलगी योग्य आहे,' असे हार्डीने सांगितल्यावरच त्या नटीची निवड करण्यात आल्याचे त्या लेखात सांगितले होते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे माझ्या कॅलेंडरवरल्या चित्रातल्या त्या मुलीत आणि नाटकातल्या त्या 'टेस्' मध्ये कमालीचे साम्य होते.

**– अनन्तिका, पृ. ११६**

**– अनंत काणेकर**



# ज्ञानव्यवस्थापन : नव्या युगातील नवे आव्हान

सु. अ. कुलकर्णी

*ज्ञान ही एक शक्ती आहे. सर्व ज्ञात माहिती म्हणजे ज्ञान. तात्त्विक दृष्ट्या व रचनात्मक पद्धतीने असलेली प्रत्येक माहिती ही ज्ञान निर्माण करते. ज्ञानशक्ती ही सत्ता व संपत्ती मिळवण्याचे एक साधन आहे. एस. आर. रंगनाथन यांनी ज्ञानाचे वर्णन पुढीलप्रमाणे केले : "Total totality of the idease conserved by the human" यानुसार ज्ञान म्हणजे एकूण मानवी कल्पनांचे विश्व ! 'माहिती असणारे वास्तव किंवा स्थिती आणि ज्याचा अनुभव घेतला जातो किंवा ज्यांची जाणीव होऊ शकते' ते ज्ञान. ज्ञानव्यवस्थापन म्हणजे मूल्यनिर्मितीची कला जी एखाद्या संस्थेच्या दृष्टीने अतिशय आवश्यक व महत्त्वाची असते. ज्ञानव्यवस्थापनातून अनेक गोष्टी साधता येणे शक्य असते. अनुभव मिळतो, ज्ञान मिळते, निपुणता येते, ज्यामुळे नवीन क्षमता निर्माण होतात, ग्राहकमूल्य वाढते, नवनवीन कल्पनांना वाव मिळतो, कामाजा दर्जा वाढतो. ज्ञानव्यवस्थापन हे संस्थेचे infrastructure सारखे काम करते. ज्यामुळे सध्याची जी उपलब्ध माहिती आणि ज्ञान आहे, त्यातून माहिती व ज्ञानाचे वितरण अमर्याद होऊ शकते. दैनंदिन व्यवहारात ज्ञान आणि माहितीचा योग्य उपयोग करून घेता येतो.*

माहिती व तंत्रज्ञानाच्या क्रांतीने ज्ञानक्षेत्रात ज्ञानव्यवस्थापन आकार घेऊ लागले आहे. नवनवीन ज्ञानाचे / माहितीचे उत्पादक आणि दलाल उपयुक्त ज्ञानबँकेचा फायदा नावीन्यपूर्णतेने बदल घडवून आणण्यास आणि प्रसारित करण्यासाठी चुरशीने प्रयत्न करताना दिसतात.

ज्ञानव्यवस्थापनक्षेत्र ज्ञान परिणामकारकपणे शोधणे, मिळवणे, संचय करणे, विकसित करणे, वापरणे, साठवणे आणि सहभागी होऊन वाटणे यांच्याशी संबंधित आहे. तसेच यामध्ये अनेकांची सामूहिक हुशारी वापरून स्पष्ट व अस्पष्ट असे दोनही प्रकारचे ज्ञान वाढवून ते रूपांतरित

करणे, हस्तांतरित करणे किंवा भागीदारी करण्याची प्रवृत्ती वाढीस लावता येते. यातूनच कल्पकताही वाढीस लागते.

दिवसेंदिवस सामाजिक विकासात ज्ञान प्रभावशाली ठरत आहे. यामुळे समाजाचे लक्ष ज्ञान व माहिती याकडे अधिक जाऊ लागले आहे. लोकांची माहिती व ज्ञान यासंबंधीची मागणी अधिकाधिक वाढत आहे. यामुळे ग्रंथालय व संप्रेषण अभ्यास विकसित होण्यास चांगले वातावरण तयार होत आहे. म्हणूनच आधुनिक अर्थप्रणालीत माहिती व ज्ञान हा महत्त्वाचा घटक बनला आहे. त्याचबरोबर समाजाला ग्रंथालयातील माहिती व ज्ञानाचे व्यवस्थापन असणे ही अत्यावश्यक गरज तीव्रतेने भासू लागली आहे. हळूहळू याच्या प्रभावाने ज्ञान संशोधन व विकास, ज्ञानमूलक निर्मिती, ग्रंथालय कर्मचाऱ्यांसह उपयोगकर्ते किंवा वाचक यांच्यात ज्ञानाची देवाण-घेवाण व सहभाग, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण, वास्तव ज्ञानाची प्रक्रिया आणि त्याच्या विभागणीबाबतच्या जाणिवा अधिक तीव्र व गतिमान होतील.

या नव्या शतकात संपूर्ण जग संपर्कसाधनांच्या आत्यंतिक वापराने 'ज्ञानक्रांती'कडे झेपावत आहे. यामुळे जागतिक शक्ती अधिक विशाल, तीव्र आणि वेगवान होत आहेत. म्हणूनच ज्ञानशक्तीचे व्यवस्थापन अत्यावश्यक होत आहे. यामुळे सहभाग, इतरांकडून शिकणे आणि पुनर्संशोधन टाळणे यासाठी मदत होते. यापूर्वी काही प्रमाणात या गोष्टी केल्या जात असत; पण आता इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे हे सर्व अधिक नावीन्यपूर्णतेने घडत आहे. तज्ज्ञ आणि ज्ञानाधिष्ठित प्रणाली, तंत्रे व पद्धती आणि साधने यांचा विकास सध्याच्या ज्ञानव्यवस्थापन क्षेत्रातून विकसित होऊ शकतो.

ज्ञानाच्या व्याख्या वेगवेगळ्या दृष्टिकोनांतून केल्या गेल्या. International Encyclopedia of Information & Library Science ने केलेली व्याख्या : "Knowledge in information evaluated and organized in the human mind so that it can be used purposefully."

ज्ञानव्यवस्थापन हे ग्रंथपालांच्या दृष्टीने नवीन नाव आहे. ग्रंथपालनक्षेत्रात ही अतिशय प्रगत संकल्पना आहे. किंबहुना सध्याचा वारंवार चर्चेत येणारा विषय आहे. हा विषय व्यवस्थापकीय शास्त्रज्ञ आणि माहिती-तंत्रज्ञ यांच्याही आवडीचा विषय आहे. ज्ञानव्यवस्थापन काही मूलभूत घटकांनाही संबोधित करते; ज्यामध्ये सुगमता, संघटन, मूल्यमापन, व्यवस्थापन, माहितीची सत्यासत्यता आणि वितरण व्यवस्था - ज्यामुळे उपयोगकर्त्यास उपयुक्त ठरणारी माहिती त्याच्यापर्यंत पोहोचू शकेल - या सर्वांचा समावेश यामध्ये होतो. स्पर्धेच्या युगात ज्ञानाचे संवर्धन, विकसन आणि व्यवस्थापन हे एक आव्हानच आहे.

## ज्ञानव्यवस्थापनाचे उद्देश

खालील उद्दिष्टे ज्ञानव्यवस्थापन प्रक्रियेसंदर्भाने निश्चित करता येतील.

- सध्याच्या वास्तव ज्ञानाचा विकास करून नवीन ज्ञानाचा विकास परिणामकारकतेने व कार्यक्षमतेने करणे. यामध्ये संस्थेच्या व कामगारांच्या व्यक्तिगत उद्दिष्टांना समोर ठेवणे हा महत्त्वाचा भाग राखणे.



- सर्वांना सहजपणे उपलब्ध होऊ शकेल अशा प्रकारे ज्ञानाचे वितरण, प्रदर्शन परिणामकारकरित्या करणे व त्याची सुरक्षितता राखणे.
- संस्थेमध्ये ज्ञान देवघेवीमध्ये येणारे अडथळे दूर करून नवे ज्ञान सर्व विभागांना सर्वत्र वितरित होऊ शकेल, नव्या कामगारांना त्याची माहिती होऊ शकेल अशा पद्धतीने ज्ञान संप्रेषण घडवणे.
- संस्थेत अंतर्गत व इतर संस्थातर्गत जाळ्यात प्रभावी आणि कार्यक्षम असे उत्तम ज्ञानाचे एकत्रीकरण उपलब्ध करणे.

ज्ञानकक्षांचा विचार करता ज्ञानव्यवस्थापनाची खालील उद्दिष्टे निश्चित करता येतील.

(१) ज्ञानात येणाऱ्या अडथळ्यांची अद्ययावत माहिती ठेवून किंवा नोंदी ठेवून बदलत्या परिस्थितीनुसार त्यामध्ये सुधारणा करून उत्तम ज्ञान करणे.

(२) सेवाप्रक्रियेसंदर्भात ज्या ज्या ठिकाणी ज्ञानात वेगवेगळ्या पातळीवर अडचणी निर्माण होतात अशा जागा निश्चित करून अशा ठिकाणी ज्ञानाचा योग्य प्रकारे, काळजीपूर्वक वापर करणे.

(३) उपयोगकर्त्यांच्या दृष्टीने व अधिकाधिक सक्षम वापर होईल किंवा उपयुक्तता वाढेल अशा प्रकारे निर्माण होणाऱ्या अडथळ्यांवर उपाययोजना करणे.

(४) जेव्हा ज्ञान उपलब्ध असते तेव्हा त्याचा स्वीकार करणे, गोळा करणे आणि गरज निर्माण होते तेव्हा तेच ज्ञान उपयोगात आणणे.

डेटा (Data), माहिती (Information), ज्ञान (Knowledge), आणि चातुर्य (Wisdom) या सर्व बाबी एकमेकींशी अतिशय जवळच्या आहेत. त्यांचे वेगळेपण दर्शवणे अतिशय अवघड आहे, तरीही त्यांच्यात भिन्नत्व आहेच.

Stanley Davis याने हे वेगळेपण दर्शवले ते असे : माहिती म्हणजे तपशील घेणे व त्याला अर्थपूर्ण स्वरूपात मांडणे व ज्ञान म्हणजे या माहितीचा उपयोग करण्याची क्षमता.

### डेटा

व्यक्तिगत माहिती, सांख्यिकी, घटना, प्रसंग, इत्यादी माहितीचा तुकडा किंवा वास्तवाचा काही अंश, गट किंवा भाग याचा समावेश यात केला जातो. सांख्यिकी किंवा आकडेवारी यांसारखे काही. डेटा याचा साधा, सोपा, सरळ अर्थ म्हणजे घटना किंवा वस्तू किंवा असंघटित तपशील जी चिन्हात्मक स्वरूपात दाखवता येते आणि ज्यावर प्रक्रिया करणे शक्य असते. (EARL - 1996)

### माहिती

माहिती म्हणजे असंघटित तपशिलांची सुसंघटित अर्थपूर्ण केलेली रचना. जेव्हा एखादा डेटा सुसंगतपणे विशिष्ट संदर्भाने मांडला जातो तेव्हा ती माहिती बनते. म्हणूनच माहिती म्हणजे संदर्भासह अर्थपूर्ण तपशील.

## ज्ञान

माहिती संघटित रचना म्हणजे ज्ञान. वास्तवाचे असे स्वरूप की जे आकलनक्षम, समजण्यासारखे आणि ते असल्यावर महत्त्वपूर्ण ठरते असे ते ज्ञान. माहिती प्राप्त केल्यावर आकलनातून निर्माण होणारी जाणीव म्हणजे ज्ञान. (रँडम हाऊस डिक्शनरी ऑफ दि इंग्लिश लँग्वेज १९८३ पृ. ७३०)

Roger Clarke च्या मते, ज्ञान हे वास्तवाचे स्वरूप आणि कालक्रमानुसार जमलेल्या तत्त्वांना संबोधित करते. यात मानवी मनात निर्माण किंवा तयार होणारी समज आणि वास्तव माहिती यातून ज्ञान निर्माण होते. काहींच्या मते वास्तव आणि तत्त्वे माणसाशिवाय अर्थपूर्ण होऊ शकत नाहीत.

## चातुर्य

याचा शब्दकोशातील अर्थ काय खरे किंवा योग्य याविषयीची समज यावर प्रकाश टाकतो. सर्वसाधारणपणे दीर्घकालीन अनुभवातून व माहिती, ज्ञान यांच्या परिपाकातून हे साध्य होते. जे अंशत: (Partial) किंवा विशेष (Specialized) ज्ञानापासून खऱ्या अर्थाने वेगळे दाखविता येते.

डेटा > माहिती > ज्ञान > चातुर्य




**आकृती : डेटा ते ज्ञान**

## ज्ञान व्यवस्थापन : काय, का आणि कसे ?

ज्ञानाची संकल्पना डेटा, माहिती, ज्ञान व चातुर्य यांच्या सातत्यातून येते व परिणामत: संस्थेच्या ग्राहकाचे समाधान या घटकात दिसते. ज्ञान मिळवता येते, संचयित करता येते, प्रतिप्राप्ती अथवा वितरित करता येते. तसेच उपयोगात आणता येते.



सहजपणे ज्ञान व्यवस्थापनाची व्याख्या अशी करता येईल की, ज्ञान गोळा करणे, संघटित करणे, संचयित करणे आणि वितरित करण्याची प्रक्रिया म्हणजे ज्ञानव्यवस्थापन. ही अशा प्रकारची प्रक्रिया आहे की, ज्यामध्ये केल्या जाणाऱ्या ज्ञानव्यवस्थेतून संस्थेच्या कार्यात प्रगती येईल. लोक काय बोलतात, त्यांच्या दैनंदिन जीवनात ते कोणते काम करतात यातून ज्ञान हस्तगत करणे व ते लोकांसमोर आणणे हे आजचे खरे आव्हान आहे.

अनेकांनी ज्ञान व्यवस्थापनाच्या व्याख्या वेगवेगळ्या प्रकारे केल्या आहेत. Kurl च्या नुसार, ज्ञानव्यवस्थापन म्हणजे 'Art of creating value from an organisation's intangible assets' (Sveiby 2000) तर Fox (1976) च्या मते, 'Management of corporate knowledge that can improve a range of organizational performance characteristics by enabling an expertise to be more intelligent acting.'

## ज्ञानव्यवस्थापनास महत्त्व येण्यामागील कारणे

- स्पर्धात्मक बाजारपेठ
- नावीन्यपूर्णतेची वाढती मागणी व गरज
- ज्ञानाच्या कमतरतेमुळे कामगारांचे वाढते अस्थैर्य
- कामगारांची कमी संख्या व ज्ञान मिळविण्यास अपुरा वेळ
- स्पर्धात्मक वाढत्या दबावाने ज्यामध्ये विशेष नियोजित ज्ञान आवश्यक असते अशा कामाचा वेग कमी होतो.

## ज्ञानव्यवस्थापन साधण्याच्या काही बाबी

- संस्थात्मक दृष्टीने संकल्पनीयता आणून संस्थेच्या सर्व सभासदांना त्यासंबंधी माहिती देणे.
- संस्थेमध्ये अशा प्रकारचे वातावरण निर्माण करणे ज्यामुळे लोकांना ज्ञानाचा उपयोग करणे, ज्ञानव्यवहारात भाग घेण्यास प्रोत्साहित करून, ज्ञानसंवर्धन व उपयुक्ततेच्या उपयोजिततेनुसार पुरस्कृत करणे.
- कामगारांच्या काम करण्याच्या नवनवीन कल्पनांचा शोध घेऊन, नव्याने आव्हानात्मक काम करण्याच्या व्यक्तिगत प्रयत्नांना मान्यता देऊन त्यानुसार पुरस्कृत करणे.
- माहितीस्रोत निर्माण करणाऱ्या किंवा गोळा करणाऱ्यास विशेष अनुदान, भरपाई किंवा बक्षीस देण्याची व्यवस्था करणे.
- माहितीच्या योजना अशा प्रकारे कार्यान्वित करावयाच्या ज्यामुळे माहितीचा स्रोत सतत चालू राहील.
- कृतिशील व्यवस्थापकीय पद्धत अशा प्रकारे आखणे ज्यामध्ये कामगारांच्या कृतीचे मूल्यमापन होईल व शिकणेही होईल.
- प्रशिक्षण आणि विकासासाठी शैक्षणिक कार्यक्रमाचे आयोजन करणे.
- अनेकविध कृतिशील जबाबदाऱ्या घेण्यासाठी कामगारांना उद्युक्त करणे.

- कामाचे वातावरण आणि संस्कृती अशा प्रकारे उपलब्ध करून देणे की, ज्या वातावरणात कामगाराला स्वातंत्र्य व सबळ विश्वास वाटेल.
- संस्थेतील वातावरण अशा प्रकारचे निर्माण करणे की कामगाराला कोणत्याही पातळीवर शिक्षण व कृती याचे महत्त्व समजेल.

## माहिती–व्यवस्थापन आणि ज्ञानव्यवस्थापन

अनेक संस्थांना 'माहिती'ला 'ज्ञाना'पासून वेगळे करणे अवघड वाटते. किंबहुना 'माहितीची जरूर' आणि 'ज्ञानाची गरज' याबाबत संस्थात्मक पातळीवर भेद कसा करावा असा प्रश्न निर्माण होतो. याबाबतीत पुढीलप्रमाणे वर्णन करता येईल.

(१) माहिती व्यक्तीवर अवलंबून असते. ज्ञान मात्र व्यक्तिसापेक्षच असते ते व्यक्तिपरत्वे बदल नाही.

(२) ज्ञान हे नेहमी ससंदर्भ असते. ते कधीच संदर्भ समजल्याशिवाय दर्शविले जात नाही किंवा वापरले जात नाही. आय. के. रविचंद्रराव यांनी या प्रक्रियेत ज्ञानव्यवस्थापन हे बाह्यवक्र आणि माहिती व्यवस्थापन अंतर्वक्र दर्शवले आहे.




माहिती–व्यवस्थापन माहिती देणाऱ्या साधनांशी संबंधित असते; तर ज्ञान व्यवस्थापन हे केवळ माहितीमध्ये समाविष्ट भागाशीच संबंधित नसून उपयोगकर्ता किंवा कामगार व्यक्ती याच्या मेंदूत स्थिर ज्ञानजाणिवेशी संबंधित असते. आजच्या सर्वत्र गुणवत्तापूर्ण सेवेच्या प्रचलित संकल्पनात 'माहिती–व्यवस्थापन' व 'ज्ञानव्यवस्थापन' यांसारख्या व नवसंकल्पनांची अत्यावश्यकता परिणामकारक ठरते.

## ज्ञानव्यवस्थापनाची गरज आणि महत्त्व

माहितीसंबंधित क्षेत्रात 'ज्ञानक्रांती' ही नवी क्रांती आहे. आज प्रत्येक संस्थेला आपल्या स्वत:च्या ज्ञानराशीची माहिती असणे गरजेचे झाले आहे आणि या ज्ञानराशीत नव्याने संशोधित विकसित झालेल्या ज्ञानाची भर पडेल, त्याची व्यवस्था करावी, उपयोगात आणावे ज्यामुळे अधिकाधिक फायदा किंवा निष्पत्ती मिळेल हे आवश्यक झाले आहे. ज्ञानव्यवस्थापनाचे तंत्र, त्याची साधने आणि पद्धती यांद्वारे मिळणाऱ्या भरपूर माहितीतून हे साध्य होऊ शकते. ज्ञान–व्यवस्थापनाच्या सरावातून, योजनाबद्ध कार्यक्रमातून संस्थेच्या संदर्भाने अनेक आश्चर्यकारक परिणाम निर्माण होऊ शकतात.



ग्राहक प्रत्येक व्यवहारात आनंदी राहू शकेल तसेच तो अधिक उत्पादनक्षम, श्रीमंत होईल. बदलते नियम, बदलती क्षितिजे, नावीन्यपूर्णता यांचा ध्यास असणाऱ्या कंपनीसाठी 'ज्ञान' ही एक चालणारी किल्ली आहे. त्याचबरोबर परिणामकारक ज्ञानव्यवस्थापन कार्यक्रम हा कंपनी किंवा संस्थेला एक किंवा अनेक बाबींमध्ये खालीलप्रमाणे मदत करतो.

(१) कल्पनांचा मुक्त स्रोत विस्तारित करून प्रत्येक क्षेत्रात नावीन्यपूर्णता आणणे.

(२) प्रतिक्रियांचा वेळ अधिक मर्यादित किंवा कमी करून ग्राहकांच्या सेवा कमीत कमी वेळात देणे.

(३) उत्पादन आणि सेवा बाजारात त्वरित आणून महसूल वाढवणे.

(४) कामगारवर्गाची धारणाशक्ती वाढविणे, त्यासाठी कामगारांच्या ज्ञानाचे मूल्य जाणून त्यांना त्यासाठी पुरस्कृत करणे.

(५) अनावश्यक प्रक्रिया कमी करून, किमती कमी करून व्यवहार मर्यादित करणे.

## ग्रंथालय आणि माहितीकेंद्रातील ज्ञानव्यवस्थापन

आजची ग्रंथालये ज्ञानाधिष्ठित व्यवहारात कार्य करीत आहेत. ग्रंथालयात मानवी संसाधन व्यवस्थापन हे ज्ञान संसाधन व्यवस्थापनाचा गाभा आहे. ग्रंथालयातील कर्मचारीवर्गाची सर्वांगीण वाढ प्रशिक्षण, निरंतर आणि आजीवन शिक्षण योजनेद्वारे करून नवीन सुधारित ज्ञान मिळवणे हा ग्रंथालय आणि माहिती केंद्राच्या मानवसंसाधन व्यवस्थापनाचा मूलाधार आहे. नावीन्यपूर्ण सुधारित ज्ञान वाढवणे हे ग्रंथालयातील ज्ञानव्यवस्थापनाचे उद्दिष्ट आहे. याचा संदर्भ ज्ञानाचे उत्पादन, वितरण आणि संक्रमण (अदलाबदल) याप्रमाणेच संबंधित संस्था वा संघटनांनी बनवलेल्या नेटवर्क पद्धतीशी आहे. याचे स्वरूप तीन प्रकारचे आहे. तात्त्विक सुधारित ज्ञानव्यवस्थापन, तांत्रिक सुधारित ज्ञानव्यवस्थापन आणि संस्थात्मक ज्ञानव्यवस्थापन.

ग्रंथालय व माहितीकेंद्राने ज्ञानव्यवस्थापनाच्या नवीन धोरणांचा, उपक्रमांचा अवलंब करून अधिकाधिक गुणात्मक सेवा त्यांच्या ग्राहकांना / उपयोगकर्त्यांना द्यावयास हवी की ज्यामुळे उपभोक्त्यांचा त्या संस्थेवर विश्वास वाढेल.

ग्रंथालय व माहिती व्यावसायिकांना कृतीमध्ये आणण्यासारख्या काही बाबी पुढीलप्रमाणे आखता येतील :

(१) स्वीकारार्ह पद्धती स्थापित करणे (उदाहरणार्थ, सार्वजनिक ग्रंथालय पद्धती, शैक्षणिक ग्रंथालय पद्धती, विशेष ग्रंथालय पद्धती).

(२) स्वतंत्र ग्रंथालय पद्धतीत ग्रंथालय व माहिती केंद्रात जाळे (नेटवर्क) विस्तारित करणे आणि ते एकमेकांना जोडणे त्यामुळे या संगणकीय जाळ्याद्वारे माहितीसेवा पुरवता येईल.

(३) राष्ट्रीय समन्वयक धोरण समोर ठेवून ग्रंथालयातून जागतिक ज्ञानक्षेत्राशी अधिकाधिक संबंध प्रस्थापित करणे.

(४) उपयोगकर्त्यांच्या मागणीनुसार गुणवत्तापूर्ण सेवा देणे.

(५) ग्रंथालयपद्धतीनुसार शासन, कंपनी / संस्था आणि उपयोगकर्ता यांच्या Symbolic Network तयार करणे.

(६) ग्रंथालय व माहितीकेंद्र हे माहिती पुरवणारे जागतिक ज्ञानसंकुल तयार करणे.

माहिती-तंत्रज्ञानाचा वापर करून ग्रंथालये ज्ञानव्यवस्थापन करू शकतात. माहिती-तंत्रज्ञानाचा वापर केल्याने (acquisition) संपादित करण्याची गती वाढते आणि किंमत कमी होते. म्हणजे त्या ज्ञान मिळवण्याच्या टप्प्यातील वेळ कमी लागतो. तसेच त्यासाठी खर्च कमी लागतो. त्यामुळे Network, Internet आणि ज्ञानसाधने यांच्यात आंतरजोडणी शक्य होते. ग्रंथालयातील ज्ञानव्यवस्थापनाशी संबंधित मुख्य माहिती-तंत्रज्ञान म्हणजे इंटरनेट, एक्स्ट्रानेट, स्टोअरज आर्किटेक्चर, डी.बी.एम.एस., मेटाडेटा, डेटा ॲक्विझिशन, संचय करणे, वितरित करणे, माहिती प्रतिप्राप्ती, इन्फर्मेशन, रिसोर्स शेअरिंग, ग्रुपवेअर, मिडलवेअर, ऑनलाईन, ॲनालॅटिकल प्रोसेसिंग, मल्टिडायमेंशनल ॲनालिसिस, डेटामायनिंग, इत्यादी.

## ग्रंथपाल : ज्ञानव्यवस्थापक

ग्रंथपाल म्हणजे भांडाररक्षक हे पूर्वीचे दिवस गेले. तंत्रज्ञानाच्या बदलानुसार ग्रंथपालाची भूमिका बदलली. कार्पोरेट जगात ज्ञान व्यवस्थापन प्रक्रियेचा वापर स्पर्धात्मक फायद्यासाठी केला जात आहे. कार्पोरेट ग्रंथपालास ज्ञानव्यवस्थापन प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका निभवावी लागत आहे.

पूर्वीच्या स्थानिक, पुस्तकी, रेषात्मक आणि निष्क्रिय अशा पारंपरिक माहितीच्या व्यवस्थापनाऐवजी ग्रंथपालांना ज्ञानव्यवस्थापन, वातावरणाच्या मागणीनुसार जे मुख्यत्वे इलेक्ट्रॉनिक, वितरणयोग्य स्वरूपाचे परस्पर क्रियाशील स्वरूपाच्या ज्ञानाची व्यवस्था करावी लागते. (Branin - 1994)

आजही आपल्या उपयोगकर्त्याच्या माहितीच्या गरजा भागवणे हे ग्रंथलयाचे मुख्य उद्दिष्ट आहे. यासाठी माहितीतज्ज्ञ माहिती गोळा करतात, ती डेटाबेसमध्ये संचयित करतात आणि जेव्हा त्याविषयी विचारणा होते तेव्हा ती हव्या त्या स्वरूपात देतात. माहिती वातावरणातील बदलानुसार माहिती-व्यवस्थापन प्रक्रियाही बदलत आहे. केवळ माहितीचे सूचीकरण, संचय व प्रतिप्राप्ती एवढाच मार्ग न राहता लोक माहितीशी कशा प्रकारे काम करतात किंवा हाताळतात या मूलभूत स्वरूपाचा विचार यात करणे आणि त्यानुसार आपल्या सेवांमध्ये बदल घडवणे क्रमप्राप्त आहे.

नव्या युगातील संस्था ग्रंथपाल हे ज्ञानव्यवस्थापक आणि माहिती परीक्षक (analysts) असतील. ते अधिकांश व्यापारी दृष्टिकोनातून भूमिका बजावतील. व्यापारी गटातील अंतर्गत सभासद म्हणून आवश्यक घटक म्हणून त्यांची गणना होईल आणि ग्रंथालयापेक्षा अशा गटातच ते अधिक काम करतील. (Klobas - 1997)

ज्ञानव्यवस्थापनात ग्रंथपालाची 'भूमिका ज्ञानवितरकाची' (दलालाची) असेल. ज्या ठिकाणी तो सेवारत असेल अशा ठिकाणी योग्य ठरणारे ज्ञान वेळेत उपलब्ध करून देण्याची त्याची जबाबदारी असेल आणि यासाठी ग्रंथपालांनी या व्यावसायिक वातावरणात उत्तम संप्रेषक



होणे गरजेचे आहे. यासाठी ग्रंथपालन किंवा ग्रंथपालकत्वाची भाषा जरुरीची आहेच त्याचबरोबर त्यांना ते जेथे काम करतात त्या व्यवसायाची भाषा येणेही आवश्यक आहे (Knapp - 1971). परिणामकारक ज्ञान व्यवस्थापक होण्यासाठी ग्रंथपालांनी विशेष परिश्रम घेऊन व्यापक व्यावसायिक वातावरण समजून घेणे महत्त्वाचे आहे. त्यांनी या क्षेत्रात ग्राहक सेवकापेक्षा उद्योजकाप्रमाणे बनणे आवश्यक आहे.

## निष्कर्ष

आजच्या वाढत्या ज्ञान अर्थकारणात ज्ञान व्यवस्थापन हे महत्त्वाचे साधन झाले आहे. कंपनी किंवा संस्था ज्या ज्ञानव्यवस्थापन अमलात आणू इच्छितात त्यांनी प्रक्रियेतील मानवीय घटकांचा विचार प्रथम करावयास हवा. हे अतिशय निर्णायक असते. यातून संस्थेच्या क्षमता व पात्रता वाढण्यास चार प्रकारे मदत होते - हेतू, स्पर्धा, कृती आणि बदल. संस्थेच्या कार्यप्रणालीत ज्ञान व्यवस्थापन असणे, स्पर्धात्मकदृष्ट्या फायद्याचे ठरते हे नि:संशय आहे. यात ग्रंथपाल या कार्यात मानवीय चेहरा देऊ शकतो. ज्ञानव्यवस्थापक म्हणून महत्त्वाची भूमिका पार पाडू शकतो. केवळ तंत्रज्ञानातील प्रगतीच्या आधारेच नव्हे तर ज्ञान प्रदर्शित करण्याची कला आत्मसात करून त्यामध्ये माहितीचे परीक्षण मूल्य समाविष्ट करून त्याला या प्रक्रियेला वेगळे परिमाण देता येईल. ग्रंथपालांना यासाठी संस्थात्मक बदलातील एक भाग म्हणून आपली मानसिकता बदलावयास हवी.

ज्ञानव्यवस्थापन हे कधीच संपुष्टात येऊ शकत नाही. कारण ज्ञानाच्या गरजा सतत बदलत्या असतात. नवीन तंत्रज्ञान, व्यवस्थापकीय दृष्टिकोन, घटना व वृत्तामधील सातत्य आणि ग्राहकांशी संबंध याचे प्रमाण वाढत आहे. कंपन्या आपली कार्यप्रणाली, सेवा, उत्पादन यांत सतत बदल करीत असतात. नव्या व्यवस्थापकांना, व्यावसायिकांना ज्ञानाच्या नव्या गरजा असतात. याकडे पाहता भविष्यात CYBRARIANS ची गरज अधिक वाढेल.

अखेरीस संचयन, व्यवस्थापन, विभाजन, उपयोजन, नवनिर्माण या ज्ञानव्यवस्थापनातील घटकात माहिती तंत्रज्ञान हे गुंतागुंतीचे वाटते. आर्टिफिशियल इंटेलिजन्स मधील एक्सपर्ट सिस्टीम, नॉलेज रिप्रेझेंटेशन, मशीन लर्निंग या गोष्टींचा ज्ञानव्यवस्थापनात मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहे. यासाठी ग्रंथपाल व माहितीतज्ज्ञांनी हे आव्हान पेलण्यास समर्थ होणे हे नव्या युगाचे आव्हानच आहे.

## *संदर्भ*

(१) Branin (J.J). Fighting back one again : from collection management to knowledge Management IN : Johnson (P) and Macewan (B) ed. Collection management and development : Issues in electronic era, Chicage, American Library Association 1944 pp xi-xviii.

(२) Clark Roger, Knowledge, http.//www. anu. edu. au/people/Roger. Clarke/Sos/know.html.

(३) EARL (Michael J). Knowledge strategies : from two contrasting industries. In : EARL (Micheal J.) Information management : the organization dimension. Oxford, Oxford University Press, 1996, 38.

(४) Fox (E) Executive Qualities, 1976. Addition Wesley; MA, pp 50-53.

(५) Halkar G. G. Gupta S. Knowledge Management : A Challenger for the 21st Century, University News, 42 (28) July 12-18-2004, 4-9.

(६) Klobas (JE). Information Services for new millennium organizations : Librarians and knowledge management in : Raitt (D); ed. Libraries for the new millennium : Implications for managers, London, Library Association, 1997; 39-64.

(७) Knapp (EM). creating enduring value from intellectual assets : interview with Ellen (M), Knapp (CKO), Copper and Lybrands, Leaders Magazine, 20(3); 1997; 114-1.

(८) Sveiby Karl-eric. What is Knowledge Management. http:/ www.sveiby. com.au/knowledge management, htmldated 5th March 2000.


❑❑❑

### ग्रंथवाचनाचे व्यसन – ३

१८९४।९५ साली आपट्यांचा संस्कृत कोश चाळायचा विलक्षण नाद मला लागला व तीन आठवडेपर्यंत तो कोशच एकसारखा चाळीत बसलो ! विशेष महत्त्वाचे संस्कृत शब्द, त्यांची रूपे, विविधार्थ, प्रत्यय, अवतरणे पाहण्यात चित्त रमून गेले व मला वाटते ह्या ३ आठवड्यांत माझे शब्द भांडार व उत्कृष्ट वाक्ये किंवा उतारे यांचे ज्ञान पुष्कळच वाढले ! असाच एक इंग्रजी कोशही एकदा बरेच दिवस चाळीत बसलो होतो. पण संस्कृत कोश चाळण्यात मला गोडी वाटली ती इंग्रजी कोश वाचण्यात वाटली नाही. मला संपूर्ण ग्रंथचे ग्रंथ पाहणे आवडत असे. पुढे बी. ए. ची तीन वर्षे व एम. ए. चे सहा महिने मिळून इंग्रजी वाङ्मयाचे बरेच ग्रंथ पाहिले. शेक्स्पीअरची सर्व नाटके वाचली. पुढे अशाच एका प्रसंगाने मिसेस बार्कले या अमेरिकन बाईच्या ९ कादंबऱ्या मी एका महिन्यात वाचून टाकल्या. त्या वेळी हे ग्रंथ का, कशासाठी वाचायचे हे काही धोरण नव्हते. वाचायचे म्हणून वाचीत असे. वाचनाची बैठक आठ आठ तासाची टिके. नाद लागला की दिवस-रात्र दुसरा विचार सुचत नसे. अत्यंत अव्यवस्थितपणाची ही राहणी खरी; पण हिने माझ्या आरोग्यावर काही वाईट परिणाम घडला असे मला वाटत नाही!

**– चरित्रचंद्र**
**– ल. रा. पांगारकर**



# अजून ताजा वास जुन्याला

## ग्रंथालयासंबंधी लोकमान्यांचे विचार

ग्रंथालयविहारी

*जुन्या पिढीतील नामवंत ग्रंथपाल श्री. वा. पु. कोल्हटकर यांनी 'ग्रंथालयविहारी' या टोपणनावाने ग्रंथालयशास्त्रासंबंधाने विविध प्रकारचे लेखन केले आहे. प्रस्तुत लेखात एक कल्पित ग्रंथालय सहकार सभा उभी करून त्यांनी लोकमान्य टिळकांनी केलेल्या ग्रंथालयासंबंधीच्या विचाराची ओळख करून दिली आहे. लोकमान्य ग्रंथालयाबाबत काय विचार करीत होते याची माहिती कोल्हटकरांनी विविध ठिकाणांहून संकलित केली आहे. ती आजही वाचनीय आहे. मूळ लेख 'प्रसाद' मासिकाच्या डिसेंबर १९५६ च्या अंकात प्रकाशित झाला होता.*

### ग्रंथालय सहकार सभा

परवाच्याच न कर्त्याच्या वारी आमच्या सभेची बैठक झाली. दुसऱ्या दिवशी सकाळी कामाचा लकडा (माझ्याखेरीज) कोणासच नसल्याने ती रात्र अगदी निवांत कार्यक्रमायोग्य होती. या विचारानेच बैठक काहीशी लांबली, तरी कोणीही उठण्याची घाई केली नाही. मंडळीही बरीच जमली होती. विषय तर अपूर्व होताच आणि म्हणूनच त्याची नवनवी सुचेल ती बाजू प्रत्येकजण शोधू म्हणत होता. अप्पा म्हणाले, ''हे अगदी विलक्षणच झाले हं, की ज्या इंग्लंडशी लोकमान्य आयुष्यभर झुंजले त्या इंग्लंडने आपल्या राजधानीत नी खुद्द आपल्या लोकसभेत त्यांचा बहुमान करावा !'' – ''हो, आणखीही एक अद्भुत की, ज्या न्यायाधीशाने त्यांना शिक्षा ठोठावली त्याच्या वंशजाने त्यांची नाव अत्यादराने उच्चारावे. केवढा हा असामान्य मान !'' केशवराव म्हणाले. त्यावर विठ्ठलराव बोलले, ''अहो, हा मान काही केवळ त्यांनी हिंदी लोकांमध्ये जी राजकीय जागृती केली तीमुळेच नाही मिळाला. त्या कामगिरीप्रमाणेच त्याचे कर्तृत्व इतर अगणित विषयांमध्येही स्पष्ट दिसून आले नी ते जगन्मान्यही झाले आहे.''

केशवरावांनी लोकमान्यांच्या तस्बिरीकडे आदराने पाहिले. ही बैठक त्यांच्याच ग्रंथालयात चालली होती. त्या ग्रंथालयात नाही, पण हे ग्रंथालय ज्या संस्थेत होते त्या संस्थेत टिळकांची बसऊठ होती व त्यांच्या त्या संबंधाचा केशवरावांना वाजवी अभिमान वाटे. पण त्यांच्याहूनही जास्त अभिमान अप्पांना होता. कारण लोकमान्यांच्या अनेक सभांना हजर राहण्याचे पुण्य आमच्यापैकी फक्त त्यांच्याच गाठी होते असे ते म्हणत. त्याच अभिमानाची दृढता स्वरांत आणीत अप्पा म्हणाले, ''येस. येस. अहो, ते अष्टावधानी होते. त्याची बुद्धी कितीतरी विषयात लीलेने शिरत असे. अगदी आपली वर्गीकरणाची श्रमवारी घ्या. गणित, खगोलविज्ञान, वैद्यक, व्यायाम, व्याकरण, धर्मशास्त्र, वेदान्त, शिक्षणशास्त्र, भौगोलिक इतिहास, इतिहास, राज्यशास्त्र, समाजशास्त्र अँड अबाहु ऑल कायदा. प्रत्येक विषयात त्यांचा गाढ ठसा आहे.'' त्यावर विठ्ठलराव म्हणले, ''मोठी विस्मयाची गोष्ट आहे की, त्यांच्या संकटग्रस्त जीवनातून नी परमोच्च राजकारणी ध्येयांतून त्यांनी सवडतरी कशी काढली या विषयांचा विचार करण्यासाठी नी ते लिहून ठेवण्यासाठी ? त्यांचे साहित्यिक गुण पाहता त्यांना साहित्याकरिताच अधिक वेळ मिळायला हवा होता असे वाटू लागते.'' तेव्हा मदनभाऊ म्हणाले, ''भले, अहो, तसं घडलं असतं तर आज स्वातंत्र्यकाळात त्यांची ही शंभरावी जयंती निरपवाद भक्तीने पं. नेहरूपासून सर्वांकरवीच साजरी होण्याचा समय कसा आला असता ? त्यांनी राजकीय जागृतीचा पाया घातला म्हणून तर आज आपण स्वातंत्र्य भोगतो आहो. राजकारणात जसे त्याचे सर्वोच्च आसन आहे तसेच त्यांनी वाङ्मयातही अढळस्थान मिळविले आहे. पं. नेहरूंचेही असेच नाही का ? त्यांचे ग्रंथ पाहिले, की त्यांच्या राजकारणामुळे त्यांचेकडून वाङ्मयनिर्मिती हवी तितकी होत नाहीसे दिसते. त्यांचा पिंड उत्कृष्ट साहित्यनिर्मितीचा आहे. टिळकांचे तेच झाले.'' ''हो, राहून राहून एक आश्चर्य वाटते.'' बाबासाहेबांनी आपल्या नेहमीच्या मोजमापाच्या शब्दांत सगळ्यांना सकृद्दर्शनी पटणारा मुद्दा पुढे ठेवला, ''की ग्रंथालयासंबंधी त्यांनी तसे कुठेच काही विचार मांडलेले नाहीत. कुठल्यातरी ग्रंथालयातून त्यांची भाषणे झालीच असणार. पण या विषयावर ते बोललेले दिसत नाहीत.'' बाबासाहेबांच्या या अचूक भासणाऱ्या प्रश्नावर काय उत्तर द्यावे याचा चेहरा किंचित् लांबट करून अप्पा विचार करू लागले. ते म्हणाले, ''नाही कसे ? बोलले असलेच पाहिजेत. शोधला पाहिजे.'' यावर नेहमी अडचणीच्या समयी माझ्याकडे वळणारे केशवराव डोळे हसरे करीत बोलले, ''काहो, आहे का काही असे ?'' ''माझ्या खिशातून टाचलेले कागद काय म्हणताहेत हो ? याच विषयाचे आहेत का ? हो, सध्या टिळक-जन्मशताब्दीवाचून इतर काही विषय नाही कोणापुढे''. यावर मदनभाऊंनी तर्क चालवला, ''अहो, तेच असेल. खात्रीने तेच. काढा आता ते.''

## टिळकांना दिसलेली ग्रंथालयांची पार्श्वभूमी

खिशातले कागद काढून मी वाचू लागलो. मधून काही विवेचनही करू लागलो. ते विस्ताराने करू – ''मला लोकमान्यांचे ग्रंथालयाविषयी अनेक विचार अनेक स्थळी आढळले व ते मी टिपून ठेवले आहेत. त्यांच्या अचूक दूरवेधी दृष्टीने याही बाबतीत झेप घेतलेली होती. पण तो काळ ग्रंथालयांचा नव्हता. ग्रंथालयांच्या प्रस्थापनेआधी ग्रंथालयांचा ज्यांना उपयोग व्हावा ते



वाचक काही प्रमाणात तरी अस्तित्वात आले पाहिजेत. आज १९५६मध्येसुद्धा साक्षरतेचे प्रमाण किती टक्के आहे ? वीस टक्केसुद्धा नाही. मग १८९० किंवा १९०० च्या सुमारास हे प्रमाण काय असेल त्याचा तर्क मुळीच चुकणार नाही. त्यासाठी मराठीत ग्रंथनिर्मितीही अत्यल्प होती. सन १९००च्या सुमारास मराठीतील ग्रंथांची संख्या केवळ एक हजाराच्या आसपास होती. सारांश, वाचक नव्हते, ग्रंथ नव्हते एवढेच नाही तर विरोधी विषयांवर वाङ्मय निर्माण होण्यासारखा विचारसंग्रहही नव्हता. या सर्व परिस्थितीचा नेमका विचार लोकमान्यांनी जागोजाग केलेला आहे. आजच्याप्रमाणे त्या काळात ग्रंथालय व ग्रंथपालन हा विषय अश्रुत होता. शब्दसंग्रहातसुद्धा त्याला स्थान नाममात्र असणार. टिळकांनी ठाण्याच्या व मुंबईच्या संग्रहालयांना भेट दिल्याचे नमूद आहे. तेथे त्यांनी काही वक्तव्यही केले असणारच. पण केवळ ग्रंथालय असा स्वतंत्र विषय घेऊन त्यांनी विचार व्यक्त केलेले नाहीत. 'ग्रंथालय' या विषयाशी समांतर असणाऱ्या विषयांतून धागे एकत्र करावे लागतात, तसे ठिकठिकाणचे धागे एकत्र करण्याचा हा प्रयत्न आहे.

## ग्रंथालयासाठी आधी मराठीत ग्रंथ हवेत

'आधी काय ? ग्रंथ की ग्रंथालय ?' हा प्रश्न लोकमान्यांना केव्हाच सुचला असणार व त्यांचे त्यावर असे उत्तरही तयार असणार, 'सध्याच्या आमच्या देशस्थितीत विद्वान लोकांच्या बुद्धिसामर्थ्याचा बराच भाग ग्रंथनिर्मितीकडे प्रथम लागला पाहिजे असा माझा एकंदरीत ग्रह झाला आहे. ग्रंथ निर्माण झाल्याशिवाय ते वाचावयास येणाऱ्यापुढे काय ठेवणार ? पण ग्रंथ तरी कसे निर्माण होणार ? सर्व उच्च शिक्षण इंग्रजीतून आहे. त्यामुळे आपल्यातील सुशिक्षितांस मराठी ग्रंथलेखन तर लांबच, पण वाचनही कमीपणाचे वाटते. चांगली ग्रंथरचना होण्यास शिक्षितांच्या डोक्यात विचारसंग्रह गोळा होऊ लागला पाहिजे. त्यांतून नेमकी शब्दसामग्री भाषेत तयार झाली पाहिजे. वाचनासाठी ग्रंथांची जरुरी भासू लागली पाहिजे. ही ग्रंथालयाच्या तयारीची त्रिसूत्री आहे. मराठी भाषा घेतली तर मोरोपंत, वामन वगैरे कवींचेच केवळ ग्रंथ आहेत. त्यावाचून शिल्पशास्त्र, अर्थशास्त्र, रसायनशास्त्र, इत्यादी उपयुक्त विषयांवर मराठीत ग्रंथ पाहिजे आहेत. आज या विषयांवर सामान्य माणसांसाठी ग्रंथ मराठीत कुठे आहेत ? जुन्या कवींचे ग्रंथ विद्यार्थ्यांकडून घोकविण्यापेक्षा निरनिराळ्या शास्त्रीय विषयांवर मनन व अभ्यास मराठीतून करविल्यास जास्त उपयोग होईल हे उघड आहे. पण मराठीत कोणी उत्तम ग्रंथ लिहीत नाहीत. आम्ही फार तर बुद्धीमधली द्धि ऱ्हस्व असावी की दीर्घ असावी याची कीस काढीत बसलो. कांच सानुनाशिक लिहावा की साधाच लिहावा याची घासाघीस करीत राहिलो. विद्वानाचा पाय मोडावा की न मोडावा ? असले व्याकरणवाद करण्यास सरसावलो. पण ग्रंथरचना करून मराठीच्या अभिवृद्धसाठी किती प्रयत्न केले ? भाषेच्या खऱ्या अभिवृद्धीसाठी ग्रंथ हवे आहेत. अर्थात् ग्रंथसंग्रह तयार होण्यास त्यांचा खप हे एक अंग आहे. मराठीतून ग्रंथ लिहिण्याचे मनात आणले तर त्याची विक्री होऊन छपाईचा तरी खर्च निघेल की नाही याची आम्हास थोडीशी शंकाच वाटते. या शंकेचे मूळ म्हणजे आमच्या युनिव्हर्सिटीतील दोष होय. तो काढून टाकण्यास उत्तेजन मिळावयास पाहिजे तितके मिळत नाही आणि युनिव्हर्सिटीखेरीज इतर संस्थांनी व लोकांनीही

प्रयत्न केला पाहिजे, हे विसरता कामा नये. जो माल खपतो तो पिकतो. असा जो सर्वसामान्य नियम आहे, तोच ग्रंथरचनेसही लागू पडतो. नवनव्या विषयांवर निर्माण होणारे ग्रंथ खपण्यासाठी त्या विषयांची गोडी सामान्य माणसांसही लागली पाहिजे. युनिव्हर्सिटीत निदान काही विषयांचे अध्ययन मराठीतून झाल्याने मराठीला थोडेबहुत तरी खास उत्तेजन मिळेल अशी आमची समजूत आहे. अमूक एक मुख्य विषय कॉलेजांतून मराठीच्या द्वारे शिकवितात असे झाल्यावर मराठीत त्या विषयांवर लिहिलेली पुस्तके खपण्यास हे एक साधनच होईल. एकदोन विषय – उदाहरणार्थ, हिंदुस्थानचा इतिहास, संस्कृत – हे मराठीतून शिकविण्याची जर कॉलेजांतून सोय करता आली तर सदर भाषेला उत्तेजन देण्याचे कामी युनिव्हर्सिटीने आपले कर्तव्य केले असे होईल व त्यायोगे मराठीतील ग्रंथोत्पत्ती वाढेल. पण हा विचार कोण करणार ? मुळात ग्रंथ कोणासाठी हवे आहेत, का हवे आहेत, खरे विद्यालय कोणते, विद्यापीठ कोणते, ग्रंथालय म्हणजे काय ? हे खरे प्रश्न आहेत. पण ते कोण विचारतो आणि त्याचे उत्तर तरी कोण देणार ?

## ग्रंथालय, विद्यापीठ यांची व्याख्या

अनेक शास्त्रांचा व विद्यांचा रात्रंदिवस जेथे खल चालला आहे असे आश्रम म्हणजेच विद्यालय व विद्यापीठे, जुन्या काळी या देशांत पुष्कळ ठिकाणी आढळून येत असत. या विद्यापीठांतून ग्रंथालये असत. शास्त्रांचा अभ्यास व सतत मनन करणारे पुष्कळ विद्वान त्या ठिकाणी राहत असत. कृतार्थ होऊन परतलेल्यांनी दिलेली माहिती ऐकून दूरवरचे शेकडो विद्यार्थी विद्यार्जनाकरिता त्या ठिकाणी येत असत. अशा सर्व स्थळांस विद्यापीठ, विद्यामंदिर अथवा विद्याश्रम ही संज्ञा दिली जाई. आज ती विद्यामंदिरं अस्तित्वात नाहीत. पण शास्त्रांच्या सतत अभ्यासाची सोय ग्रंथालयांतून होऊ शकते. त्यांचा उपयोग करणाऱ्यांकडून मिळणाऱ्या माहितीवरून शहरांतले अधिकाधिक विद्यार्थी–वाचक ज्ञानार्जनाकरिता तेथे येऊ लागतात. सतत वाचनार्थ सिद्धता ठेवणाऱ्या या स्थळास ग्रंथालय ही संज्ञा दिली जाते. सुधारलेल्या राष्ट्रांतून याच प्रकारची आधुनिक विद्यालयं आढळून येतात. जर्मनी, इंग्लंड, फ्रान्स अथवा अमेरिका या देशांत जी ग्रंथालये आहेत ती विद्येची माहेरघरे आहेत असे म्हटले तरी चालेल. केवळ मनोरंजनार्थ वाचनासाठी असणाऱ्या देवघेवीने काम भागते असे तेथील ग्रंथालयांना वाटत नाही. शास्त्रांचा अभ्यास उत्तरोत्तर वाढत जावा, प्रत्येक शास्त्रात काही ना काही तरी नवीन शोध व्हावा या हेतूने ती ग्रंथालये साहाय्य करतात व त्याकरिताच ती स्थापन झालेली असतात. तो हेतू तडीस नेण्याकरिता चांगल्या रितीने निर्वाह चालेल अशी सर्व तजवीज ठेवतात. तसे सेवक कार्याच्या मानाने बरेच विद्वान गृहस्थ त्यांची योग्यता पाहून लोकांमध्ये केवळ विद्यावृद्धी करण्याच्या इराद्याने नेमले जातात. त्या देशांतून शाळा व कॉलेज यांची व्यवस्था गुरूपगुरूंकडे असते. ती व्यवस्था असणे अगदी स्वाभाविक आहे. आपले आयुष्य अध्ययन व अध्यापन यांत घालवितात. त्यासच विद्यार्थ्यांचे खरे गुणदोष असतात अथवा अडचणी समजून येणे शक्य असते. याप्रमाणेच तेथील ग्रंथालयातून व्यवस्थेचे काम अशा प्रकारे लोकहितबुद्धी बाळगणाऱ्या विद्वानांचे व विद्वान सेवकांचे हातून चालते.



## आमच्याकडील संस्था

परंतु आमच्याकडील प्रकार याहून अगदी भिन्न आहे. आमच्या ग्रंथालयातील आसन चांगल्या शिक्षितांसाठी ठेवलेले असतेच असे नाही. बहुश: तसे नसतेच. बरे, सार्वजनिक ग्रंथालयांतून उत्तम विद्वानांच्या नेमणुकीची सोय नाही तर नाही; पण कॉलेजांतून तरी ती पाहिजे की नाही ? तेथेही तिचा बहुंशी संपूर्ण अभावच नजरेस पडतो. तेथे काम तरी कोण करतात ? तेथे जे कोणी बदलतात ते अगदी तिसऱ्या–चौथ्या प्रतीचे शिक्षित कोणाच्या तरी वशिल्याने येत असल्यामुळे आमचे ग्रंथालय म्हणजे 'ग्रंथा, लय' होण्याचे ठिकाण झाले आहे. सेवकांचे राहो, आमच्या कोठल्याशा ग्रंथालयातूनही आधी खरे विद्याव्यासंगी व प्रतिष्ठित संचालकसुद्धा नाहीत. त्यांची संचालना अगदी तिऱ्हाइतांच्या म्हणजे विद्याभिलाषी प्रतिष्ठितांखेरीज इतरांच्या – इतर धंद्यांतील गृहस्थांच्या हातात आहेत. कार्यकारी समितीपासून प्रत्येक कामचलाऊ पोटसमितीपर्यंत जो तो आपल्या धंद्यांत गुंतलेला असतो. ह्या लोकांकरवी व्यवस्था होत असणाऱ्या ठिकाणास ग्रंथालय म्हणण्यापेक्षा दरसालच्या निवडणुकाच केवळ घेण्यासाठी रजिस्टर झालेली कंपनी म्हटले तरी चालेल. कार्यवाह महाशय हे कंपनीचे मुख्य डायेक्टर होत आणि गावातील वकील किंवा इतर धंद्याचे किंबहुना बिन धंद्यांचे पुढे पुढे करू लोक हे सदर कंपनीचे व्यवस्थापक ठरतात. अशा कंपनीत पडलेली माणसे विद्याव्यासंगात न गुंतता आपल्या 'व्यवसायात्मक' बुद्धीचा उपयोग तेथील राजकारणातच करू लागल्यास त्यात काही नवल नाही.

## उत्कर्षाबाबत सूचना

या परिस्थितीत सुधारणा व्हावयाची तर निर्वाहाची निर्वेध सोय असलेल्या व विद्याभिलाषी नी लोकहितबुद्धीच्या मंडळीकडेच सर्व व्यवस्था असली पाहिजे. याकरिता काही ध्येय निश्चित केले पाहिजे. हे ध्यानी घेता आमची लक्ष्मीपुत्रांस अशी विनंती की, श्री आणि सरस्वती यांचा संयोग त्यांनी येथे घडवून आणावा. देशातील श्रीमंत लोकांनी मोठमोठी विद्यालये नी ग्रंथालये स्थापून त्यांत सदोदित शास्त्राची चर्चा सुरू राहून त्यांचा पुढे उत्तरोत्तर उत्कर्ष होत राहील अशी व्यवस्था ठेवली पाहिजे. असे आमच्या देशात झाले तर विद्येचं बी येथे रुजून त्याचा लौकरच नामी वृक्ष तयार होईल. लक्ष्मीपुत्रांना ही जी विनंती केली आहे, तशीच शेवटी सरकारासही करावयास पाहिजे. कारण खरी ग्रंथालये स्थापण्याचे काम सरकारकडून झाले पाहिजे. इतर गृहस्थांकडून होण्याचे दिवस अद्याप आमच्या देशात आलेले नाहीत. ब्रिटिश म्युझियम, ऑक्सफर्ड, केंब्रिज लायब्ररी ऑफ काँग्रेस, वगैरे संस्थांस ज्याप्रमाणे उत्पन्ने तोडून दिलेली आहेत तशीच इकडच्या ग्रंथालयांसही मिळाली पाहिजेत. त्यासाठी ज्या तजविजी आवश्यक त्या अविलंबाने करून टाकल्या पाहिजेत. तशा तजविजी होतील व तशी उत्पन्ने मिळतील तेव्हाच ग्रंथालयांचा खरा भागोदय होऊन सुधारलेल्या राष्ट्रांतील ग्रंथालयांची त्यांस योग्यता येईल, यात कसलाही संदेह नाही.

''हे विचारकण मला मिळाले ते मी ग्रंथालयांच्या संदर्भात बसवून मंडळीसमोर ठेवले आहेत.'' वाचनाचा समारोप या शब्दांत झाला.

''घ्या. आणखी काय हवे ? लोकामान्यच ते. एक एक विचार असा मांडतील की तो पंचशीलेप्रमाणे पक्का आणि ती त्रिसूत्री...'' अप्पांचे तोंडून परमादराचे उद्‌गार बाहेर पडले. ''चला आता, शब्दसामुग्री, विचारसंग्रह व ग्रंथसंग्रह या त्रिसूत्रीवर विचार सुरू करू'', विठ्ठलरावांनी त्रिसूत्रीच्या झटपट उच्चाराने चर्चा समाप्त करून टाकली. उठता उठता केशवरावांनी तस्बिरीकडे पुन्हा एकवार आपली आदरयुक्त नजर वळवली. मदनभाऊंनी माझे कागद घेऊन आपल्या खिशात 'असू देत. उद्या आणून देतो' म्हणत ठेवले. बाबासाहेब आपल्या गळपट्याची गुंडाळी व आपली काठी हाती घेत, 'छान झालंय तुमचं हे संकलन' असे म्हणत उठले. मी मदनभाऊंना सुचवले, 'लिहा यावर काही', 'अवश्य, अवश्य लिहा, असे लिहीत गेलेच पाहिजे' अप्पा म्हणाले व त्यांनी माझ्या पाठीवर थाप टाकली.

❑❑❑

## ग्रंथवाचनाचे व्यसन – ४

''शेक्स्पिअर, मिल्टन, बायरन, शेले, वर्डस्वर्थ, टेनिसन इत्यादी प्रसिद्ध आंग्ल कवींच्या काव्यावर माझ्या तरुण मित्रांप्रमाणे मीही तेव्हा झुलत होतो. इंग्रजी व संस्कृत वाङ्मयावर तेव्हा प्रेम होते व अजूनही मी त्याची गडी फू केलेली नाही. तथापि ९५ पासून मराठी कवितेवर माझे जे प्रेम बसले ते उत्तरोत्तर वाढतच गेले. माझ्या विद्यार्थिबांधवांना मराठी कवींची नावेगावेही माहीत नव्हती. कॉलेजात जी पुस्तके शिकविली जात किंवा ज्यांच्या वाचनापासून परीक्षेचे प्रश्न अधिक चतुराईने सोडविण्यास साह्य होण्याचा संभव असे तेवढीच पुस्तके विद्यार्थ्यांच्या हाती दिसायची! परंपरा खंडित झालेली, दारिद्र्य वाढत चाललेले, समागमाचा अभाव, अंगाची उभारी नाही, कोणत्याच प्रकारचे प्रोत्साहन नाही, अशा प्रतिकूल परिस्थितीत पोटार्थी विद्यार्थ्यांचा सर्वत्र सुकाळ असायचा यात नवल नाही. विद्येची साहजिक आवड, ज्ञानार्जनाची तृष्णा, जन्मसाफल्याचा मार्ग शोधण्याची बुद्धी व तशा प्रकारचा समागम या गोष्टी सर्वकाळी दुर्लभच आहेत. रामदास, तुकाराम, मुक्तेश्वर, मोरोपंत, वामन यांचे ग्रंथ माझ्या अभ्यासाच्या खोलीत इतस्ततः विखुरलेले व त्यांच्या निवडक वचनांचे बोर्ड खोलीत भिंतीला टांगलेले असायचे. त्यांच्यातील मनोहर पद्ये आपल्या मनाशीच गुणगुणत पाठीमागील बागेत किंवा खोलीत मी आनंदाने स्वेच्छा विहरत असे.

**– चरित्रचंद्र**

**– ल. रा. पांगारकर**



# ग्रंथपरिचय

जगदीश एन. कुलकर्णी / वेदवती हब्बू

❑ **ग्रंथनाम :** ड्यूई डेसिमल क्लासिफिकेशन अँड रिलेटिव्ह इंडेक्स
**संपादक :** जॉन. एस. मिचेल, जुलीन्ने बेअल आणि इतर
**प्रकाशक :** ओसीएलसी
**बांधणी :** हार्डबॅक
**खंड :** चार
**प्रकाशन वर्ष :** जुलै २००३
**किंमत :** $ 500 (२६४०० रु. अंदाजे)

## दशांश वर्गीकरणाची २२वी आवृत्ती : एक परिचय

ग्रंथालय व माहितीशास्त्रात वर्गीकरण पद्धतीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. वर्गीकरणाशिवाय ग्रंथालयातील ग्रंथाची मांडणी व्यवस्थितरित्या होऊ शकत नाही. ग्रंथ वर्गीकरणपद्धतीचा शास्त्रशुद्ध प्रयत्न सर्वप्रथम अमेरिकन ग्रंथालयीन शास्त्रज्ञ मेलविल ड्युई याने १८७३ साली केली. दशांश वर्गीकरणपद्धतीची पहिली आवृत्ती १८७६ साली प्रसिद्ध झाली. त्यानंतर जगामध्ये अनेक प्रकारच्या वर्गीकरणपद्धतींचा शोध लागला. काही पद्धती चांगल्या विकसित झाल्या, तर काही काळाच्या ओघात नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. दशांश वर्गीकरणपद्धती जगात सर्वांत जास्त वापरली जाणारी एकमेव वर्गीकरणपद्धती आहे. वापरण्यातील सहजता, सुलभपणा, तयार वर्गांक याबरोबरच नियमित सुधारणा यामुळे ही वर्गीकरण–पद्धती सर्वत्र लोकप्रिय आहे. ज्ञानविश्वात वेळोवेळी भर पडलेल्या विषयांचा समावेश या वर्गीकरणपद्धतीमध्ये नियमितपणे केला आहे. या वर्गीकरणपद्धतीच्या नियमितपणे आवृत्त्या प्रसिद्ध झाल्यामुळे ही वर्गीकरणपद्धती सर्वसमावेशक झाली आहे.

सध्याचे युग माहिती–तंत्रज्ञानाचे युग आहे. ज्ञानविश्वात असंख्य विषयांची व उपविषयांची दिवसेंदिवस भर पडत आहे. या सर्व विषयांना सामावून घेण्याचे आव्हान दशांश वर्गीकरण पद्धतीने स्वीकारून अद्ययावत अशी या वर्गीकरण पद्धतीची २२वी आवृत्ती जुलै २००३ मध्ये प्रसिद्ध झाली आहे.

दशांश वर्गीकरण पद्धतीची १९वी आवृत्ती तीन खंडांत होती. २० व्या आवृत्तीपासून या

पद्धतीचे चार खंडांत प्रकाशन होत आहे. २२वी आवृत्ती ही चार खंडांत आहे. पहिला खंड प्रस्तावना व प्रमाणित उपविभाग सारण्यांचा आहे. यात २२ व्या आवृत्तीची वैशिष्ट्ये व आवृत्तीत केलेल्या बदलांची थोडक्यात माहिती दिली आहे. प्रस्तावनेत दशांश वर्गीकरणपद्धतीची माहिती व त्याचा वापर याविषयी चर्चा केली आहे. ग्लोसरीमध्ये वर्गीकरणपद्धतीमध्ये वापरलेल्या संज्ञांच्या व्याख्या दिल्या आहेत. प्रस्तावनेला सूचीची जोड आहे.

त्यानंतर दशांश वर्गीकरणपद्धतीच्या वापराविषयी सारणी व मुख्य वर्गांकाच्या क्रमाकांप्रमाणे सविस्तर चर्चा केली आहे. या खंडाचा मुख्य भाग प्रमाणित उपवर्ग सारणीचा असून त्यात सहा सारण्यांचा समावेश आहे. यापूर्वीच्या आवृत्तीत सात सारण्या होत्या. त्यातील क्रमांक सातची व्यक्तिसारणी वगळली असून त्या सारणीचा समावेश क्रमांक दोनमधील भूभागात केला आहे. शेवटी २१व्या आणि २२व्या आवृत्तीमधील फरक सांगितला असून बदललेले व वगळलेले क्रमांक दिलेले आहेत. या खंडाची ७३१ पृष्ठे आहेत.

खंड २ मध्ये मुख्य वर्गांकाची सुरुवात असून यात ००० ते ५९९ पर्यंतचे वर्गांक दिलेले आहेत. यात पाच मुख्य वर्ग अनुक्रमे सर्वसाधारण, तत्त्वज्ञान, धर्म, सामाजिक शास्त्रे, भाषा व शुद्ध विज्ञान, इत्यादींचा समावेश आहे. खंडाच्या सुरुवातीस मुख्य वर्ग व उपवर्ग यांच्या थोडक्यात तीन सारण्या केलेल्या आहेत. पहिल्या सारणीत मुख्य दहा वर्ग, दुसऱ्या सारणीत मुख्य वर्गाचे दहा उपवर्ग असे शंभर विभाग आणि तिसऱ्या सारणीत मुख्य वर्गाचे हजार विभाग पाडलेले आहेत. या खंडाची १२५० पृष्ठे आहेत.

खंड ३ मध्ये ६०० ते ९९९ असे पाच मुख्य वर्ग समाविष्ट आहेत. यात तंत्रज्ञान, कला, साहित्य आणि इतिहास, चरित्र व भूगोल, इत्यादींचा समावेश आहे. या खंडात १०७४ पृष्ठे आहेत.

खंड ४ मध्ये सापेक्ष निर्देश दिला आहे. या खंडात एकूण ९२८ पृष्ठांचा समावेश आहे. प्रारंभी सूचीमध्ये वापरलेल्या संक्षिप्त शब्दांचा विस्तार दिला आहे. एकूण ३९८३ एवढी या आवृत्तीतील चारही खंडांची पृष्ठसंख्या आहे.

एकविसाव्या आवृत्तीच्या प्रकाशनानंतर लगेचच बाविसाव्या आवृत्तीचे आणि चौदाव्या संक्षिप्त आवृत्तीचे कामकाज सुरू झाले. हे काम संपादक, दशांश वर्गीकरण संपादकीय धोरण समिती आणि विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ सल्लागाराच्या समितीने पूर्ण केले आहे.

दशांश वर्गीकरणाच्या नवीन २२व्या आवृत्तीत चालू विचार, ज्ञानविश्वातील सर्व ज्ञान त्याचबरोबरच त्यातील बदल वर्गीकृत केले आहेत.

समितीने दशांश वर्गीकरणाचे शेड्यूल्स, मॅन्यूअल आणि सापेक्ष सूचीचा अभ्यास व परीक्षण करून काही भागात सुधारणा व बदल केले आहेत. विषयाची व्याप्ती वाढवून, नवीन विषयांची भर घातली आहे. समितीने बदल करताना ग्रंथपालांना नवीन पद्धतीने वर्गीकरण करताना जुने वर्गांक बदलावयाची जास्त मेहनत लागू नये याचीही दक्षता घेतली आहे.

दशांश वर्गीकरण ही जागतिक पातळीवर वापरली जाणारी पद्धती आहे, हे लक्षात घेऊन या वर्गीकरणावर असलेले ख्रिश्चन व पाश्चिमात्य प्रभाव कमी करण्याचाही प्रयत्न केला आहे.



भूभागातील कायदा, राजकीय पक्ष, भाषा, साहित्य आणि ऐतिहासिक कालखंड यांमध्येही आवश्यक सुधारणा केल्या आहेत.

वर्गीकरणकर्त्यांची कार्यक्षमता वाढावी म्हणून काही बदल केले आहेत. यामध्ये मुख्यत: सारणी क्रमांक ७ काढून टाकला आहे. त्यातील आवश्यक वर्ग इतर सारणींत समाविष्ट केले आहेत. मोठी, वाचनास व समजण्यास अवघड असलेली वाक्ये बदलून सोपी छोटी छोटी वाक्ये टाकली आहेत. मॅन्यूअलमधील काही आवश्यक माहिती शेड्यूलमध्ये व सारणीमध्ये स्थानांतरित केली आहे. अनावश्यक माहिती काढून टाकली आहे.

संगणकशास्त्राच्या वर्गांकात लक्षणीय बदल केला असून अनेक नवीन विषयांना वर्गांक दिलेले आहेत. मुख्य वर्ग धर्म (२००) यावरील ख्रिश्चन धर्माचा प्रभाव कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. सामाजिक समूह व संस्था यांमधील नवीन संज्ञा व संकल्पना वाढवून पुन्हा पुन्हा आलेले क्रमांक वगळले आहेत. कायदा (३४०) वर्गांकामध्ये सुधारणा करून राष्ट्राचा कायदा, मानवी हक्क व आंतरशासकीय संघटना यासाठी सविस्तर वर्गांक दिलेले आहेत. गणित (५१०) मध्ये थोडासा बदल करून वर्गांक अद्ययावत करण्यात आले आहेत. ५१८ हा वर्गांक वापरात आणला आहे. वैद्यकशास्त्र (६१०) या विषयात सुधारणा करून विस्तार केला आहे. सूचीमध्येही नवीन संज्ञांचा समावेश केला आहे. प्रवाशासाठी असलेला ६४६.९४ हा वर्गांक बदलून तो ९१०.४६ व ९१३-९१९ या त्या त्या भूभागात दिला आहे. ऐतिहासिक कालखंडामध्येही सुधारणा केली आहे. सारणी क्र. ५ चे नाव बदलले असून ती Racial Ethnic, National Groups च्या ऐवजी Ethnic, National Groups असे केले आहे. सारणी क्रमांक पाच व सहाचाही विस्तार केला आहे.

दशांश वर्गीकरणाच्या २२ व्या आवृत्तीत अनेक सुधारणा केल्या असून ही वर्गीकरण पद्धती अद्ययावत व अधिकाधिक उपयोगी करण्याचा प्रयत्न केला आहे. इंटरनेटच्या साहाय्याने त्यांना अनेक लोकांशी संपर्क साधता आला, मते विचारात घेता आली, सुधारणा करता आल्या. त्यामुळे या आवृत्तीत अनेकांचा सहभाग लाभला व अनेक त्रुटी कमी करता आल्या. या सुधारणा ग्रंथपालाच्या दृष्टीने फायद्याच्या असल्या तरीही भारतीय ग्रंथपालाच्या दृष्टीने विचार करता भारतीय पातळीवर या सुधारणांविषयी सविस्तर चर्चा होणे आवश्यक आहे. त्यातूनच या आवृत्तीतील मर्यादा स्पष्ट होतील व त्याविषयी संपादक मंडळाशी संपर्क साधून पुढील आवृत्तीत सुधारणा करता येतील.

●●●

❑ Modern UGC NET / SET Library Science by A Team of Experts

प्रकाशक : नवी दिल्ली : अनमोल प्रकाशन, २००५.
किंमत : रु. ७५०/-
पृष्ठसंख्या : x, ४७७ भाग १ व २ एकत्रित.

महाविद्यालये, विद्यापीठे, इत्यादी शैक्षणिक क्षेत्रात व्याख्याता, प्राध्यापक किंवा संशोधक फेलोशिपचे स्थान, विद्यापीठीय ग्रंथालयातील सहायक ग्रंथपाल अशा विविध पदोन्नती वा नोकऱ्यांसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या परीक्षा पास होणे आवश्य आहे. त्यातीलच महत्त्वाच्या दोन परिक्षा म्हणजे SET (STATE ELIGIBILITY TEST) ही राज्यस्तरीय परीक्षा तर NET (NATIONAL ELIGIBILITY TEST) ही राष्ट्रीय स्तरावरील परीक्षा देणे अनिवार्य आहे.

या परीक्षेसाठी तीन पेपर असून पेपर – १ हा सामान्यज्ञानाचा असतो व वस्तुनिष्ठ प्रकारचा म्हणजेच प्रश्न व त्याखालील ४ उत्तरांतील एकावर खूण करून निवडण्याच्या प्रकारातील असतो. पेपर – २ हादेखील वस्तुनिष्ठ असून आपल्या विषयातील ज्ञानाची चाचणी घेण्यासाठीच असतो. पेपर – ३ हा मात्र आपण ज्या विषयाशी निगडित आहोत त्या संदर्भात असतो. परंतु प्रश्न व उत्तरे सविस्तर लिहून द्यायची असतात. यात दहा प्रश्न असतात ते १६ गुणांचे व ११वा एक प्रश्न ४० गुणांचा असतो. या अनुषंगाने विद्यार्थ्यांना मार्गदर्शनपर पुस्तकांची निकड असते. यासाठी सरावाचीही गरज असल्यामुळे, विविध पुस्तकांतून माहिती गोळा तर करावीच लागते; परंतु लिहण्याचा सरावही आवश्यक ठरतो.

अशा या परीक्षांसाठी अनमोल प्रकाशनने २००५ सालचे वाणिज्य, गणित, भूगोल ह्याबरोबर ग्रंथालयशास्त्राच्या अभ्यासासाठी हे पुस्तक प्रकाशित केले आहे.

भाग १ मध्ये २८ विभागांत ग्रंथालयशास्त्राशी निगडित विषय आहेत. तर भाग २ मध्ये १० संचांत (Groups) वस्तुनिष्ठ प्रश्न दिलेले आहेत.

पेपर २ व ३ साठीच सरावाची प्रश्न–उत्तरे आहेत व ती मर्यादित स्वरूपाची आहेत. यातील इंग्रजी भाषा सरळ सोपी आहे. परंतु बऱ्याच वेळा इंग्रजी वाक्यरचना चुकीचीही आढळते. तसेच या पुस्तकातील बराचसा भाग हा दुसऱ्या पुस्तकांतून उचलून संकलित केल्यासारखा आढळतो. उदाहरण द्यायचे झाल्यास पान क्रमांक ९१ वर राष्ट्रीय ग्रंथालय, कलकत्ता या संस्थेची माहिती अतिशय मोघम असून अतिशय संक्षिप्त, जुनी आहे. तसेच पान क्रमांक ९७ वरील राजा राममोहन रॉय ग्रंथालय फाऊंडेशनची माहितीही अशीच त्रोटक आहे.

नवीन व अद्ययावत माहितीचे ज्ञान सेट / नेट च्या विद्यार्थ्यांना आवश्यक आहे. त्याचा उल्लेख व त्याची माहिती ह्या पुस्तकात दिसत नाही. उदाहरणार्थ, ऑनलाईन नियतकालिके, मेटाडेटा, इत्यादी.

पुस्तकाच्या शेवटी विषयसूची (Index) असल्यास सोईचे जाते तीही नाही व टीम ऑफ एक्सपर्टस् मध्ये कोण लेखक आहेत यांचाही उल्लेख नाही. या सर्व त्रुटी जरी असल्या तरी पेपर ३ साठी जी विस्तारित प्रश्न–उत्तरे लिहावयाची आहेत त्यासाठी बरीच उपयुक्त माहिती आपणांस मिळते. उदाहरणार्थ, ग्रंथालयाचे प्रकार, ग्रंथालयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, वर्गीकरणाचे प्रकार व पद्धती, तालिकीकरण तसेच आंतरराष्ट्रीय संस्था ह्याचबरोबर NISSAT, INSDOC, UGC ह्यांची माहितीही विस्तृतपणे दिलेली आहे व ग्रंथालयशास्त्राच्या विषयांची तोंडओळख होते.



एक मार्गदर्शक किंवा वस्तुनिष्ठ प्रश्न कशा तऱ्हेने लिहावयाचे ह्याचा सराव म्हणून या पुस्तकाचा उपयोग करता येईल.

●●●

- अद्ययावत जनरल नॉलेज; प्रॅक्टिस पेपर सेट, २५ आदर्श प्रश्नपत्रिका उत्तरांसहित
  प्रकाशक व संकलन : K'sagar Publications, Pune
  दुसरी आवृत्ती – २००४
  किंमत : रु. १२०/-      पृष्ठसंख्या – ४२९

## ५,००० वस्तुनिष्ठ प्रश्नांची तयारी

विद्यापीठ अनुदान केंद्राच्या परीक्षा तसेच राज्यसेवा पूर्व परीक्षा, विक्रीकर निरीक्षक, मंत्रालय सहायक, इत्यादी परीक्षांसाठी वस्तुनिष्ठ प्रश्न–उत्तरांचा सामान्यज्ञानाचा एक संपूर्ण पेपर असतो. ग्रंथालयाशास्त्राची सेट / नेटची परीक्षा असो वा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेतल्या जाणाऱ्या वरील परीक्षा असोत, जनरल नॉलेज अर्थात सामान्यज्ञानाच्या परीक्षेशिवाय गत्यंतर नसते.

ह्यासाठी भारतातील चालू घडामोडी, महाराष्ट्रातून परीक्षा द्यायची असल्यास महाराष्ट्राचा भूगोल, ग्रामीण प्रशासन, सामान्य विज्ञान, कृषिविकास, इत्यादी विषयांवरील माहिती असणेही गरजेचे असते. ह्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे ह्या पुस्तकात अद्ययावत माहितीसह दिलेली आहेत.

शीर्षकात म्हटल्याप्रमाणे ह्यात २५ प्रश्नपत्रिका उत्तरांसहित असल्यामुळे सराव चांगलाच होतो. आपली माहिती अद्ययावत झाल्यामुळे उत्तरे पटापट निवडता येऊन वेळ वाचतो व परीक्षेच्या यशाची खात्रीही वाटते.

अद्ययावत माहिती, पानाच्या शेवटी चौकटीत ठळक बातम्या, महत्त्वाच्या साहित्यकृती, दिवस ह्यांच्यासाठी केलेल्या चौकटी ह्यामुळे अभ्यासकांना हे पुस्तक खूपच सोईचे ठरेल. काही त्रुटींचे उदाहरण म्हणजे पृष्ठ क्रमांक ३४९ वर –

> सुप्रसिद्ध उर्दू कवी व समाजवादी विचारसरणीचे उदारमतवादी व्यक्तिमत्त्व कैफी आझमी यांना साहित्य अकादमीची सन्माननीय व प्रतिष्ठेची फेलोशिप प्रदान करून गौरविण्यात आले.

ही बातमी दिली आहे. पण कधी ? हे दिलेले नाही. वर्ष, दिनांक दिले असते तर ते अधिक माहितीपूर्ण व अद्ययावत झाले असते. अशा बऱ्याच चौकटींतील घटनांना किंवा बातम्यांना दिनांक व वर्ष दिले असते तर बरे झाले असते.

तरीही ३१ प्रकरणांत विभागलेल्या ह्या पुस्तकातील क्रीडाविषयक, चालू घडामोडी, सन्मान / पुरस्कार, संकीर्ण महत्त्वाची माहिती, इत्यादींमुळे पुस्तकाचा दर्जा वाढण्यास मदत झाली आहे.

पुस्तकाची किंमतही फार नसल्यामुळे हे पुस्तक वैयक्तिक संग्रहाबरोबर ग्रंथालयासाठीही उपयुक्त ठरेल.

अशाच धर्तीवर, 'संपूर्ण फौजदार'* पूर्व परीक्षा हे पुस्तक K'sagar ह्या प्रकाशनांनी २००४ साली काढलेले आहे. ह्याची पृष्ठसंख्या ६३१ असून किंमत रु. २००/- आहे.

शीर्षकावरून जरी हे पुस्तक पोलिसांच्या परीक्षांसाठी असावे असे वाटले तरी सेट / नेटच्या अभ्यासकांनाही ह्याचा उपयोग होईल.

पुस्तकाची रचना सामान्यज्ञान व अंकगणित या दोन विभागांत केली असून, सोयीसाठी सामान्यज्ञानाच्या चार व अंकगणिताच्या तीन अशा सात प्रश्नपत्रिका त्या-त्या विभागात दिल्या आहेत. सामान्य क्षमता चाचणीची एक नमुना प्रश्नपत्रिका व १९९६, १९९७, १९९८ आणि २००० मध्ये पोलीस उपनिरीक्षक व विक्रीकर निरीक्षक, सहायक पदांसाठी घेण्यात आलेल्या पूर्वपरीक्षांच्या प्रश्नपत्रिका उत्तरांसह दिल्या आहेत. वस्तुनिष्ठ पेपर १ च्या परीक्षेचा मार्ग सुकर करण्यास हे पुस्तक उपयुक्त ठरावे.

टीप : वरील दोन्हीही पुस्तके मराठीत असल्यामुळे मराठीतून प्रश्नोत्तरे लिहिणाऱ्यांसाठी ह्याचा निश्चितच उपयोग होईल.

●●●

❑ **शीर्षक** : Metadata for Information Management and Retrieval

**लेखक** : David Haynes

**प्रकाशक** : London : Facet Publishing, 2004.

**किंमत** : £ 39.95

**पृष्ठसंख्या** : xiv, 186

आजच्या प्रगतीच्या घोडदौडीत नवीन नवीन शोध व माहितीची भर आणि अद्ययावत तंत्रज्ञान उपलब्ध होत आहे. या तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी अद्ययावत साधनेही उपलब्ध असावी लागतात. सर्वच क्षेत्रांत प्रगती होत असताना ग्रंथालये व माहितीशास्त्र विभाग तरी याला अपवाद कसा ठरणार ?

अशाच या माहिती युगात संगणकावर इंटरनेटद्वारे उपलब्ध होणाऱ्या माहितीच्या प्रचंड साठ्याची सत्यासत्यता पडताळणे, त्या माहितीचे नियोजन करणे, माहितीचा मूळ स्रोत कोणता किंवा मूळ लेखक किंवा निर्माता कोण ? Copyright चा हक्क अबाधित राहतो आहे ना ?



इत्यादी घटनांवर नियंत्रण ठेवणे जरुरी आहे. इलेक्ट्रॉनिक उपकरणांतील सतत येणाऱ्या माहितीच्या जंजाळावर थोडेफार तरी नियंत्रण ठेवण्यासाठी माहिती शास्त्रज्ञांना किंवा अद्ययावत ग्रंथपालांना 'मेटाडेटा' हे एक प्रभावी साधन उपलब्ध झाले आहे.

अशा या साधनाचा परिचय त्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी, मेटाडेटा म्हणजे काय ? मेटाडेटा हे महत्त्वाचे साधन कसे ? मेटाडेटाचा उपयोग काय ? तो कसा तयार करावा ? मेटाडेटाचे प्रकार, इत्यादींबाबतची विस्तृत माहिती व व्याख्या सविस्तर देऊन, मेटाडेटा हा शब्दप्रयोग कधी वापरात आला हे देताना लेखकाने म्हटले आहे "Metadata has been around since the first library catalogues were established over 2000 years ago. The term metadata probably first appeared in the 1960s & was adapted by the GIS specialist, database developers, statisticians & latterly in the 1990's by web community.

'मेटाडेटा' ह्या शब्दाचा अर्थ 'मूलभूत माहितीची मूलभूत माहिती' म्हणजेच 'Data about Data'. इलेक्ट्रॉनिक उपकरणातील माहितीची संकलितरित्या माहिती देणारी ही एक प्रकारची इलेक्ट्रॉनिक तालिकाच होय. ह्या संदर्भात इलेक्ट्रानिक तालिका 'MARC' ह्यांची आखणी करणे आवश्यक आहे हे या पुस्तकात अतिशय सहज व उत्सुकता वाटेल अशा पद्धतीने दिले आहे. डब्लिन कोर व त्यांचे घटक, डब्लिन कोरची मेटाडेटासाठीची महत्त्वाची भूमिका, मेटाडेटाच्या बांधणीत होणाऱ्या नवीन सुधारणा ह्यांची माहिती आलेख, चित्रांद्वारे स्पष्ट केलेली आहे.

मेटाडेटा असलेले वेबपेन फोटोसहित असल्यामुळे मेटाडेटाचा उपयोग सहज लक्षात येतो.

मेटाडेटासाठी वापरात येणारी HTML (Hyper Text MARK up Language) भाषा व इतर संगणकीय भाषांची म्हणजेच XML इत्यादी माहिती व त्यांचा मेटाडेटासाठी कसा वापर करता येईल हेही आकृतीसह विवेचन करून सांगितले आहे.

माहितीच्या व्यवस्थापनात मेटाडेटाचा मोठाच सहभाग आहे. किंबहुना मेटाडेटाला पर्याय नाही असे म्हटले तरी चालेल. इलेक्ट्रॉनिक उपकरणांवरील माहितीच्या व्यवस्थापनाचे मेटाडेटा हे साधन वाचक, ग्रंथपाल, माहिती शास्त्रज्ञ ह्यांच्यासाठी फारच मोलाचे आहे हेही ह्या पुस्तकात यथार्थपणे मांडले आहे. ह्या पुस्तकाचा मोठा प्रभावी गाभा आहे.

ज्यांना 'मेटाडेटा' ह्या विषयावर अधिक खोलवर अभ्यास करावयाचा असेल त्यांनी हे पुस्तक आवश्यक वाचलेच पाहिजे. प्रकरण १ ते ३ पर्यंत प्राथमिक माहिती जिज्ञासूंना नक्कीच उपयोगी पडणारी आहे. अद्ययावत ग्रंथालयासाठी या पुस्तकाचा समावेश ग्रंथसंग्रहात अवश्य हवाच !

❑❑❑

# ग्रंथालय व माहितीशास्त्र अभ्यसाक्रमाची नेट/सेट परीक्षा

सौ. यू. आर. कदम

## प्रस्तावना

विद्यापीठ अनुदान आयोगाने वरिष्ठ महाविद्यालये व विद्यापीठांमधील प्राध्यापक, व्याख्याते यांना चौथ्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करताना या पदावर नवीन नियुक्तीकरिता आवश्यक किमान पात्रतेबरोबरच आयोगाद्वारे घेतल्या जाणाऱ्या पात्रता परीक्षा उत्तीर्ण होण्याची अट घातली. वर्षातून दोन वेळा विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) बिगरविज्ञान विषयांसाठी राष्ट्रीय शैक्षणिक परीक्षेचे (NET) आयोजन करते. विज्ञान विषयांसाठी विद्यापीठ अनुदान आयोग आणि वैज्ञानिक व औद्योगिक संशोधन मंडळ (CSIR) हे दोन्ही संयुक्तरित्या परीक्षेचे आयोजन करतात. उमेदवारांच्या वाढत्या संख्येचा विचार करून व (UGC) च्या परीक्षेवरील ताण कमी करण्याकरिता १९९४ साली पुणे विद्यापीठाला राज्यस्तरीय पात्रता परीक्षेचे (SET) आयोजन करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले.

## परीक्षेचा हेतू

परीक्षा देणारे विद्यार्थी हे पदव्युत्तर पातळीपर्यंतचे शिक्षण पूर्ण झालेले असल्यामुळे त्या विषयातील पारंगत असतात. परंतु शिक्षण देण्याचे कार्य करण्यासाठी त्यांची बौद्धिक क्षमता योग्य आहे का नाही याचा शोध घेण्यासाठी आयोग ही परीक्षा घेते.

## किमान पात्रता

नेट/सेट परीक्षा देण्यासाठी उमेदवाराने पदव्युत्तर शिक्षण किमान ५५ टक्के गुण मिळवून पूर्ण केलेले असावे. ज्या विषयात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले असेल त्याच विषयाची परीक्षा देता येते. उदाहरणार्थ, विद्यार्थी जर एम.लिब. ॲण्ड आय.एस्सी. या विषयाची परीक्षा उत्तीर्ण झाला असेल तर तो नेट/सेट परीक्षा याच विषयाची देऊ शकतो. तसेच पदव्युत्तर शिकणारे विद्यार्थीसुद्धा या परीक्षेला बसू शकतात; परंतु त्यांना पदव्युत्तर परीक्षेच्या निकालाची प्रत जमा केल्यानंतरच नेट / सेट उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र मिळते.



### परीक्षेचे स्वरूप

| *पेपर क्रमांक* | *स्वरूप* | *एकूण प्रश्न* | *एकूण गुण* | *वेळ* |
|---|---|---|---|---|
| (१) | सर्वांसाठी अनिवार्य | ५० वस्तुनिष्ठ प्रश्न | १०० | ७५ मि. |
| (२) | ऐच्छिक विषय | ५० वस्तुनिष्ठ प्रश्न | १०० | ७५ मि. |
| (३) | ऐच्छिक विषय | विश्लेषणात्मक | २०० | १७० मि. |

### परीक्षेच्या तयारीसाठी उपयुक्त अभ्यासक्रम

**(अ) अनिवार्य पेपर क्रमांक - २**

शैक्षणिक दृष्टिकोन
मानसिक क्षमता चाचणी
आकडेवारी विश्लेषण व ओळख वाचन
उतारे, इतिहास, भूगोल, अर्थव्यवस्था
गणिती प्रश्न
चालू घडामोडी

**(आ) पेपर क्रमांक २ व ३**

पदव्युत्तर परीक्षेसाठी असणारा सर्व अभ्यासक्रम तसेच पदवी परीक्षेचाही अभ्यासक्रम आवश्यक

## नेट व सेट परीक्षेची तयारी

मानवी मेंदूला सतत नावीन्याचा ध्यास असतो व त्यानुसार प्रत्येक व्यक्ती ही ज्ञान प्राप्त करीत असते. त्याप्रमाणे मीदेखील माझ्या शैक्षणिक प्रगतीसाठी व सर्वंकष ज्ञान प्राप्त करण्याच्या उद्देशाने नेट/सेट परीक्षेची तयारी चालू केली. परीक्षेचा अर्ज भरल्यानंतर पुन्हा एकवार नव्या जोमाने अभ्यासाला सुरुवात केली. मागील सालातील झालेल्या परीक्षांचे प्रश्नपत्रिका संच मिळविले व अभ्यासाला सुरुवात केली. कठोर परिश्रम, तज्ज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन मिळाले तरीही पहिल्या एकदोन प्रयत्नांत यश हाती आले नाही. परीक्षेची तयारी करताना कोणत्या प्रकारे उत्तराचे स्वरूप अपेक्षित आहे किंवा मूल्यमापनामध्ये आपण कोठे कमी पडतो याबद्दल मात्र काहीच माहिती मिळत नव्हती. अशा प्रकारे प्रयत्न तर चालूच होते. परंतु यश हाती येत नव्हते.

काही प्रश्नांकरिता संदर्भ मिळविण्यासाठी वालचंद कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगचे ग्रंथपाल डॉ. एस.ए.एन. इनामदार यांच्याकडे गेले होते. त्या वेळी त्यांनी परीक्षेच्या तयारीसंदर्भात चौकशी

केली असता माझ्या मनातील विचार मी त्यांच्याजवळ व्यक्त केले की नेट/सेट परीक्षेची विश्लेषणात्मक उत्तरपत्रिका लिहिताना कोणत्या प्रकारे उत्तरे द्यावीत याचे मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे. या परीक्षेसाठी आम्ही कोणत्या प्रश्नामध्ये मागे पडतो व त्यात सुधारणा करण्याच्या दृष्टीने काय प्रयत्न करावेत याचे मार्गदर्शन आम्हांला कोठेच मिळत नाही. त्यावर त्यांनी उपाय सुचविला की ग्रंथालयशास्त्रातील तज्ज्ञ व्यक्तींना मार्गदर्शनासाठी बोलावून आपण नेट/ सेट मार्गदर्शन शिबिर आयोजित करू या. त्याप्रमाणे त्यांनी सांगली येथील य. च. म. मुक्त विद्यापीठाच्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अभ्यासकेंद्रात शिबिर आयोजित केले. या दोन दिवस चालणाऱ्या मार्गदर्शन शिबिरासाठी डॉ. श. रा. गणपुले व डॉ. सु. प्र. सातारकर, ग्रंथपाल, स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांना आंमत्रित करण्यात आले होते. या दोन्ही तज्ज्ञ व्यक्तींनी पात्रता परीक्षेसाठी असणाऱ्या तीनही पेपरसाठी उत्तम मार्गदर्शन केले व त्यामुळे माझ्या अभ्यासाला एक निश्चित दिशा प्राप्त झाली. या दोन्ही मान्यवरांच्या मार्गदर्शनाचे फलस्वरूप म्हणजे मला सेट परीक्षेमध्ये मिळालेले यश होय.

अनिवार्य पेपरची तयारी करताना 'विद्याभारती प्रकाशन' चे प्रा. ब्रिजमोहन दायमा यांचे 'नेट/सेट मार्गदर्शन – अनिवार्य पेपर क्रमांक १' याचा अत्यंत उत्तम प्रकारे उपयोग झाला. या पुस्तकामध्ये दिलेल्या मागील वर्षांच्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिका व इतर ठिकाणाहून मिळविलेल्या प्रश्नपत्रिकांचे संच यांचा घड्याळ लावून सोडविण्याचा सराव केला. त्यामुळे वेळेत पेपर पूर्ण करण्याकडे लक्ष देण्याची सवय झाली. सदरच्या पुस्तकात दिलेली स्पष्टीकरणे व नमुन्यादाखल सोडवून दाखविलेली उदाहरणे खूपच साध्या सोप्या भाषेत असल्यामुळे फारशा अडचणी उद्‌भवल्या नाहीत.

पेपर क्रमांक २ हा आपण निवडलेल्या विषयातील वस्तुनिष्ठ प्रश्न अशा स्वरूपाचा असतो. या पेपरची तयारी करताना बी.लिब. अभ्यासक्रम व एम.लिब. अभ्यासक्रम यांमध्ये समाविष्ट असलेल्या प्रश्नपत्रिका तसेच सेटच्या मागील झालेल्या प्रश्नपत्रिकांचा संच मिळविला व त्यांचा उपयोग चांगल्या रितीने झाला. याबरोबरच विश्लेषणात्मक उत्तरांची तयारी करीत असताना स्वत:च्या बुद्धिचातुर्याच्या वापर करून वस्तुनिष्ठ प्रश्न तयार केले व त्यांचा अभ्यास केला. अशा रितीने जास्तीत जास्त वस्तुनिष्ठ प्रश्नांची तयारी केल्यामुळे प्रश्नपत्रिका सोडविण्यास मदत झाली. याबरोबरच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाकडून प्रकाशित होणाऱ्या 'ज्ञानगंगोत्री' च्या अंकात वस्तुनिष्ठ प्रश्न व त्यांची उत्तरे मिळाली.

पेपर क्रमांक ३ मध्ये विश्लेषणात्मक उत्तरे लिहावी लागतात. त्यासाठी तुम्ही निवडलेल्या विषयातील सर्वंकष माहिती असावी लागते. सर्वसामान्यपणे प्रत्येक विद्यार्थ्याला हा पेपर सोडविताना अनेक अडचणी येतात. या प्रश्नपत्रिकेमधील प्रश्नांचे स्वरूप समजावून घेऊन त्यांचे घटक पाडून त्याद्वारे प्रश्नाला अनुसरून उत्तर लिहणे आवश्यक असते. हे सर्व करीत असताना एका प्रश्नासाठी किती वेळ द्यावयाचा याचे नियोजन करणेही महत्त्वाचे असते. आपल्या अभ्यासकेंद्रावर आयोजित करण्यात आलेल्या मार्गदर्शन शिबिरामध्ये डॉ. श. रा. गणपुले यांनी या प्रकारचे प्रश्न सोडविताना प्रश्न समजावून घेतल्यानंतर त्याचे घटक पाडून कोणत्या मुद्यावर जास्त भर देऊन उत्तर लिहावे व त्याचे नियोजन कसे करावे याबाबत जे मार्गदर्शन केले ते खरोखरीच मौलिक होते. तसेच डॉ. सु.



प्र. सातारकर यांनी पेपर क्रमांक १ व २ साठी केलेले मार्गदर्शन, गणिती प्रश्न सोडविण्याच्या सांगितलेल्या अत्यंत सोप्या पद्धती आणि पेपर क्रमांक ३ मधील प्रश्न सोडविताना वेळेत प्रश्न कसे पूर्ण करावयाचे याचे नियोजन याबद्दल जी माहिती दिली ती अत्यंत उपयुक्त ठरली. 'TIME MANAGEMENT' चे डॉ. सातारकरांनी सांगितलेले तंत्र खूपच उपयुक्त ठरले.

सरतेशेवटी मला इतकेच सांगावेसे वाटते की, प्रयत्न करीत राहणे हा मानवाचा स्थायी भाव आहे. अथक प्रयत्नांना यश हे नेहमीच प्राप्त होते.

## *संदर्भ*

(१) प्रा. ब्रिजमोहन दायमा – नेट / सेट मार्गदर्शन अनिवार्य पेपर क्रमांक १ करिता उपयुक्त, लातूर, विद्याभारती प्रकाशन, २००१.

❑❑❑

## मौखिक पदकोशाचा नमुना

रामकृष्णबुवा नावाचा एक चांगला साधक पंढरीस पाहिला. तो महा ज्ञानेश्वरीभक्त होता. संपूर्ण ज्ञानेश्वरी त्याला पाठ होती, इतकेच काय पण कोणत्याही श्लोकावरील ज्ञानेश्वरीतल्या ओव्या तो उलटयासुलट्या म्हणू शके व कोणताही ज्ञानेश्वरीतला शब्द विचारला तर तो कोठे कोठे आला आहे हे त्या त्या ठिकाणच्या ओव्या म्हणून संदर्भासह त्यांचा अर्थ सांगे ! ज्ञानेश्वरीशी इतका तन्मय झालेला अभ्यासू चिकित्सक दुसरा माझ्या पाहण्यात नाही. पट्टीचे कीर्तनकारसुद्धा रामकृष्णबोवापुढे हात टेकीत. निरूपणाचा ओघ पाहून ते आगाऊच ओव्या सुचवीत. वारकऱ्यांत ९ वा व १२ वा हे अध्याय पुष्कळांस पाठ असतात. चांगल्या कीर्तनकारांसही काही ठरावीक श्लोकांवरील ठरावीक ओव्याच तेवढ्या पाठ असतात. मी शेदोनशे वारकरी पद्धतीची निरूपणी कीर्तने ऐकली; पण ती पुढे पुढे एका साच्याची वाटू लागली. रामकृष्णबोवांना आम्ही पुष्कळदा कीर्तन करण्याविषयी आग्रह केला; पण त्यांचे एकच उत्तर असे– 'हा जन्म श्रवणभक्तीला दिला आहे, पुढला जन्म कीर्तनभक्तीला देऊ.' रामकृष्णबोवा निर्लोभ, निर्मान, साधा गृहस्थ होता. कोणाच्या डोळ्यांत खुपायचा नाही, अहंकाराचा लवलेश नाही. रामकृष्णबोवा ज्ञानेश्वरीचा जिवंत 'संदर्भग्रंथ' होता.

**चरित्रचंद्र, पृ. १५७**
**– ल. रा. पांगारकर**

# वेब (सर्च इंजिन्सची कल्पना)

मोहन पाठक

इंटरनेटच्या वाढत्या वापराबरोबर काही नवीन संकल्पना, काही नवीन शब्द आपल्या अतिशय सरावाचे झाले आहेत. अशीच एक संकल्पना म्हणजे 'सर्च इंजीन'. इंटरनेटवर एखाद्या विषयाची, व्यक्तीची माहिती शोधावयाची झाल्यास आपण सरावाने एखाद्या सर्च इंजीनच्या माध्यमाचा वापर करतो व अशा सर्च इंजीनच्या साहाय्याने त्या विशिष्ट विषयावरील कल्पनातीत साईटस् आपल्यासमोर उघडल्या जातात. सर्च इंजीनमधील 'सर्च' या पर्यायावर क्लिक करताच हे सर्व काही सेंकदात घडून येते. या माहितीच्या जाळ्यातून ही माहिती शोधण्यासाठी जणू काही जाळ्यात एखादा कोळी सोडावा व त्याने हे क्षणार्धात करावे असे घडते. शिवाय हे सर्व 'भासमान वास्तवातून' (Virtual reality) आपल्या समोर येते. समोर येते तेही 'भासमान वास्तव' या सदरात मोडणारे असते. हे सर्च इंजीन म्हणजे एक प्रकारची आज्ञावलीच असते. कामांची वा सूचनांची सुनियोजित अशी ही यादी असते. तिच्या वापरामुळे संगणकाला पूर्वनियोजित पद्धतीने वागावे लागते. इंटरनेटचा वापर आता इतका सहज झाला आहे की विशिष्ट अशा सर्च इंजीनवर जाऊन आपण माहिती शोधाची प्रक्रिया पूर्ण करतो. आपण सर्च वर क्लिक करताच आपण दिलेला शब्द, संज्ञा ज्या ज्या साईटस्वर असतील त्या सर्व साईटस् उघडल्या जातात.

अशी सर्च इंजिन्स आहेत तरी किती, ही कोणी व कधी तयार केली हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. यातील काही सर्च इजिन्स व त्यांची थोडक्यात माहिती सदर लेखात दिली आहे. ग्रंथपाल म्हणून काम करताना या सर्च इंजिन्सचा तुलनात्मक विचार करणेही कित्येकदा उपयोगाचे ठरते.

## हॉट बॉट (Hot Bot)

वेबवरील माहिती शोधण्यासाठी इनक्टोमी कार्पोरेशन व 'वायरड् मॅगॅझीन'चे प्रकाशक हॉट वायरड् यांनी संयुक्तपणे हा प्रोग्राम बनविलेला आहे. समांतर अशा वर्कस्टेशन्सचा वापर करून हॉटबॉट या वर्कस्टेशन्सचे जाळे तयार करते (Network of work stations - Now). इतर सर्च इंजिन्सपेक्षा असणाऱ्या या वेगळेपणामुळे वेबवर उपलब्ध असणाऱ्या माहितीचा वेग अधिक नीट सांभाळता येतो असे त्यांचे म्हणणे आहे.



## स्पायडर

स्वयंचलित पद्धतीने वेब पेजेस गोळा करणारा हा प्रोग्राम आहे. जाळ्यावर रांगत जाऊन कोळी ज्याप्रमाणे भक्ष्य आणतो तशी ही वृत्ती असल्याने या प्रोग्रामला हे नाव दिले गेले. ही वेब पेजेस सर्च इंजिन्सना पुरविली जातात. जाळ्यावर रांगणाऱ्या (webcrawler) असेही या प्रोग्रामचे वर्णन आढळते. अल्टाविस्टा सारख्या मोठ्या इंजिन्सचे समांतर स्पायडर्स एकाच वेळी कार्यरत असतात.

## लायकॉस

काही सर्च इंजिन्स अतिशय लोकप्रिय ठरली आहेत. अशांपैकी लायकॉस हे सर्च इंजीन व डिरेक्टरी आहे. फुलटेक्स्ट देणारे इंजीन, वेबसाईटचे वर्गवार विश्लेषण करून सुनियोजित केलेली डिरेक्टरी ही जशी लायकॉसची वैशिष्ट्ये आहेत, त्याप्रमाणेच निवडक साईटस्ची परीक्षणे ही लायकॉसमुळे उपलब्ध होतात.

## याहू

जगात जेव्हा जेमतेम शंभर-सव्वाशे वेबसाईटस् होत्या तेव्हा म्हणजे १९९४ च्या सुमारास बनविली गेलेली ही डिरेक्टरी म्हणजे आश्चर्य मानले जाते. याहू चा व शम्मीकपूरच्या जंगलीतील याहूचा अर्थार्थीही संबंध नाही ! याहूतील अक्षरे ही 'यट अनदर हारराकिकल ऑफिशियल आरॅकल' या नावाची अद्याक्षरे आहेत व वेबसाईटस्च्या वर्गीकरणाच्या व डिरेक्टरी बनविण्याच्या नादातून 'याहू' अस्तित्वात आले. हा नाद लागलेले तरुण इंजिनीअर्स होते जेरी यांग (२५ वय) व डेव्हिड फिलो (२६ वय). अमेरिकेच्या स्टॅनफोर्ड विद्यापीठात सुरू झालेल्या या वेब इंजीन, डिरेक्टरी व साईटची आज प्रचंड मोठी इमारत आहे.

## जुगहेड

हे सर्च इंजीन गोफर साईटस्साठी वापरले जाते. गोफर ही अगदी सुरुवातीची इंटरनेट सर्व्हरवर फाईल्स डिस्प्ले करणारी पद्धत आहे.

या सर्च इंजिन्सची खोलात जाऊन तात्त्विक माहिती ही इंटरनेटवरील शोधासाठी आवश्यक नाही, परंतु याबद्दल जुजबी माहिती असणे आवश्यक ठरते. गुगल सारखे सर्च इंजीन व त्यावर उपलब्ध करून दिली जाणारी ग्रंथालये, मेटा टॅग सारखे वेगळे काम करणारे इंजिन व लोकप्रिय असणारे 'याहू' हे इंजीन याबाबत व अशा इजिन्सबाबत प्राथमिक माहिती असेल तर शोध अधिक दिशापूर्ण ठरतो. शिवाय डिरेक्टरी, इंडेक्सर, इंजीन यात काय फरक आहे ? इंटरनेट व इंट्रानेट मध्ये काय फरक असतो, वेब साईट, वेब पेज हे शब्द कशासाठी वापरावयाचे असतात यासंबंधी कल्पना असणे फायद्याचे ठरते. रेडिओतून येणारा आवाज कसा येतो याचे एकेकाळी कुतूहल असे. ते समजावून घेण्यासाठी रेडिओतील यंत्रणा समजली नाही तरी चालते; पण

ध्वनिलहरीची जुजबी माहिती असणे त्या काळी उपयुक्त ठरायचे. तसेच हे आहे. यातील तंत्रज्ञान समजावून घेणे ही गरज नाही, मात्र तंत्र काय असू शकते याची कल्पना असावी.

(बेटी सी. जुंग यांनी संकलित केलेली सर्च इंजिन्सची सूची सोबत देत आहोत. यात विषयवार शोध घेणारी इंजिन्स आहेत.)

## Search Engines Index Main Table of Contents (Click on title to get specific listings)

| | | | |
|---|---|---|---|
| Ask An Expert | Clearing houses | Connecticut Search Engines | Current Events |
| Education | Everything You Ever Wanted | General Search Engines | Government |
| Health Sciences | Law | Libraries | Magazines |
| Medical Article Search | Metaengines | News Sources | Public Health |
| Reference Books | Topical Search Engines | Not Yet | Not Yet |

## Libraries

- Argus Clearing house
- Colorado Alliance
- Connecticut State Library
- Gabriel
- Health & Medicine (University of Nebraska - Lincoln Library)
- Internet Resources Collection (University of Nebraska - Lincoln)
- Library of Congress
- Library of Congress Map Collection
- Library Spot
- Lib Web
- The Internet Public Library
- The National Library of Medicine



- The New York Public Library
- The Virtual Library
- THOMAS
- Uconn Health Center - Lyman Maynard Stowe Library
- UVA Electronic Text Center

## Reference Books

- A Web of On-line Dictionaries
- Dictionary.Com
- Encyclopedia Britannica
- Education World's Online Encyclopedia and References
- First Research.Com
- Grammar Lady

❑❑❑

## ग्रंथवाचनाचे व्यसन – ५

नगरवाचनालयाला माझ्यासारखा वाचक कोणी भेटला नसेल ! सेक्रेटरीशी संधान बांधून कपाटाच्या किल्ल्या घ्यायच्या, कपाटे चाळावयाची, लागतील ती ५।६ पुस्तके घ्यायची व माडीवर १२ वाजता जाऊन रात्री ८ वाजेपर्यंत वाचीत बसायचे असा माझा क्रम कैक महिने चालू होता ! मोठ्या माणसांच्या विचारांशी परिचय होणे ही केवढी भाग्याची गोष्ट होय ! त्यांचे मृतात्मे आपल्याशी बोलू लागतात, ते आपल्या विचारधनामुळे अमर असतात ! **आपल्या चित्ताला त्यांच्या संगतीने आनंद होतो, आपले विचार उन्नत होतात, मनोमळ धुतला जाऊन शीलसंवर्धनाच्या कामी त्यांचा उपयोग होतो ! आपणही यांच्यासारखेच मोठे व्हावे अशी यांच्या संगतीत इच्छा प्रादुर्भूत होते.** विद्याव्यासंग निर्लोभ, निर्दंभ असतो म्हणून त्यापासून खरा आनंद होतो. विद्यानंदाला विषयानंदाच्या वरची पण ब्रम्हानंदाच्या खालची पायरी योगवासिष्ठाने दिली आहे. मी ग्रंथांच्या संगतीतच वाढलो आहे. विद्या हे अविनाशी धन आहे. **अलेक्झांड्रिया येथील ग्रंथालयावर 'मनाचा दवा व बुद्धीचे औषध' अशी अक्षरे खोदलेली असत !** मला सद्ग्रंथांचे उपजत प्रेम असल्यामुळे ह्या जगात दुसऱ्या कशानेही न मिळणारे आत्मसमाधान मी पावलो आहे.

**चरित्रचंद्र**

**– ल. रा. पांगारकर**

# ग्रंथोपचारपद्धती (बिब्लिओथेरपी)

मोहन पाठक

मानसिक व शारीरिक आजार, विकारांवर उपचार करण्याच्या अक्षरश: अगणित उपचार पद्धती आज जगात विकसित झालेल्या आपण पाहतो. या पद्धतीतून वापरली जाणारी साधने व माध्यमेही अनेक आहेत. अशा पद्धतींमध्ये ग्रंथांच्या साहाय्याने उपचार करण्याची काही पद्धती आहे, याची जाणीव आपल्याला नसते. बॅरिक्सोन अरबिब नावाच्या लेखकाने 'बिब्लिओथेरपी इन स्कूल लायब्ररीज : एन इस्रायली एक्सपरिमेंट' या 'स्कूल लायब्ररीज वर्ल्ड वाइड' (६ (२) जुलै २००० पृ. १०२-१०) नियतकालिकातील लेखकात म्हटले आहे, ''Despire the direct connection of bibliotherapy to books and libraries and its potential as a means of support, it has not attained a clear status in library science'' ग्रंथालयशास्त्राशी संबंध असणारा हा विषय आहे व या विषयात पारंगतता मिळाल्यास व्यवसायाच्या अनेक संधी निर्माण होऊ शकतात हे याबाबत समजणे आवश्यक आहे.

आपल्याला नवा वाटणारा असा हा विषय बराच विकसित आहे व पाश्चात्त्य देशांनी या विषयाचा सखोल अभ्यासही केलेला आहे. ब्रिटिश नॅशनल लायब्ररीसारख्या मोठाल्या ग्रंथालयांमध्ये या विषयावर असंख्य पुस्तके असलेली दिसतात तर लिझासारख्या सूची व सार सेवेच्या यादीत या विषयांवरील लेखांचे हजारोंनी संक्षेप आढळतात. पाश्चात्त्य देशांतील सर्व प्रमुख रुग्णालयांची ग्रंथालये आहेत व या रुग्णालयांच्या पॅनल्सवर ग्रंथालयशास्त्राचा व्यासंग असणारे ग्रंथोपचारतज्ज्ञही आहेत. आजारपणात वा मानसिक विकारग्रस्त अवस्थेत काय वाचावे याचा सल्ला देऊन त्यानुसार ते वाचून घेतले जाणे या पद्धतीत अपेक्षित आहे. ग्रंथातील ही ताकद आपणही कधीतरी अनुभवलेली असते. याचे उदाहरणच द्यावयाचे झाल्यास २८ एप्रिल २००० च्या महाराष्ट्र टाइम्स दैनिकातील एका बातमीचे देता येईल. या बातमीचा मथितार्थ, ''उत्कृष्ट साहित्याचे वाचन माणसाला हृद्रोगापासून वाचवू शकते' असा होता. एवढ्या गंभीर आजारातही ग्रंथाचे वाचन उपकारक ठरते.

## बिब्लिओथेरपी

बिब्लिओ या शब्दाचा सोप्या शब्दात अर्थ पुस्तक असा आहे व थेरपी म्हणजे उपचार. या शब्दाची व्याख्या 'ॲलन केंटच्या एनसायक्लोपीडिया ऑफ लायब्ररी ॲड इन्फर्मेशन सायन्स' मध्ये पुढीलप्रमाणे करण्यात आली आहे.

''Bibliotherapy is the use of books and related materials in the treatment of sick.''



या उपचारपद्धतीचा वापर बराच पुरातन आहे. मध्ययुगात तेराव्या शतकात कैरोत नव्यानेच बांधण्यात आलेल्या अलमन्सूर हॉस्पिटलमध्ये औषधोपचारांबरोबरच कुराण वाचून दाखविण्यासाठी धर्मगुरूंना सकाळ संध्याकाळच्या ठरावीक वेळा नेमून दिलेल्या होत्या. धार्मिक स्वरूपाचे साहित्य हे या संकल्पनेचा उगम व विकास होण्यामागील प्रमुख प्रेरणा असले तरी धार्मिक साहित्याने साधला जाणारा परिणाम हा या संकल्पनेत अभिप्रेत आहे काय याबाबत विद्वानांमध्ये मतभेद आहेत. वास्तविक स्वास्थ्यप्राप्ती होणे म्हणजे रोगमुक्त अवस्था असेल तर धार्मिक साहित्याच्या उद्देश्याशी हे सुसंगतच आहे. बायबलचा असा वापर होण्यावर त्यापुढील काळात मतभेद झालेले आढळतातही. पण पुढील काही शतकांत धार्मिक साहित्य हे उपचार पद्धतीत लक्षणीयरित्या वापरले गेले. किंबहुना 'रुग्णालयाची ग्रंथालये' देखील अशा साहित्यानेच सुरू झाल्याची इतिहासात नोंद आहे. धार्मिक हेतूने ग्रंथांचे वाचन करून फलप्राप्ती करण्याचा प्रघात पौर्वात्य धर्मांमध्येही पूर्वापार आढळत आला आहे.

अठराव्या व एकोणिसाव्या शतकात या उपचारपद्धतीचा वापर अधिक मोठ्या प्रमाणात झाला. इंग्लंड, फ्रान्स, स्कॉटलंड या देशांत तर अनेक वैद्यकीय व्यावसायिक उपचारपद्धती-बरोबरच ग्रंथांची यादीही सुचवायला लागलेत. यात धार्मिक ग्रंथांबरोबरच साहित्यकृतींचा समावेशही व्हावयास लागला. अमेरिकेत ग्रंथोपचाराचा जाणीवपूर्वक प्रयोग बेंजामिन रश या वैद्यक व्यावसायिकाने केल्याची नोंद आहे. १८१० मध्ये त्याने- ''आसायलममध्ये फक्त कार्यशाळा व परिसंवाद ठेवण्यापेक्षा रुग्णांकडून वाचन-लेखन करून घेणे अधिक उपयुक्त ठरेल'' अशी नोंद केली आहे.

## बिब्लिओथेरपीवरील पहिला लेख

हा विषय वैद्यकशास्त्राच्या उपयोगाचा असला तरी ग्रंथालयशास्त्रातील तज्ज्ञताही या विषयाची मोठी गरज आहे. या विषयावरील पहिला लेख जॉन मिन्सॉन ग्लॅट (II) यांनी १८८४ साली लिहिला. ''On Reading, Recreation an Amusements for the Insane'' या नावाने 'अमेरिकन इन्स्टिट्यूशन फॉर द इनसेन' या संस्थेच्या एका सभेत त्यांनी सादर केला. यात त्याने ग्रंथवाचनाचे प्रमुख पाच फायदे (अर्थात रुग्णावरील उपचाराच्या दृष्टीने) सांगितले होते.

(१) आपल्या आजारावरून मन दुसरीकडे वळवणे.

(२) वेळ जाऊन रुग्णास आराम वाटणे.

(३) रुग्णास माहिती देणे.

(४) इस्पितळ आपली खरी व पूर्ण काळजी घेत आहे याचा विश्वास रुग्णाच्या मनात निर्माण करणे.

(५) वाचकाला उपचार करण्यास साहाय्यभूत बनविता येते.

ग्रंथोपचाराच्या या ऐतिहासिक वाटचालीत वैद्यक व्यावसायिकांचे वर्चस्वच सुरुवातीस अधिक होते. ग्रंथालय व्यावसायिकांचे हे काम आहे व त्यासाठी तज्ज्ञ ग्रंथपालांचीच आवश्यकता

आहे हा विचार रुजायला विसावे शतक यावे लागले. मॅसॅच्युसेट जनरल हॉस्पिटलने जेव्हा १९०४ साली मॅक्लिन हॉस्पिटलच्या प्रशासनाची जबाबदारी उचलली तेव्हा त्या रुग्णालयाच्या ग्रंथालयासाठी प्रशिक्षित ग्रंथपाल नेमला व ग्रंथोपचारासाठी त्याचे साहाय्य घेण्यास सुरुवात केली. यानंतरच्या काळात 'ग्रंथोपचार' या विषयाचा विकास ग्रंथालयशास्त्रातील एक स्वतंत्र विषय म्हणून झाला. अनेक लेख, संशोधनपर निबंध लिहिण्यास ग्रंथपालाचा मोठा वाटा आहे. प्रायोगिकता ही या विषयाची मूलभूत गरज आहे व त्यामुळेच हे प्रयोग केवळ रुग्णालय, असायलम यांच्यापुरते मर्यादित न राहता शालेयस्तरावर जगभर ग्रंथोपचाराचा विषय ठरतील असे प्रयोग राबविले जातात.

ग्रंथांचा एकूणच व्यक्तिमत्त्वावर व जीवनावर प्रभाव पडून संपूर्ण जीवनाला कलाटणी मिळाली अशीही अनेक उदाहरणे इतिहासात पाहावयास मिळतात.

## ग्रंथोपचारपद्धती विकास

व्यक्तित्वाच्या जडणघडणीत राहिलेल्या त्रुटी, स्वभावात अपेक्षित असणाऱ्या सद्गुणांचा विकास याबरोबरच मानसिक विकार व शारीरिक व्याधींच्या काळात इतर औषधोपचारांना ग्रंथोपचाराची जोड मिळाली तर अपेक्षित निकाल, परिणाम लवकर साधता येतात. यासाठी कोणता ग्रंथ कोणत्या स्थितीत वाचला जावा, त्या वाचनाचे परिणाम काय असू शकतात याची म्हणजेच ग्रंथातील सुप्त शक्तीची ग्रंथोपचार करणारास संपूर्ण कल्पना असावी लागते. यासाठी सर्व ग्रंथांचा त्यातील विषय व आशयाचा व्यासंग असावा लागतो. यांच्या आधारेच ग्रंथांच्या साहाय्याने उपचार शक्य असतो.

व्याधिमुक्त अवस्थेप्रमाणेच वयाच्या कोणत्या टप्प्यावर काय वाचावे, ते का वाचावे याबाबत पालक शिक्षकांना मार्गदर्शन करू शकतील असे ग्रंथोपचार तज्ज्ञ ही तर आजच्या गतिमान जीवनातील गरज आहे. पाश्चात्त्य जगात ही गरज ओळखली आहे त्यामुळे गेल्या शतकात अनेक रुग्णालयांच्या पॅनलमध्ये कन्सल्टिंग लायब्ररीयन्सचाही समावेश झालेला दिसतो आहे. एएलए सारख्या संघटनांनी या विशेष ज्ञानशाखेतील संशोधनास प्रोत्साहन दिले आहे. त्याचबरोबर रुग्णालयीन ग्रंथालय संघाने तर ''Libraries and Librarians can, and must, play substantial roles in both the preventive and rehabilitative aspects of this problem.'' या शब्दांत या शास्त्राचे महत्त्व मान्य केले आहे.

ग्रंथोपचार करण्याच्या दृष्टीने आज काय चालू आहे व भविष्यातील या संदर्भात उपलब्ध असणाऱ्या संधी कोणत्या हा या विषयाचा पुढील भाग आहे. शालेय स्तरावर ग्रंथोपचाराचा होणारा वापर हा स्वतंत्र विषय आहे. त्याबद्दल नंतरच्या अंकात.

❑❑❑



# तेरा (१३) अंकांचा आयएसबीएन

डॉ. राजेंद्र कुंभार

*पूर्वी आयएसबीएन १० अंकांचा मिळून तयार होत असे. १ जानेवारी २००७ पासून आयएसबीएन क्रमांक १३ अंकांचा होणार आहे. प्रस्तुत लेखामध्ये आयएसबीएनच्या बदलाची कारणे, बदलाचे स्वरूप व आयएसबीएनमधील बदलाचे ग्रंथालयाच्या दृष्टिकोनातून होणारे परिणाम यांची चर्चा केलेली आहे.*

## प्रस्तावना

आयएसबीएन (International Standard Book Number - ISBN) हा प्रकाशित ग्रंथांसाठी दिला जाणारा आंतरराष्ट्रीय प्रमाणित क्रमांक आहे. ISO 2108 या आंतरराष्ट्रीय प्रमाणकानुसार ग्रंथांना आयएसबीएन दिला जातो. आयएसबीएनसाठीचे ISO 2108 हे प्रमाणक प्रथम १९७२ मध्ये प्रकाशित करण्यात आले होते[१]. या प्रमाणकाची चौथी आवृत्ती लवकरच प्रकाशित होणार आहे. १९७२ च्या 2108 या प्रमाणकानुसार अस्तित्वात आलेला आयएसबीएन १० अंकांचा होता. १० अंकांचा आयएसबीएन आता आयएसबीएन -१० या नावाने ओळखला जातो. आयएसबीएन - १० मधील अंकांची विभागणी चार भागांत करण्यात आली होती; ते चार भाग म्हणजे - (१) वर्गदर्शक (देश) अंक, (२) प्रकाशकदर्शक अंक, (३) शीर्षकदर्शक अंक, (४) तपासणी अंक. सध्या जगातील १५० देशांमध्ये ग्रंथांना आयएसबीएन क्रमांक दिला जातो. आयएसबीएन-१० ची क्षमता एक अब्ज क्रमांकांची आहे. सध्या हे सर्व क्रमांक वापरले गेलेले नाहीत. परंतु ग्रंथ प्रकाशनाची वाढती संख्या विचारात घेता हे सर्व क्रमांक नजीकच्या भविष्यात वापरले जाण्याची शक्यता आहे. ही शक्यता विचारात घेता आयएसबीएन क्रमांकांची क्षमता वाढविण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. आयएसबीएनच्या क्रमांकांची क्षमता वाढविण्यासाठी तो १३ अंकांचा करण्याचे ठरले आहे. १३ अंकांचा आयएसबीएन, आयएसबीएन-१३ या नावाने ओळखला जातो. प्रस्तुत लेखामध्ये आयएसबीएन-१३ चे स्वरूप स्पष्ट केले आहे. तसेच आयएसबीएनच्या प्रस्तावित बदलाचे ग्रंथालयांवर काय परिणाम होतील याचीही चर्चा केली आहे.

## आयएसबीएनच्या विस्ताराची कारणे

प्रस्तावनेत विशद केल्याप्रमाणे आयएसबीएन-१० मधील सर्व क्रमांक नजीकच्या काळात वापरले जाण्याची शक्यता आहे. नवीन ग्रंथांना पुरेसे आयएसबीएन क्रमांक उपलब्ध व्हावेत यासाठी आयएसबीएन-१०चा विस्तार करून तो १३ अंकांचा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

अनेक ग्रंथांवर आयएसबीएन क्रमांकासोबत बारकोडही छापलेला असतो. बारकोड १३ अंकांचा तयार होत असतो. युरोपियन अर्टिकल नंबर (European Atricle Number - EAN) पद्धतीनुसार बारकोड दिला जातो. EAN पद्धतीनुसार दिलेला बारकोड हा प्रमाणित संकेतांक म्हणून वापरला जातो. बारकोड व आयएसबीएन या दोन्हींचा उद्देश एकच आहे. तो म्हणजे प्रमाणित संकेतांकांच्या / अंकांच्या साहाय्याने ग्रंथांबद्दलच्या माहितीची देवघेव करणे / ग्रंथांची ओळख पटविणे. परंतु बारकोड १३ अंकांचा तर आयएसबीएन १० अंकांचा आहे. या दोन्ही पद्धतींतील अंकांच्या संख्येतील फरक नष्ट करून त्यांच्यामध्ये सुसंगतता (Compatibility) यावी यासाठी आयएसबीएन - १० अंकांऐवजी १३ अंकांचा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे यापुढे बारकोडप्रमाणेच आयएसबीएनसुद्धा १३ अंकांचा असेल.

युनिव्हर्सल प्रॉडक्ट कोड (Universal Product Code - UPC) आणि आयएसबीएनमध्ये सुसंगतता निर्माण करण्यासाठीही आयएसबीएनचा विस्तार केला जात आहे. अमेरिकेतील प्रत्येक वस्तूला युनिव्हर्सल कोड कॉऊन्सिल (Universal Code Council - UCC) नुसार UPC म्हणजेच जागतिक वस्तू क्रमांक दिला जात असे. UPC पूर्वी १२ अंकांचा असे. परंतु अमेरिकेने आता १२ अंकांच्या UPC ऐवजी १३ अंकांचा EAN क्रमांक वापरण्याचे ठरविले आहे. त्यानुसार UPC चे नामांतर EAN-UPC-13 असे करण्यात आले आहे. EAN-UPC-13 अंकांचा आहे म्हणून आयएसबीएनही १३ अंकांचा करणे सोइस्कर ठरणार आहे.

EAN-UCC-13 व आयएसबीएन यांच्यामध्ये सुसंगतता आणण्यासाठी EAN, UCC व आयएसबीएन निर्माण करणाऱ्या संस्थांनी आयएसबीएन १३ अंकांचा असावा असे ठरविले आहे. ग्रंथाशिवाय इतर सर्व बारकोडस् देशदर्शक अंकांनी सुरू होतात. EAN मधील देशदर्शक अंकांऐवजी आयएसबीएनमध्ये आता सुरवातीला ९७८ हा ग्रंथभूमिदर्शक (Bookland Identier) क्रमांक जोडला जाईल. ९७८ या ग्रंथभूमिदर्शक अंकापुढे आयएसबीएनमधील सुरुवातीचे नऊ अंक असतील. अशा प्रकारे आयएसबीएनमध्ये (३+९) १२ अंक होतील. आयएसबीएनमधील शेवटचा अंक (म्हणजेच १३ वा अंक) तपासणी अंक (Check digit) तो आयएसबीएनने सांगितलेल्या पद्धतीनुसार तयार केला जातो.[२]

## आयएसबीएन-१३ चे सुधारणाकर्ते

ISO/TC46/SC9/WG4 या कार्यगटाद्वारे आयएसबीएनमध्ये बदल सुचविण्यात आले आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवर वस्तू आणि सेवांची अदलाबदल करणे सुलभ व्हावे यासाठी



प्रमाणके विकसित करण्यासाठी इ. स. १९४७ मध्ये ISO (International Organization for Standardization) ची स्थापना करण्यात आली आहे.

TC46 ही ISO ची तांत्रिक समिती (Technical Committee) आहे. माहिती आणि प्रलेखनासाठी प्रमाणके विकसित करणे हे TC 46 या समितीचे कार्य आहे. विशेषत: प्रलेखांच्या वर्णनासाठी आणि ओळखण्यासाठी (Description and Identification) प्रमाणके विकसित करण्यासाठी TC 46 या समितीने SC9 ही उपसमिती (Sub Committee) स्थापन केली आहे. SC9 या उपसमितीचे सचिवालय कॅनडाच्या राष्ट्रीय ग्रंथालयामध्ये आहे. आयएसबीएनसाठीच्या ISO 2108 या प्रमाणकामध्ये सुधारणा करण्यासाठी SC9 या उपसमितीने जानेवारी २००२ मध्ये एक कार्यगट (WG 4) म्हणजेच Working Group स्थापन केला[३]. ब्रिटनमधील मायकल हिले हे या कार्यगटाचे प्रमुख आहेत. WG 4 या कार्यगटामध्ये ग्रंथपाल, प्रकाशक, ग्रंथवितरक व इतर संबंधित घटकांचा समावेश आहे.

WG 4 या कार्यगटाने ISO 2108 या आयएसबीएनच्या प्रमाणकामध्ये आवश्यक ते बदल सुचविण्यात प्रस्ताव तयार केला. हा प्रस्ताव ISO च्या मान्यतेसाठीच्या सर्व पातळ्यांमधून मान्य होऊन आला आहे [४]. नवीन आयएसबीएनचा सर्वमान्य झालेला प्रस्ताव ISO 2108ची चौथी आवृत्ती म्हणून लवकरच प्रकाशित केला जाणार आहे. ISO 2108 च्या चौथ्या आवृत्तीनुसार **१३ अंकांचा आयएसबीएन ग्रंथावर एक जानेवारी २००७ पासून छापावयाचा आहे.**

## बदलाचे स्वरूप

सध्याच्या १० अंकांच्या आयएसबीएनच्या सुरुवातीला EAN मधील ग्रंथांसाठीचा ९७८ हा क्रमांक जोडून १३ अंकांचा आयएसबीएन तयार केला जाईल. उदाहरणार्थ, १० अंकांचा आयएसबीएन : 0-330-28987-x याच ग्रंथाचा १३ अंकांचा आयएसबीएन पुढीलप्रमाणे असेल. 978-0-330-28987-0 या उदाहरणात दर्शविल्याप्रमाणे आयएसबीएन-१३ चे पाच भाग होतात. ९७८ हा EAN-UCC मधील ग्रंथांसाठीचा जागतिक वस्तू क्रमांक आहे. हा क्रमांक सध्याच्या म्हणजेच आयएसबीएन-१० च्या सुरुवातीला जोडल्यामुळे आयएसबीएन-१३ अंकांचा होतोच शिवाय तसेच आयएसबीएन-१० मधील शेवटचा अंकही (तपासणी अंक) बदलतो.

आयएसबीएन-१३ ची अंमलबजावणी दोन टप्प्यांमध्ये होईल.

(१) इ. स. २००५ व २००६ या संक्रमणाच्या काळात आयएसबीएन-१० चे गरजेनुसार आयएसबीएन-१३ मध्ये रूपांतर केले जाईल. अशा रूपांतरासाठीचे सूत्र आयएसबीएन एजन्सीने दिले आहे [५]. या सूत्रानुसार आयएसबीएनच्या रूपांतरासाठी योग्य अशी संगणक आज्ञावली विकसित करावी लागेल. आयएसबीएनच्या रूपांतरासाठी काही तयार संगणक आज्ञावली आता इंटरनेटवर उपलब्धही झाल्या आहेत [६].
असे रूपांतर करावयाचे नसेल तर संक्रमणाच्या काळात ग्रंथांवर आयएसबीएन-१० व आयएसबीएन-१३ असे दोन्ही आयएसबीएन क्रमांक छापावेत.

(२) आयएसबीएन-१३ ग्रंथावर छापणे : एक जानेवारी २००७ पासून प्रकाशित होणाऱ्या ग्रंथांवर १३ अंकांचाच आयएसबीएन छापला जाईल. १३ अंकांचा आयएसबीएन ग्रंथावरील

बारकोडच्या वरच्या भागात आडव्या रेषेने (hyphen) जोडलेल्या स्वरूपात छापला जाईल.

## आयएसबीएन–१३ चे ग्रंथालयाच्या दृष्टिकोनातून होणारे परिणाम

प्रकाशक, वितरक, ग्रंथविक्रेते या सर्व व्यापारी संस्था ग्रंथवर्णनाचा महत्त्वाचा घटक म्हणून आयएसबीएनचा वापर करतात.

ग्रंथालये विशेषत: तालिकानोंदीमध्ये आयएसबीएन नोंदवितात. OPAC मधून ग्रंथाचा शोध घेण्यासाठी आयएसबीएनचा वापर करणे शक्य होते. याशिवाय ग्रंथखरेदीच्या आदेशनासाठी, नक्कल तालिकीकरणासाठी (Copy Cataloguing), ग्रंथदेवघेवीच्या नोंदी ठेवण्यासाठी, सार्वजनिक ग्रंथ देवघेव हक्कांच्या व्यवस्थापनासाठी (Management of Public Lending Rights), आंतरग्रंथालयीन देवघेवीसाठी व संघ तालिकेसाठी ग्रंथालये आयएसबीएनचा वापर करू शकतात.

विविध ग्रंथालये सध्या संगणकीकरणासाठी वेगवेगळ्या संगणकप्रणालींचा (Library Softwares) वापर करत आहेत. सध्याच्या बऱ्याचशा ग्रंथालय संगणक प्रणालींमध्ये १० अंकांचा आयएसबीएन नोंदविण्यासाठी जागा आहे. अशा ग्रंथालय संगणक प्रणालींमध्ये १३ अंकांचा आयएसबीएन नोंदविण्याची सुविधा करून घेणे गरजेचे आहे.

एक जानेवारी २००७ पासून प्रकाशित होणाऱ्या ग्रंथांवर १३ अंकांचाच आयएसबीएन छापला जाणार आहे. परंतु एक जानेवारी २००७ नंतरसुद्धा ग्रंथालये २००७ पूर्वी प्रकाशित झालेले ग्रंथ खरेदी करू शकतात. २००७ पूर्वी प्रकाशित झालेल्या ग्रंथांवर १० अंकांचा आयएसबीएन असणार आहे. म्हणजेच २००७ पासून ग्रंथालयांकडे १० तसेच १३ अंकांचा आयएसबीएन छापलेले ग्रंथ येणार आहेत. म्हणून ग्रंथालय संगणक प्रणालीमध्ये १० तसेच १३ अंकांचे आयएसबीएन नोंदविण्याची सुविधा असणे आवश्यक आहे.

नव्यानेच ग्रंथालय संगणक प्रणाली खरेदी करणाऱ्या ग्रंथालयांनी आयएसबीएन नोंदविण्यासाठीची वरील सुविधा देण्यास सांगावे.

## आयएसबीएन–१३ आणि तालिकीकरणाशी संबंधित आंतरराष्ट्रीय संस्था

तालिका नोंदी तयार करण्याचे व त्या वितरित करण्याचे कार्य सध्या दोन आंतरराष्ट्रीय संस्था करत आहेत. लायब्ररी ऑफ काँग्रेस ग्रंथांमध्ये तालिका नोंद छापण्यासाठीचा ग्रंथांतर्गत तालिकीकरण (Cataloguing in Publication) हा उपक्रम राबविते. एक ऑक्टोबर २००४ ते ३१ डिसेंबर २००६ दरम्यान प्रकाशित होणाऱ्या ग्रंथांतर्गत तालिका नोंदीमध्ये लायब्ररी ऑफ काँग्रेस १० व १३ अंकांचे असे दोन्ही आयएसबीएन छापणार आहे. २००७ पासून प्रकाशित होणाऱ्या ग्रंथांतर्गत तालिका नोंदीमध्ये मात्र केवळ १३ अंकांचाच आयएसबीएन छापला जाईल.



जागतिक पातळीवर तालिका नोंदी पुरविणारी OCLC ही आणखी एक महत्त्वाची संस्था आहे. या संस्थेनेही आयएसबीएन–१३ च्या अंमलबजावणीचे अंतरिम धोरण नुकतेच जाहीर केले आहे (७).

## समारोप

सूचीय नियंत्रणासाठी ग्रंथांबद्दलच्या सूचीय माहितीची जागतिक पातळीवर सुलभपणे देवघेव करता आली पाहिजे. यासाठी प्रमाणित सूचीय वर्णनाची आवश्यकता असते. आयएसबीएन १३ अंकांचा केल्यामुळे तो EAN व UCC च्या अंकांशी सुसंगत झाला आहे व त्यामुळे जागतिक पातळीवर ग्रंथांच्या सूचीय माहितीच्या देवघेवीमध्ये अधिक सुलभता व सुसूत्रता येणार आहे.

## *संदर्भ*


(१) International ISBN Agency. The international standard book number system : ISBN user's manual. International edition. Berlin : International ISBN Agency, 1972.

(२) International ISBN Agency. The international standard book number system : ISBN user's manual. 4th rev.ed. Berlin : International ISBN Agency, 2001. pp. 9.

(३) ISO Project 2108 : on the revision of the ISBN : Frequently asked questions about changes to the ISBN : http://www.lac-bac.gc.ca/sio/tc46/sc9/isbn.htm

(४) Chapman, Ann. ISBN-13 : new number on the block. http://www.ariadne.ac.uk/issue4/chapman/intro.html.

(५) International ISBN Agency. The international standard book number system : ISBN user's manual 4th rev. ed. Op. Cit. pg.10-11.

(६) Convert ISBN-13 from ISBN-10 : at - http://ww.createbarcodes,com.

(७) OCLC Interim Support for ISBN 13 : http://www.oclc.org/news/announcements/announcement96.htm


❑❑❑

# शं. ग. दाते विशेषांक : एक प्रतिक्रिया

डॉ. सु. रा. चुनेकर

उत्सुकतेने वाट पाहात असलेला 'ज्ञानगंगोत्री'चा 'मराठी ग्रंथ सूचिकार शंकर गणेश दाते' अंक परवा मला मिळाला.

दात्यांचा जन्मशताब्दीच्या निमित्ताने विशेषांक काढावासा वाटला हेच खास प्रशंसनीय आहे. अंक काढण्यामागे निश्चित दृष्टी आहे, योजना आहे, परिश्रम आहेत; हे अंक नुसता चाळला, तरी ध्यानात येते.

अर्थात यात ग्रंथालयीन दृष्टीचा प्रभाव आहे आणि मुक्त विद्यापीठाचा विद्यार्थी अभ्यासक अधिक दृष्टीपुढे आहे आणि ते स्वाभाविकही आहे. दात्यांच्या द्रष्ट्या कार्याचे स्वरूप ग्रंथालय क्षेत्रातल्या मंडळींनींच जाणले, त्यांना त्याचे मोल समजले. महाविद्यालयीन, विद्यापीठीय, किंवा साहित्यक्षेत्रातील लोकांपर्यंत अजूनही दाते पोचले नाहीत फारसे. दात्यांची जन्मशताब्दी अधिक मोठ्या प्रमाणावर व्हावयास पाहिजे.

तुमच्या संपादकीयात 'मराठी नियतकालिकांच्या सूची'च्या मर्यादा तुम्ही दाखवल्या आहेत, तशा त्या आहेतच. मला वाटते, मीही माझ्या परीक्षणात ते लिहिले असावे. पण सापेक्षत: मर्यादित उद्दिष्ट ठेवून सुरू केलेल्या या कामाच्याच पूर्ततेमध्ये किती अडथळे-अडचणी येत आहेत – की स्वीकारलेल्या मर्यादेत तरी हे काम पूर्ण होईल की नाही, याची शंका वाटते. फारच मर्यादित आर्थिक बळ, मनुष्य (अभ्यासक) बळ यांतून काम करणाऱ्याला विषण्णता यावी ! या कामाचे मोल कुणाला आहे का – असंस्कृत शासनाला तर नाहीच, पण इतरजनांनाही नाही. 'मनिसूची' काम तर गेली काही वर्षे प्राय: एकटे बेलसरे करीत आहेत. त्यांचेही वय ऐंशीच्या आसपास आहे. अर्थात तरीही अशी कामे, दूरदृष्टीने करीत राहायलाच हवीत.

तुमच्या यादीत श्री. व. भि. बेलसरे* यांचे नाव नसेल, तर त्यांनाही अंक पाठवावा असे सुचवावेसे वाटते.

खरे तर दात्यांवर निदान शंभर-सव्वाशे पृष्ठांचे पुस्तकच व्हावयाला हवे. डॉ. सौ. सरोजिनी वैद्यांना त्या रा.म. विकास संस्थेच्या संचालिका असताना मी सुचवले होते.

दात्यांच्या व्यक्ती आणि कार्याचा परिचय करून देणारा तुमचा लेख, बराच शोध घेऊन लिहिलेला आहे. त्यात तुम्ही तुमच्या संकल्पित कामांची माहिती दिली आहे. ती कामे तुमच्याकडूनच पुरी व्हायला हवीत.

'मराठी ग्रंथसूची'चा सतीश डोंगरे यांचा, मूल्यमापन करणारा विस्तृत लेख असे मूल्यमापन प्रथमच होते आहे.



दात्यांच्या 'ग्रंथसूचि-शास्त्र' या विस्तृत लेखाचे पुनर्मुद्रण करण्यात तुम्ही औचित्य दाखवले आहे.

दात्यांचे चिरंजीव* मुंबईत असतात. तुम्हाला माहीत आहेत का ?

---

* प्रस्तुत व्यक्तींना सदर अंक पाठवण्यात आले आहेत.

❑❑❑

मोठ्या माणसांकडून काय वाचावे किंवा कसे वाचावे याचे काहीच मार्गदर्शन न झाल्यामुळे माझ्या वाचनात पद्धत अशी काही येऊच शकली नाही. त्यामुळे तोटा झाला की फायदा झाला हा प्रश्न वेगळा. मला वाटतं, फायदाच झाला. 'गुलबकावली' हाती पडो, की 'अरबी भाषेतल्या सुरस आणि चमत्कारिक गोष्टी' हाती येवोत, की 'रागिणी' मिळो, काहीही वाचण्यात मला आनंदच होत असे. पहिले महायुद्ध चालू असता मी शाळकरी विद्यार्थीच होतो, तरी पण युद्धासंबंधी 'केसरी'त किंवा 'चित्रमय जगत्' मध्ये येणारे लेख वाचताना मला मोठी मजा वाटे. त्यातले मला विशेष काही समजे असे मला मुळीच वाटत नाही, पण वाचायला मजा वाटे खरी. भारतीय संस्कृतीच्या श्रेष्ठतेसंबंधी मला वाटते 'चित्रमय जगत्'मध्ये त्या वेळी एक लेखमाला येत होती. निरनिराळ्या शास्त्रीय शोधांसंबंधीही खूप मोठेमोठे लेख त्या काळी मासिकांतून येत असत. जर्मन विद्वानांनी केलेले वेदांचे संशोधन वाचताना मला जितकी मौज वाटे, तितकीच वनस्पतींना जीव असतो, त्यांना हृदय असते, त्यांना दुःख होते, इत्यादी जगदीशचंद्र बोसांच्या वनस्पतिशास्त्रातल्या शोधांची वर्णने वाचताना मला वाटे. अमुकच वाचावे तमुकच वाचू नये, अशा हुकमतीत माझे वाचन झाले असते तर मला वाटते, माझे मन संकुचित राहिले असते, माझी वाङ्मयीन पचनशक्ती दुबळी झाली असती. मिळेल ते वाचीत गेल्यामुळे माझे मन विशाल झाले आणि माझी वाङ्मयीन दृष्टी व्यापक झाली; असा माझा समज आहे. कदाचित हा समज चुकीचा असेल. एक ना धड, भाराभर चिंध्या, असाही प्रकार झाला असेल.

**– अनन्तिका, पृ. ११५-११५**
**– अनंत काणेकर**

# शं. ग. दाते विशेषांक : परीक्षणे

चंद्रकांत भोंजाळ / अविनाश कोल्हे

*ज्ञानगंगोत्रीच्या शं. ग. दाते जन्मशताब्दी विशेषांकाचे (वर्ष ५ अंक १) उत्तम स्वागत झाले. या अंकात विशेषांकावर प्रसिद्ध झालेली दोन परीक्षणे पुनर्मुद्रित करीत आहोत. अंकाचे मूल्यमापन करणे, परीक्षण लिहिणे अशा स्वरूपाचे कार्य एम. लिब.च्या विद्यार्थ्यांनी करणे अपेक्षित असते. या दोन लेखांच्या वाचनाने तज्ज्ञ मंडळी कशा प्रकारे परीक्षण करीत असतात याचा वस्तुपाठच विद्यार्थ्यांना यातून मिळू शकत असल्याने हे लेख खास देण्यात आले आहेत.*

## (१)

## नाही चिरा नाही पणती

**(महानगर, दि. १९ नोव्हें. २००४)**

दररोज मराठी माध्यमांच्या शाळा बंद पडत असल्याच्या बातम्या आपण हताशपणे वाचतो आहोत. मराठी भाषेच्या भवितव्याविषयी गळे काढणारे साहित्यिक, विचारवंतही आपल्या नातवांना इंग्रजी माध्यमात घालताना दिसत आहेत. त्यामुळे काही काळानंतर 'मराठी' ही केवळ बोलीभाषा राहील की काय, अशी भीती वाटू लागली आहे. अशा या वातावरणात मराठी ग्रंथसूचिकार शंकर गणेश दाते यांची जन्मशताब्दी सुरू झाली याची दखल फारशी कुणी घेतली नाही तर नवल वाटण्यासारखं त्यात काही नाही. दाते यांनी, सूचिकार्यावरील जाज्वल्य निष्ठेमुळेच कायमची स्थिर नोकरी कधी केली नाही. अनेक आर्थिक संकटांना तोंड देत त्यांनी 'मराठी ग्रंथसूची' तयार केली. त्यांच्या या कार्यामुळे मराठीतील अनेक संशोधकांना फार मोलाची मदत झालेली आहे. अर्थात मराठी भाषेसंदर्भातील प्रबंध हे पुन्हा स्वत: संशोधकदेखील वाचत नाहीत हे वास्तव आहे. मग या संशोधकांना 'दाते' यांच्या जन्मशताब्दी वर्षाची आठवण व्हावी, ही अपेक्षाही चूक ठरेल. आपल्या विद्यापीठाने मात्र या जन्मशताब्दी वर्षाचं औचित्य साधून विशेषांक प्रकाशित केला आहे. त्याबद्दल विद्यापीठाचे कौतुकच करायला हवे.



त्या अंकातील लेखांवरून नुसती नजर जरी फिरवली तरी शंकर गणेश दाते हा माणूस किती थोर होता आणि त्याने केलेले कार्य मराठी वाङ्मय, सूचिसाहित्य आणि ग्रंथालयशास्त्र संपन्न करण्याकरता किती मोलाचं ठरलेलं आहे हे कळायला मदत होईल.

त्यांनी मरणापूर्वी दीडशे वर्षांतील मराठी मासिके आणि मासिकातील अभ्यासनीय लेख यांची सूची करण्याचं कार्य हाती घेतलं होतं. पण ते कार्य अपुरं राहिलं. परदेशांत असे एखादे महत्त्वाचे कार्य अपुरे राहत नाही. ते पुढे चालविणारा माणूस तिथे तयार होतो. प्रा. अ. का. प्रियोळकर यांनी दाते यांच्या निधनानिमित्त लिहिलेल्या लेखात अशी काही उदाहरणं दिली आहेत. ते लिहितात की, 'ब्रिटिश म्युझियममधील दोलामुद्रितांची यादी प्रॉक्टर यांनी हाती घेतली; पण त्यांच्या आकस्मिक निधनामुळे ते काम बंद पडले नाही. पोलर्ड यांनी ते काम पुढे चालू ठेवून तडीस नेलं.'

महाराष्ट्रात दाते यांचे ग्रंथसूचीचे कार्य पुढे चालू ठेवण्यासाठी अनेक वर्षं कुणीही पुढे आले नाही. पण नंतर मात्र शरद केशव साठे या गृहस्थाने हे कार्य नोकरी सोडून पुढे चालू ठेवले आहे पण अशा कार्यासाठी एखाद्या माणसाने पुढे यावे ही घटना फारशी चांगली आहे, असं म्हणता येणार नाही.

दाते यांचं 'मराठी नियतकालिक सूची'चं सुरू केलेलं कार्य करायला कोणतंही विद्यापीठ पुढे आलं नाही, अशी खंत इथे व्यक्त करण्यात आली आहे. विद्यापीठातील संशोधकांना तिथलं राजकारण करण्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही कार्यात रस राहिलेला नाही. ते असं कार्य कशाला अंगावर घेतील? ते कार्य मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाने पुढाकार घेऊन तडीस नेलं. संग्रहालयाने प्रकाशित केलेले हे सूचिखंड म्हणजे मराठी वाङ्मयातील विलोभनीय असे कार्य आहे, असं या अंकात म्हटलेलं आहे. आपल्याला 'मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय' इतर गोष्टीसाठीच माहिती असतं. माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी त्या संस्थेला मदत जाहीर करून वाटाण्याच्या अक्षता लावल्या म्हणून ती संस्था आपल्याला माहिती असते. तिथल्या कर्मचाऱ्यांना पगारासाठी आंदोलन करावं लागतं आणि तेही शरद पवारांसारखा अध्यक्ष त्या संस्थेला असताना, याबद्दल आपण आश्चर्य करत असतो. मुंबईतील या संस्थेच्या शाखा वाचकांअभावी बंद कराव्या लागल्याच्या बातम्या आपण वाचत असतो, पण कधी काळी या संस्थेने 'दाते' यांचे कार्य तडीस नेल्याची आपल्याला माहितीच नसते, ती माहिती या अंकामुळे प्राप्त झालेली आहे.

दाते यांचे अनेक संकल्प यातून वाचकांना कळतात. ते पुरे करण्यासाठी अजूनही संस्था किंवा व्यक्ती पुढे येऊ शकतात. दाते यांना 'टीकापत्रक' नावाचे मासिक सुरू करायचे होते. 'भूगोलस्थल', 'अभिनव शब्दकोश', भारताविषयक संदर्भ – साहित्याची समग्रसूची' असे एकापेक्षा एक अफाट ग्रंथ निर्माण करण्याची त्यांची योजना होती.

भारतासंबंधीच्या निरनिराळ्या विषयांवरील अनेक भाषांतील ग्रंथांची एक संदर्भसूची त्यांना तयार करायची होती. हे सगळे संकल्प आजच्या काळातही पूर्ण केले जाऊ शकतात.

'ज्ञानगंगोत्री'च्या या दाते विशेषांकात इतरही अनेक लेख विचार करायला लावणारे आहेत. 'मराठी ग्रंथसूची : मूल्यामन' हे सतीश डोंगरे यांनी ग्रंथसूचीचे विस्ताराने केलेले कदाचित पहिलेच मूल्यमापन आहे. त्यावरून सूचिकर्त्याच्या कार्याची जाणीव व्हायला मदतच होते.

‘अजून ताजा वास जुन्याला’ या सदरात जुने काही लेख छापले जातात. त्यामध्ये या अंकासाठी स्वत: दाते यांचा ‘ग्रंथ-सूचिशास्त्र’ हा लेख पुनर्मुद्रित करण्यात आला आहे. त्यातून सूचिशास्त्राचा दाते यांनी दिलेला ओनामा आजही तितकाच आवश्यक आहे. ताजा आहे. सर्वत्र विद्यार्थ्यांना, ग्रंथपालांना आणि भावी सूचिकारांना तो मार्गदर्शक आहे.

‘ग्रंथपरिचय’ या सदरात दर अंकामध्ये ग्रंथालय शास्त्राविषयीच्या ग्रंथांची परीक्षणे छापली जात आहेत. या अंकात प्रा. मोहन पाठक यांनी ‘मराठी ग्रंथसूची भाग ३’ या शरद साठे यांच्या ग्रंथांचा परिचय करून दिला आहे.

‘अपुऱ्या शोधाला अजूनही साहाय्य हवं आहे’ या टिपणात संपादक प्रदीप कर्णिक यांनी ‘मराठी नियतकालिक सूची’ या दाते यांच्या अपुऱ्या राहिलेल्या प्रकरणासाठी आपण अजूनही कसं साहाय्य करू शकतो हे कळकळीने सांगितले आहे. या टिपणात ते लिहतात, ‘दाते यांच्या हातून हे कार्य तडीस जावं, अशी नियतीची इच्छा नव्हती. मात्र मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाने ‘दाते सूचिमंडळ’ स्थापन करून हे अपुरे कार्य पुढे चालू ठेवले. दाते ज्या नियतकालिकांचा शोध घेणार होते त्या नियतकालिकांची, विशेषत: थोडकी माहिती किंवा बरीच अपुरी माहिती अथवा ज्या माहितीचा संपूर्ण अभाव होता, अशा मराठी नियतकालिकांची यादी करून मंडळाने ती यादी महाराष्ट्रातील जाणत्या वाचकांसमोर पुस्तिकेच्या रूपाने ठेवली आणि माहिती पाठवण्याचे आवाहन केले. माहिती विशिष्ट पद्धतीने यावी म्हणून ‘नमुना पत्रकं’ त्याला जोडली.

तीच यादी या अंकात पुन्हा छापली आहे आणि त्यातील नियतकालिकांचे अंक जर कुणाकडे असतील तर त्यांनी माहिती पाठवावी असं आवाहन करण्यात आलं आहे.

आनंदाची गोष्ट म्हणजे त्यातील ‘रंगभूमी’ या नियतकालिकाचे ८ ते १० अंक माझ्याकडे होते. ते मी लगेच रूपारेल कॉलेजला दिले आहेत. असंच काम इतरांनी केलं तर हे काम पुढे जाऊ शकेल.

तर असा हा मोठा माणूस. पण त्याच्या कार्याबद्दल आपण अनभिज्ञ असतो. त्यांच्या सूचीचा उपयोग करून अनेकांनी पीएच.डी. मिळविली. पण त्यांनाही दाते यांच्या जन्मशताब्दीची आठवण होऊ नये, याचं दु:ख वाटतं. मुक्त विद्यापीठाने छोटासा दिवा लावला म्हणून नाहीतर दाते यांची अवस्था ‘नाही चिरा नाही पणती’..... अशीच आहे.

❑❑❑

## (२)

## सूचिकार दाते यांच्या कार्याचा गौरव

**(नवशक्ती, रविवार, दि. २ जानेवारी २००५)**

मराठी साहित्यात एकांड्या शिलेदारांची मोठी परंपरा आहे. ‘ज्ञानकोश’कार केतकर, ‘काळ’ कर्ते परांजपे, या मालिकेत बसणारे एक महत्त्वाचे नाव म्हणजे सूचिकार शंकर गणेश दाते ! १९०५ साली जन्मास आलेल्या दाते यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू आहे. त्या निमित्ताने ‘ज्ञानगंगोत्री’ने विशेषांक प्रसिद्ध केला आहे.



कर्तृत्ववान व्यक्तींच्या कार्याचे स्मरण ठेवण्यासाठी, त्यांच्या कार्याचे मूल्यमापन करण्यासाठी, योगदानाची दखल घेण्यासाठी विशेषांक प्रसिद्ध करण्यासाठी मराठी भाषाविश्वात जुनी प्रथा आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे मुखपत्र ‘ज्ञानगंगोत्री’ या त्रैमासिकाने अलीकडेच मराठी ग्रंथसूचिकार ‘शंकर गणेश दाते जन्मशताब्दी विशेषांक’ प्रसिद्ध केला आहे. जून-जुलै-ऑगस्ट २००४ चा ‘ज्ञानगंगोत्री’चा हा विशेषांक म्हणजे सूचिकार शंकर गणेश दाते यांच्या कार्याला केलेला मानाचा मुजरा होय.

दाते यांचा जन्म २७ ऑगस्ट १९०५ रोजी झाला. १० डिसेंबर १९६४ रोजी त्यांना मृत्यूने गाठले. उण्यापुऱ्या साठ वर्षांच्या आयुष्यात दाते यांनी सूचीच्या बाबतीत केलेले कार्य बघून छाती दडपल्यासारखी होते. ‘ज्ञानगंगोत्री’ने हा विशेषांक काढून त्यांच्या कार्याची यथाशक्ती दखल घेतली आहे. या खास अंकात दाते यांचा जीवनपट थोडक्यात दिला आहे. त्यामुळे दाते यांचे जीवन आणि कार्य समजून घ्यायला मदत होते. दाते यांनी १९३४ साली पुणे शहरात मराठी ग्रंथसूचीच्या कार्याला आरंभ केला. दाते यांच्या कार्याचा झपाटाच असा विलक्षण की एका वर्षातच त्यांनी पुणे मराठी ग्रंथसंग्रहालयातील सुमारे १०,००० ग्रंथांच्या वर्णनपत्रिका तयार केल्या असे महत्त्वाचे तपशील जीवनपटात आहेत (पृ. ४). या विशेषांकात प्रदीप कर्णिक यांचा ‘शंकर गणेश दाते-व्यक्ती आणि कार्य’ हा लेख असून दाते यांच्या जीवनाचा आणि कार्याचा थोडक्यात परिचय करून दिला आहे. कर्णिक नोंदवतात त्याप्रमाणे दाते यांना सूचिकार्याचा एवढा ध्यास लागला होता की त्यापायी त्यांनी आर्थिक बाबी नेहमी गौण मानल्या आणि शाश्वत नोकरीच्या अनेक संधी धुडकावल्या (पृ. ६). दाते यांच्या प्रतिभेला इतरही अंगं होती. लोकसाहित्याचे संग्राहक, कवी, इत्यादी आयाम असूनही दाते यांनी सूचीचेच कार्य हेच जीवनकार्य मानले. एवढेच नव्हे तर याच क्षेत्रात नवनवीन आव्हाने स्वीकारत राहिले. ग्रंथसूचीचे कार्य पूर्ण झाल्यावर दाते उसंत न घेता नियतकालिकाच्या सूचीकडे वळले. कर्णिकांनी दाखवून दिल्याप्रमाणे दाते यांनी हे काम स्वत:च्या हिमतीने पूर्णत्वास नेले. मराठी नियतकालिक सूचीचे काम करायला महाराष्ट्रातील एकही विद्यापीठ पुढे आले नाही. अपवाद फक्त एका संस्थेचा - मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय !

गौरवपर विशेषांकामध्ये एक उणीव बऱ्याच वेळा आढळते. यात त्या व्यक्तीच्या कार्याचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन सहसा आढळत नाही. फक्त स्तुतिपर, गौरवपर लेखच आढळतात. ‘ज्ञानगंगोत्री’चा हा विशेषांक या दोषापासून मुक्त आहे. यात सतीश डोंगरे यांचा ‘मराठी ग्रंथसूची - मूल्यमापन’ हा लेख आहे. डोंगरे यांनी एम. लिब. च्या पदवीसाठी ‘मराठी ग्रंथसूची’ वर संशोधन केलेले आहे. डोंगरे दाखवून देतात त्याप्रमाणे दाते यांच्या अगोदर मराठीत दाते-देशमुख यांची एकमेव वाङ्मयसूची प्रसिद्ध होती (पृ. १५). मात्र या सूचीतील भरपूर त्रुटींमुळेच शंकर दाते यांना स्वत:च सूची करण्याची प्रेरणा मिळाली. दाते यांनी प्रयत्नपूर्वक १९४४ ते ४६ या कालखंडात ग्रंथसूचीचा पहिला खंड प्रकाशित केला आणि पुढे ग्रंथालयशास्त्रावर लक्ष केंद्रित केले. दाते यांनी द्विबिंदू वर्गीकरण पद्धती आणि दशांश वर्गीकरण पद्धतीचे योग्य भाषांतर केल्याबद्दल डोंगरे यांनी दाते यांना धन्यवाद दिले आहेत. दाते यांच्या प्रयत्नांमुळेच सूचिकार्य जास्तीत जास्त शास्त्रशुद्ध होत गेले. डोंगरे यांच्या दीर्घ लेखात त्यांनी दाते यांच्या सूचीतील त्रुटी दाखवल्या आहेत. डोंगरे यांच्या मते, प्रत्येक पुस्तक प्रत्यक्ष बघून नोंद करण्याचा दाते यांचा

आग्रह योग्य होता. एवढे प्रचंड काम केल्यावर दाते यांनी ग्रंथ उपलब्ध असण्याचे ठिकाणही सूचीत नमूद करायला हवे होते. डोंगरे यांचा आक्षेप रास्त आहे.

या विशेषांकात दाते यांनी १९४४ साली लिहिलेली एक स्वतंत्र पुस्तिका पुनमुर्द्रित केलेली आहे. या पुस्तिकेत दाते यांनी सूचिशास्त्राचे तात्त्विक विवेचन केलेले आहे. मा. दाते म्हणतात, 'ग्रंथसूची मुख्यत्वेकरून संशोधकांसाठी तयार करावयाची असल्यामुळे ती जितकी निर्दोष करता येईल तितकी केली पाहिजे' (पृ. ४३). दाते यांचा आग्रह बरोबर आहे, कारण सामाजिक शास्त्र, साहित्य, इत्यादी ज्ञानशाखांतील पुढचे संशोधन निर्दोष सूचीवर बरेचसे अवलंबून असते. सूची तयार करताना महत्त्वाचा मुद्दा म्हणजे ग्रंथवर्णन ! पण ग्रंथवर्णन कसे लिहावे याबद्दल विद्वानांमध्ये मतभेद आहेत. आपल्या पुस्तिकेत दाते यांनी ग्रंथवर्णन देण्याचा हेतू विशद केला आहे. यासाठी त्यांनी गडकऱ्यांच्या 'एकच प्याला'चे उदाहरण घेतले आहे. एका प्रकारे ही माहिती 'गडकरी – एकच प्याला' अशीसुद्धा देता येईल. दाते म्हणतात त्याप्रमाणे, ''यामुळे एखाद्या वाचकाचे समाधान होऊ शकले तरी अभ्यासकाचे काय ? अभ्यासकांसमोर अनेक प्रश्न उभे राहतील. गडकरी म्हणजे नेमके कोण ? एकच प्याला काय आहे ? नाटक, कादंबरी की काव्य ? हा ग्रंथ कोणत्या वर्षी छापला ? या शंका दूर करण्यासाठी काही विशिष्ट गोष्टींची माहिती देणारे वर्णन द्यावेच लागेल'' (पृ. ४७). या कामाचे स्वरूप बघता दाते यांच्या कार्याबद्दल मनात आदर निर्माण होतो. इ.स. १८०० ते १९५० पर्यंतच्या मराठी ग्रंथांची सूची केल्यावर दाते यांनी मराठी नियतकालिक सूची (१८००-१९५०) करायला सुरुवात केली. मात्र लवकरच त्यांना मृत्यूने गाठले. त्यांचे कार्य मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाने 'दाते सूचिमंडळ' स्थापन करून पुढे चालू ठेवले. (पृ. ७७) 'ज्ञानगंगोत्री' च्या संपादकांनी सूचिमंडळाने तयार केलेली यादीच छापली आहे. परिणामी आजच्या अभ्यासकांची सोय झाली आहे. या आणि अशा उपयुक्त माहितीने भरलेला हा विशेषांक संग्राह्य आहे. मराठी साहित्य, वृत्तपत्रांच्या अभ्यासकांनी आपल्या संग्रही हा विशेषांक ठेवायला हवा. ज्ञानकोशकार केतकर, सूचिकार दाते अशी एकांड्या शिलेदाराची महाराष्ट्रात भरजरी परंपरा आहे. 'ज्ञानगंगोत्री'ने दाते जन्मशताब्दी वर्षात विशेषांक काढून दाते यांच्या कार्याची नव्या पिढीला ओळख करून दिली, त्याबद्दल धन्यवाद !

❑❑❑

आपणाला ज्ञान वाढवायचे आहे, आपली भाषाशैली सुधारायची आहे असे काही तरी दडपण मनावर ठेवून वाचन केल्याने, पुस्तकातले सारे स्वारस्य निघून जाते असे मला वाटते. भाषा सुधारत नाही ती नाहीच. नुसती शब्दरचना किंवा वाक्प्रचार लक्षात ठेवण्याचा प्रयत्न करून भाषा मुळीच सुधारत नाही. ओढूनताणून चंद्रबळ आणलेली कृत्रिम भाषाशैली तयार होते. चांगल्या लेखकाचे पुस्तक समरसतेने वाचले की आपण एक जिवंत अनुभव घेतो आणि मग तसा काही अनुभव आपणाला आला की तितक्या चांगल्या भाषेत आपण तोही व्यक्त करू शकतो. तेव्हा कसलेही दडपण मनावर न ठेवता, उत्तमोत्तम पुस्तके त्यात काय आहे ते अनुभवण्याच्या आनंदाकरता वाचावी हेच उत्तम.

**– अनन्तिका, पृ. ११५-११६**

**– अनंत काणेकर**



# लेखक परिचय

**प्रदीप कर्णिक :** मुंबईच्या डी. जी. रुपारेल महाविद्यालयात २१ वर्षांपासून ग्रंथपाल. विविध प्रकारचे लेखन पुस्तकरूपाने आणि लेखरूपाने प्रकाशित.

**विजय देवधर :** पुण्याच्या एनसीएल संस्थेमधून निवृत्त. ग्रंथालयशास्त्र विषयात विविधांगी माहितीपूर्ण आणि नव्या संकल्पनांवर विशेषत्वाने लेखन.

**दि. श्री. चव्हाण :** महाराष्ट्र विधान मंडळ ग्रंथालयाचे ग्रंथपाल

**सु.अ. कुलकर्णी :** एस.एम.आर.के., बी.के., ए.के. महिला महाविद्यालय, नाशिक येथे १६ वर्षे ग्रंथपाल. ग्रंथालय प्रमाणपत्र कोर्समध्ये १० वर्षे मार्गदर्शक शिक्षक. लेखन वाचनाबरोबरच स्त्री-अभ्यास हा खास आवडीचा विषय.

**ग्रंथालयविहारी :** मूळ नाव वा. पु. कोल्हटकर. ग्रंथालयशास्त्रावर विपुल लेखन केलेले जुन्या पिढीतील नामवंत ग्रंथपाल.

**जगदीश कुलकर्णी :** स्वामी रामनंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील ग्रंथालयात सहायक ग्रंथपाल म्हणून कार्य करीत असून पीएच.डी. साठी त्यांचे संशोधन चालू आहे.

**वेदवती हब्बू :** मुंबई विद्यापीठाच्या ग्रंथालयात अनेक वर्षे सहायक ग्रंथपाल. सध्या ग्रंथ खरेदी विभागाची जबाबदारी पार पाडत आहेत.

**यू. आर. कदम :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या बी. लिब. व एम. लिब. च्या विद्यार्थिनी. बी. लिब. मध्ये सर्वप्रथम क्रमांक प्राप्त. विद्यापीठाच्या सांगली येथील अभ्यासकेंद्रावर समंत्रक म्हणून कार्य

**मोहन पाठक :** ठाण्याच्या बांदोडकर महाविद्यालयाचे ग्रंथपाल. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या बी.लिब./एम.लिब. चे केंद्र संयोजक. विपुल लेखन प्रकाशित झाले आहे.

**डॉ. राजेंद्र कुंभार :** नाशिकच्या एच.पी.टी. महाविद्यालयात ग्रंथालयशास्त्राचे अधिव्याख्याता. 'थिसॉरस' विषयात पीएच.डी. पदवी प्राप्त. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या बी.लिब./ एम.लिब. केंद्राचे केंद्र संयोजक. ग्रंथालयशास्त्रात पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

**डॉ. सु. रा. चुनेकर :** मराठीतील ख्यातनाम संशोधक, लेखक आणि सूचिकार. सूचिशास्त्रावर तात्त्विक लेखन, तसेच माधवराव पटवर्धन, अ. का. प्रियोळकर, बा.अ. भिडे यांच्या वाङ्मयाच्या सूची तयार केल्या आहेत. 'सूचींची सूची' या ख्यातनाम सूचीसाठी प्रसिद्ध.

**श्री. चंद्रकांत भोंजाळ :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात दृक-श्राव्य विभागाचे प्रमुख. १४ वर्षे आकाशवाणीच्या जळगाव केंद्रावर नोकरी. लेखक, भाषांतरकार. साहित्य अकादमीच्या पुरस्काराने सन्मानित. विविध पुस्तके प्रकाशित झाली आहेत. सध्या स्तंभलेखक म्हणून मुंबईत लोकप्रिय.

**प्रा. अविनाश कोल्हे :** मुंबईच्या डी. जी. रूपालेल महाविद्यालयात 'राज्यशास्त्र' विषयाचे अध्यापक. वीस वर्षे जाहिरात क्षेत्रात सक्रिय सहभाग. विविध विषयांवर दर्जेदार लेखन प्रसिद्ध. स्तंभलेखक व ग्रंथलेखक म्हणून मान्यता.

## एम. लिब. अंतिम परीक्षा वेळापत्रक ( मे २००५ )

| *वार* | *दिनांक* | *वेळ* | *अभ्यासक्रमाचे नाव* | *संकेतांक* |
|---|---|---|---|---|
| शनिवार | ०७/०५/२००५ | दु. ०२.३० ते ०५.३० | प्रलेख वर्णन, प्रक्रिया, प्रतिप्राप्ती, वितरण | LIB 010 |
| रविवार | ०८/०५/२००५ | दु. ०२.३० ते ०५.३० | ग्रंथालय आणि माहितीकेंद्राचे व्यवस्थापन | LIB 011 |
| सोमवार | ०९/०५/२००५ | दु. ०२.३० ते ०५.३० | ग्रंथालय आणि माहितीशास्त्राची संशोधन पद्धती | LIB 012 |
| मंगळवार | १०/०५/२००५ | दु. ०२.३० ते ०५.३० | ग्रंथालय आणि माहितीशास्त्र : वर्तमान घटना घडामोडी | LIB 013 |
| बुधवार | ११/०५/२००५ | दु. ०२.३० ते ०५.३० | शैक्षणिक व संशोधन ग्रंथालये | LIB 201 |
| गुरुवार | १२/०५/२००५ | दु. ०२.३० ते ०५.३० | ग्रंथालय सेवा व उपक्रम | LIB 202 |
| शुक्रवार | १३/०५/२००५ | दु. ०२.३० ते ०५.३० | ग्रंथेतर साहित्याचे व्यवस्थापन | LIB 203 |
| शनिवार | १४/०५/२००५ | दु. ०२.३० ते ०४.०० | माहिती तंत्रज्ञानाचा ग्रंथालयात व माहिती केंद्रात वापर | LIB 301 |

**टीप :** संगणक प्रात्यक्षिक दिनांक १८/४/२००५ ते २२/४/२००५ आणि प्रकल्प प्रात्यक्षिक अभ्यासक्रमांची परीक्षा दिनांक २२/४/२००५ ते २५/४/२००५ या कालावधीमध्ये विद्यार्थ्यांच्या संबंधित अभ्यासकेंद्रांवर आयोजित करण्यात येईल. सदर परीक्षेच्या वेळापत्रकाबाबत अथवा अधिक माहितीसाठी अभ्यासकेंद्रावर संपर्क साधावा.

# LIB 013

# ग्रंथालय आणि माहितीशास्त्र : घटना, घडामोडी, भाष्य

ज्ञानगंगा घरोघरी


*संपादक*

डॉ. रमेश वरखेडे

*कार्यकारी संपादक*

प्रदीप कर्णिक

*संपादक मंडळ*

श्री. मधुकर शेवाळे
श्री. प्रवीण घोडेस्वार
डॉ. राजेंद्र कुंभार
श्री. नागार्जुन वांजरवाडकर

*व्यवस्थापक*

श्री. मधुकर शेवाळे



© २००५
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ



*निर्मिती*

श्री. आनंद यादव, व्यवस्थापक, ग्रंथनिर्मिती केंद्र, य. च. म. मुक्त विद्यापीठ

*मुद्रक*

श्री. सुहास पोतनीस, श्री ऑफसेट प्रेस, ७ ए, नाईस, सातपूर, नाशिक – ७

*प्रकाशक*

डॉ. एन. आर. कापडणीस, कुलसचिव, य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक – ४२२ २२२.


# ज्ञानगंगोत्री


**वर्ष ५ वे** | **मार्च–एप्रिल–मे २००५** | **अंक ४**


*अनुक्रमणिका*


| | | | |
|---|---|---|---|
| ❑ संपादकीय | : | | २ |
| ❑ वाचन शिफारस यादी | : | प्रदीप कर्णिक | ५ |
| ❑ संकलक (ॲग्रीगेटर) : ई–मासिकांचा मौल्यवान आणि आर्थिक लाभदायी स्रोत | : | विजय देवधर | ११ |
| ❑ महाराष्ट्र विधानमंडळ ग्रंथालय : इतिहास, स्वरूप व ग्रंथालय सेवा | : | दि. श्री. चव्हाण | १७ |
| ❑ ज्ञानव्यवस्थापन : नव्या युगातील नवे आव्हान | : | सु. अ. कुलकर्णी | ३३ |
| ❑ अजून ताजा वास जुन्याला | : | ग्रंथालयविहारी | ४३ |
| ❑ ग्रंथपरिचय | : | जगदीश कुलकर्णी<br>वेदवती हब्बू | ५२ |
| ❑ ग्रंथालय व माहितीशास्त्र अभ्यासक्रमाची नेट / सेट परीक्षा | : | यू. आर. कदम | ५६ |
| ❑ वेब (सर्च इंजिन्सची कल्पना) | : | मोहन पाठक | ६० |
| ❑ ग्रंथोपचारपद्धती (बिब्लिओथेरपी) | : | मोहन पाठक | ६४ |
| ❑ तेरा (१३) अंकांचा आयएसबीएन | : | डॉ. राजेंद्र कुंभार | ६७ |
| ❑ शं.ग. दाते विशेषांक : प्रतिक्रिया | : | डॉ. सु. रा. चुनेकर | ७२ |
| ❑ शं.ग. दाते विशेषांक : परीक्षणे | : | चंद्रकांत भोंजाळ<br>प्रा. अविनाश कोल्हे | ७४ |



| | | |
|---|---|---|
| सुट्या अंकाची किंमत | : संस्था रु. ५० | व्यक्ती : रु. २५ |
| वार्षिक वर्गणी | : संस्था रु. २०० | व्यक्ती : रु. १०० |

मागील अंक उपलब्धतेनुसार पाठविले जातील. वर्गणीचा धनाकर्ष (डीडी) 'वित्त अधिकारी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक' या नावे काढलेला आणि नाशिक येथे देय असावा.


**पत्रव्यवहाराचा पत्ता**


**वर्गणी व व्यवस्थापन –** प्रा. मधुकर शेवाळे, सहायक ग्रंथपाल, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक – ४२२ २२२.

**संपादकीय (साहित्य पाठविण्यासाठी) –** प्रदीप कर्णिक, ३०१, टॉवर नंबर १, फ्लॉवर व्हॅली, नारळीपाडा, ठाणे (प.) – ४०० ६०१.



● या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.